वसई विरार शहर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव क्र. २५९ **विभाग :-** स्मशानभूमी
दिनांक :- ०१/०५/२०२१

विषय :- सन २०२१-२२ या वित्तीय वर्षाकरिता महानगरपालिका हद्दीतील स्मशानभूमीमध्ये दहनासाठी जळाऊ लाकडांचा पुरवठा करणे.

प्रस्तावाचा मजकूर :- उपरोक्त विषयान्वये वसई विरार शहर महानगरपालिका कार्याक्षत्रातील स्मशानभूमीमध्ये शव दहनासाठी जळाऊ लाकडांचा पुरवठा सन २०२१-२२ या वित्तीय वर्षा करिता करणे आवश्यक असुन दि. /०६/२०२१ रोजीच्या निविदा समितीच्या बैठकीचे इतिवृत्त पुढील प्रमाणे आहे.

१) प्रशासकीय मंजूरी :- दोन कोटी
२) अंदाजपत्रकीय तरतुद :- तीन कोटी
३) ई-निविदा सुचना व प्रारुप निविदा संच अंतिम करणाऱ्या प्राधिकाऱ्याचे नाव :- उप-आयुक्त, स्मशानभूमी
४) वृत्तपत्रातील ई-निविदा सुचना क्र. व प्रसिध्दी दिनांक :- दि. २ जुन, २०२१ (अंतिम दिनांक २३ जुन, २०२१)
५) वृत्तपत्राचे नाव : :- १) लोकसत्ता, २) नवाकाळ, ३) सकाळ, ४)महासागर ४) पुढारी, ५) जागरुक टाईम्स, ७) मुंबई केसरी.
७) प्राप्त ई-निविदा संख्या :- ०४
८) प्रथम लखोटा उघडल्याची दिनांक :- दि. २५/०६/२०२१
९) पात्र ई-निविदा संख्या :- ०४
१०) दुसरा लखोटा उघडल्याचा दिनांक :- दि. ३०/०६/२०२१

प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	निविदाधारकाचे नाव	निविदा दर (प्रति टन)	सर्वात कमी दराची निविदा
१.	मे. श्री लक्ष्मी टिंबर मार्ट	रु. ४१४९/-	मे. श्री लक्ष्मी टिंबर मार्ट यांची रु.४१४९/- प्रति टनची आहे.
२.	कमलेश जिवन कुंदर	रु. ५११०/-	
३.	अे. एस. वुड इण्ड.	रु. ४२४५/-	
४.	हरजित कलेक्शन ऍण्ड सन्स टिंबर टि. अरुमुगम कोनार	रु. ४६९२/-	

उपरोक्त तुलनात्मक तक्त्याचा अभ्यास करता मे. श्री लक्ष्मी टिंबर, मार्ट यांची रु. ४१४९/- प्रतिटन दराची निविदा प्राप्त झालेली आहे व सदर दर न्युनतम (L-१) असून मागील वर्षीच्या (रुपये ४५००) दराच्या तुलनेतसुध्दा कमी व योग्य आहे.

तरी मे. श्री लक्ष्मी टिंबर ट्रेडींग यांस रु. ४१४९/- प्रतिटन दराच्या निविदेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मान्यता देणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

ठराव निर्णय :- वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील स्मशानभूमीत प्रेत दहनासाठी जळाऊ लाकडाचा पुरवठा करणेकरिता आणिबाणीच्या परिस्थितीत विशेषबाब म्हणून मनपा अधिनियम १९४९ क्र. ६७(३)(क) अन्वये प्रशासकीय व वित्तिय मान्यता प्रदान करणेकामी ०४ निविदा प्राप्त झाल्या आहेत. प्राप्त सर्व निविदा पात्र ठरवून वित्तीय बोलीचा लिफाफा उघडण्याचे केलेल्या आदेशानुसार वित्तीय बोलीचा लखोटाद्वारे प्राप्त झालेल्या अहवालानुसार लघुत्तम दराचे निविदाधारक मे. श्री लक्ष्मी टिंबर यांच्या बी/२ निविदेतील दर हे इतर निविदा धारकांपेक्षा कमी असून रु. ४१४९/- प्रतिटन या दराने निविदा मंजूर करुन मे. श्री लक्ष्मी टिंबर ट्रेडींग यांचे सोबत संविदा करणेस मान्यता देण्यात येत आहे.

(गंगाथरन डी.)
आयुक्त तथा प्रशासक,
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि- पालघर, पिन नं.-४०१ ३०५
दुरध्वनी-०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स-०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. :- २९८ **विभाग :- वाहन**

दिनांक :- ०१/०२/२०२१

विषय :- मे.रुट्स मल्टिक्लिन लि.यांचेकडून ०२ नग स्विपींग मशिन वाहन पुरवठा करणेकामी अतिरिक्त मुदतवाढ मिळणेबाबत.

संदर्भ :- १. मा. प्रशासकीय ठराव क्र. ४१५ दि.२२/०१/२०२१ अन्वये मंजूरी
२. दि.२७/०१/२०२१ रोजीचा करारनामा.
३. दि. २८/०१/२०२१ रोजीचा कार्यादेश
४. मा.आयुक्त तथा प्रशासक यांचेकडील दि. ०२/०६/२०२१ रोजीची मंजुर टिपणी.
५. मे.रुट्स मल्टिक्लिन लि. यांचेकडील दि. २९/०६/२०२१ रोजीचे पत्र.

प्रस्तावाचा मजकूर :-वसई विरार शहर महानगरपालिकेच्या "घनकचरा व्यवस्थापन" व "स्वच्छता विभागासाठी" २ नग स्विपींग मशिन वाहने (Sweeping Machine Vehicle) खरेदी करणेसाठी मा.प्रशासकीय ठराव क्र. ४१५ दिनांक २२/०१/२०२१ अन्वये मंजूरी प्राप्त झालेली आहे. प्राप्त मंजूरीन्वये दि. १६/०९/२०२० रोजीच्या दै.नवभारत, दै. नवराष्ट्र, दै.पूर्णविराम, दै.मिड-डे, दै.जागरुक टाईम्स,दै. इंडीयन एक्सप्रेस व दै.सकाळ या वृत्तपत्रांमध्ये जाहिर ई-निविदा सुचना प्रसिध्द करुन इच्छूक निविदाकारांकडून ई-निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. दिलेल्या मुदतीत एकूण ०२ ई- निविदा प्राप्त झाल्या. सदर निविदेचा तांत्रिक बाबींचा लिफाफा क्र. १ दि.१२/११/२०२० रोजी उघडण्यात आला. लिफाफा क्र. १ मधील कागदपत्रांची पडताळणी करणेकामी मा.निविदा समिती समोर ठेवणेत आली. प्राप्त ई-निविदांमधील ०२ ई-निविदाकारांची कागदपत्र योग्य असल्याने ०२ ई-निविदा पात्र ठरवून त्यांचा आर्थिक बाबींचा लिफाफा क्र. २ उघडणेस मा.निविदा समितीने दि.२१/०१/२०२१ रोजी मंजूरी दिली. प्राप्त मंजूरीन्वये ई-निविदेचा आर्थिक बाबींचा लिफाफा क्र. २ उघडण्यात आला. तद्नंतर कमी दराचे ई-निविदाकार मे.रुट्स मल्टिक्लिन लि. यांचे दरास संदर्भ क्र. १ अन्वये मा.आयुक्त तथा प्रशासक यांनी मंजूरी देऊन संविदा करणेस मान्यता दिली.

प्राप्त मान्यतेच्या अनुषंगाने मे.रुट्स मल्टिक्लिन लि. यांचे समवेत संदर्भ क्र.२ अन्वये करारनामा करणेत येऊन ६० दिवसांचे मुदतीत ०२ नग स्विपींग मशिन वाहने पुरवठा करणेबाबत संदर्भ क्र.३ अन्वये कार्यादेश देण्यात आला. त्यानुसार मे.रुट्स मल्टिक्लिन लि. यांनी दि.२७/०३/२०२१ पर्यंत महानगरपालिकेस वाहने मा. उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे नोंदणी करुन पुरवठा करणे अपेक्षित होते. तसे न केल्यास मे.रुट्स मल्टिक्लिन लि. यांचे समवेत केलेल्या करारनाम्यातील अट क्र.२ नुसार प्रति दिन प्रती वाहन र.रु. ५०००/- दंड आकारला जाईल. असे नमुद आहे. परंतु, मे.रुट्स मल्टिक्लिन लि. यांनी पत्र देऊन स्विपींग मशिन वाहने वसईत आलेली असुन सदरची वाहने महानगरपालिकेच्या फायर स्टेशनला नोंदणी अभावी उभी आहेत. अटी शर्तीनुसार सदर वाहनांची नोंदणी झाल्याशिवाय ती महानगरपालिकेकडे वर्ग करता येत नाही. परंतू टाळेबंदीमुळे वाहनांचे नोंदणीचे कामकाज बंद आहे. अद्यापपर्यंत मा. उपप्रादेशिक परिवहन कार्यालय यांनी नोंदणी करणेत आलेली नाही. करिता मे.रुट्स मल्टिक्लिन लि. यांनी पत्र देऊन होणारा विलंब विचारात घेवून कामाच्या कालावधीची मुदत दि. २५/०६/२०२१ पर्यंत वाढवून मिळणेबाबत विनंती केलेली होती. मे.रुट्स मल्टिक्लिन लि. यांनी विनंती पत्रात नमूद केलेली अडचण/समस्या ही तितकीच खरी आहे. करिता मे.रुट्स मल्टिक्लिन लि. यांना संदर्भ क्र.४ अन्वये मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या मान्यतेने मुदतवाढ देण्यात आलेली होती. संदर्भ क्र.४ अन्वये मे.रुट्स मल्टिक्लिन लि. यांना देण्यात आलेल्या मुदतीतही वाहने मा. उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे नोंदणी अद्यापर्यंत झालेली नसुन संदर्भ क्र.५ अन्वये पत्र देऊन अतिरिक्त १ महिन्याची मुदत वाढवुन मिळणेबाबत विनंती अर्ज केलेला आहे.

तरी कोव्हिड-१९ च्या वाढत्या प्रादूर्भावामुळे वाहन नोंदणी करणेकामी झालेल्या विलंबासाठी करारनाम्यातील अट क्र. २ नुसार होणारा दंड माफ होणेस तसेच वाहन पुरवठा करणेकामी दि. २६/०६/२०२१ ते दि. २५/०७/०२०२१ पर्यंत मुदतवाढ मिळणेस प्रस्ताव मा.आयुक्त तथा प्रशासक यांचेकडे निर्णयास्तव सविनय सादर.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या "घनकचरा व्यवस्थापन" व "स्वच्छता विभागासाठी" २ नग स्विपींग मशिन वाहने मे.रुट्स मल्टिक्लिन लि. यांना दि. २५/०६/२०२१ रोजी पर्यंत वाहन पुरवठा करणेस मुदतवाढ देण्यात आलेली होती. कोव्हिड-१९ च्या वाढत्या प्रादूर्भावामुळे सदर वाहन नोंदणी करिता विलंब होत असल्यामुळे मे.रुट्स मल्टिक्लिन लि. यांनी मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केलेली आहे. सदर विनंती विचारात घेवून मे.रुट्स मल्टिक्लिन लि यांना वाहने नोंदणी करुन पुरवठा करणेच्या कामास दि. २६/०६/२०२१ ते दि. २५/०७/०२०२१ पर्यंत वाढविण्यास याव्दारे मंजुरी देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स -०२५०-२५२५१०७,
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

ठराव क्र. २९१ विभाग : सार्व.बांधकाम
दिनांक :०१/०७/२०२१

प्रस्तावाचा विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील इमारतींचे संरचनात्मक निरीक्षण (स्ट्रक्चरल ऑडीट) करणेसाठी अतिरिक्त तज्ञ स्थापत्य अभियंता/ सल्लागार (कंन्सलटंन्ट) पॅनलवर नियुक्ती करुन सुरक्षा अनामत रक्कम भरणा करणेस, करारनामा करणेस व कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकुर :- सादर करणेत येते की, वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील इमारतींचे संरचनात्मक निरीक्षण (स्ट्रक्चरल ऑडीट) करणेसाठी अतिरिक्त इच्छुक अनुभवी पदवीधर तज्ञ स्थापत्य अभियंता/ सल्लागार (कंन्सलटंन्ट) यांच्याकडून मंजूर दरानूसार पॅनलवर स्ट्रक्चरल ऑडीट करणेकामी नियुक्त करणेसाठी जाहिर सुचना प्रसिध्द करुन अर्ज मागविणेकामी **मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्याकडील ठराव क्र. २३३ दि. १६/०६/२०२१** अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

त्या अनुषंगाने दै. लोकमत, दै. प्रहार, दै. पुण्यनगरी, दै. वृत्तमानस, दै. मुंबई केसरी टाईम्स, दै. यशोभुमी, दै. हमारा महानगर, दै. इंडियन एक्सप्रेस, दै. प्रि प्रेस जर्नल, दै. मिड डे व दै. स्टॅडर्ड स्पोर्टस् या वृत्तपत्रकामध्ये दि. १८/०६/२०२१ रोजी जाहिर सुचना प्रसिध्द केली असता **१) मे. सेंट्रॉईड कंन्सटिंग इंजिनिअर्स, २) मे. बी. जे. मेहता आर्किटेक्चरल अॅण्ड स्ट्रक्चरल कंन्सलटंन्ट प्रा.लि., ३) मे. एस. पी. भागवे कंन्सलटंस् प्रा.लि., ४) मे. निम्माना सिविल स्ट्रक्चरल सोल्युशनस् प्रायव्हेट लिमीटेड, ५) मे. अतुल कुडतरकर अॅण्ड असोशिएट्स ६) मे. निलेश महादेव शिंदे ७) मे. विश्वनाथ एंटरप्रायजेस ८) मे. अभिजीत सुरेश वासावे ९) मे. चिन्मय मिलिंद शिंदे** ह्यांनी सदर कामी लेखी अर्जाद्वारे मंजूर दराने पॅनलवर काम

करणेकामी इच्छुकता/तयारी दर्शविली आहे. तसेच त्यांनी महानगरपालिकेमार्फत मागणी केलेली आवश्यक कागदपत्रे सोबत जोडली आहेत. सदर कागदपत्रांची छाननी केली असता वरील नमूद सर्व ९ स्थापत्य अभियंता/ सल्लागार (कंन्सलटंन्ट) पात्र ठरत आहेत.

त्या अनुषंगाने वरील सर्व इच्छुक अनुभवी पदवीधर तज्ञ स्थापत्य अभियंता/ सल्लागार (कंन्सलटंन्ट) यांना पॅनलवर नियुक्त करणेकामी तसेच त्यांच्याकडून **सुरक्षा अनामत रक्कम रु. २५,०००/-** डी.डी. ने भरणा करुन घेणेस व **रक्कम रु.१,०००/-** किंमतीचा स्टॅम्प पेपर वर विहित नमुन्यात करारनामा करुन घेणेकरीता व कार्यादेश देणेकरीता मा. आयुक्त तथा प्रशासक ह्यांच्या मंजूरीस्तव सविनय सादर.

प्रस्तावाचा निर्णय :- वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील इमारतींचे संरचनात्मक निरीक्षण (स्ट्रक्चरल ऑडीट) करणेसाठी अतिरिक्त इच्छुक अनुभवी पदवीधर तज्ञ स्थापत्य अभियंता/ सल्लागार (कंन्सलटंन्ट) यांच्याकडून मंजूर दरानुसार पॅनलवर स्ट्रक्चरल ऑडीट करणे कामी **१) मे. सेंट्रॉईड कंन्स्टिंग इंजिनिअर्स, २) मे. बी. जे. मेहता आर्किटेक्चरल अॅण्ड स्ट्रक्चरल कंन्सलटंन्ट प्रा.लि., ३) मे. एस. पी. भागवे कंन्सलटंस् प्रा.लि., ४) मे. निम्माना सिविल स्ट्रक्चरल सोल्युशनस् प्रायव्हेट लिमीटेड, ५) मे. अतुल कुडतरकर अॅण्ड असोशिएट्स ६) मे. निलेश महादेव शिंदे ७) मे. विश्वनाथ एंटरप्रायजेस ८) मे. अभिजीत सुरेश वासावे ९) मे. चिन्मय मिलिंद शिंदे** असे एकूण ९ स्थापत्य अभियंता/ सल्लागार (कंन्सलटंन्ट) यांची पॅनलवर नियुक्ती करण्यात येत असून त्यांच्याकडून सुरक्षा अनामत रक्कम भरणा करणेस, करारनामा करणेस व कार्यादेश देणेस मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि.पालघर, पिन नं ४०१ ३०५
दूरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल -vasaivirarcorporation @yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. 300 विभाग : आस्थापना (मु.)

दिनांक : 2/०७/२०२१

प्रस्तावाचा विषय :- श्री. नितीन भवानी शंकर राऊत, सेवानिवृत्त अधिकारी यांना महानगरपालिकेच्या अग्निशमन व आणिबाणी सेवा विभागाकरीता हंगामी विशेष कर्तव्य अधिकारी या पदावर नाममात्र मानधनावर सहा महिन्यासाठी कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- श्री. नितीन भवानीशंकर राऊत, या सेवानिवृत्त अधिकाऱ्याची नाममत्र मानधनावर नियुक्ती करणेच्या प्रस्तावाबाबत चर्चा करण्यात आली.

वसई विरार शहर महानगरपालिकेस विरार (प.) येथिल परिवहन भवन येथिल मुख्य आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण केंद्र लवकरात लवकर सुरु करावयाचे आहे. त्यासाठी शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेले अधिकारी श्री. नितीन भ. राउत यांचा प्रस्ताव प्राप्त असून ते नाममात्र मानधनावर काम करणेस इच्छूक आहे. श्री. राऊत यांना आपत्ती व्यवस्थापन विभागाचा खालीलप्रमाणे अनुभव आहे.

१. मुंबई अग्निशमन दलात कार्यभार अधिकारी (बिनतारी) श्रेणी केंद्र अधिकारी सेवा बजावून दि. ३१ मार्च, २०१० रोजी स्वेच्छानिवृत्ती स्विकारली.
२. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ येथे वरिष्ठ संचार अधिकारी श्रेणी विभागीय अधिकारी या पदावर सेवा बजावून नियत वयोमानानुसार दि. ३० जून २०१३ मध्ये सेवानिवृत्त झाले.
३. पालघर नगरपरिषदमध्ये सन २०१३ ते सन २०१५ मध्ये अग्निशमन विभागात सेवा बजावली.
४. मा. संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा, मुंबई येथे वरिष्ठ संचार अधिकारी या पदावर सन २०१५ ते सन २०१७ या दोन वर्षासाठी सेवा बजावली.

वसई विरार शहर महानगरपालिका मुख्य आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण केंद्र स्थापन करतांना पार पाडावयाच्या जबाबदाऱ्या पुढील प्रमाणे असतील.

१. आपत्कालीन व्यवस्थापन व नियंत्रण केंद्राकरीता आवश्यक असलेले आराखडे तयार करणे, व रचनांची पूर्तता करणे.
२. आपत्कालीन व्यवस्थापन व नियंत्रण केंद्र यांचे संचार संपर्क यंत्रणा सेवेसंदर्भातील प्रस्ताव तयार करणे व त्यांचे कार्यान्वितीकरण करणे.
३. सलग्न अग्निशमन केंद्रास आवश्यक संचार संपर्क यंत्रणा सेवेसंदर्भातील साधन सामग्रीचे प्रस्ताव तयार करणे व त्यांचे कार्यान्वितीकरण करणे.
४. वरिष्ठ अधिकारी यांच्या परवानगीने संबंधीत विषयाच्या बैठकीस ते आदेशीत करतील तेथे उपस्थित राहणे.

तरी श्री. नितीन भ. राऊत यांचा अनुभवाचा फायदा महानगरपालिकेस सुसज्ज मुख्य आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण केंद्र उभारण्यास होणेच्या दृष्टीने नाममात्र मानधनावर नियुक्ती करणेस सदरचा प्रस्ताव मंजूरीसाठी ठेवण्यात आला होता. त्यानुसार सदर प्रस्तावावर विचार विनिमय करुन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

ठराव/ **निर्णय** :- श्री. नितीन भवानीशंकर राऊत, या सेवानिवृत्त अधिकाऱ्याची नाममात्र मानधनावर सहा महिन्याच्या कालावधी साठी कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करणेच्या प्रस्तावाबाबत चर्चा करण्यात आली. त्यावर महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण केंद्र उभारणेच्या दृष्टीने व अग्निशमन विभागाच्या आणिबाणी सेवामध्ये कामाची निकड लक्षात घेता श्री. नितीन भवानीशंकर राऊत यांना नाममात्र मानधनावर सहा महिन्याच्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने रु. २५,०००/- इतक्या नाममात्र मानधनावर महानगरपालिकेत नियुक्ती करण्यात येत आहे.

तसेच या कामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव क्र. ३०१ **विभाग :- घनकचरा व्यवस्थापन**
दिनांक :-२ /०७/२०२१

विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत गटार सफाई करीता अतिरिक्त ३ सक्शन कम जेटींग मशीन मंजूर निविदेकाराकडुन खरेदी करणेकामी अर्थसंकल्पीय तरतुद **वाहन खरेदी/ रोडरोलर खरेदी व साफसफाई जाहिरात खर्चाच्या** लेखाशिर्षाकामध्ये पुन:वियोजन करणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई-विरार शहर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागाकरीता दैनंदिन गटार सफाई यांत्रिक पध्दतीने करणेकामी ६ सक्शन कम जेटींग मशीन खरेदी करणेकामी प्रशासकीय ठराव क्र. ४४२ दिनांक २८/०१/२०२१ अन्वये प्रशासकीय मंजुरी घेऊन जाहिर ईनिविदा प्रसिध्द करण्यात आली होती. सदरील निविदेत **मे.क्वालीटी एनवायरो इंजिनियर्स प्रा.लि.** यांच्या सोबत कारारनामा करुन जा.क्र.वविशम/आरोग्य/१३६/२०२१ दिनांक ०७/०५/२०२१ रोजी कार्यादेश देण्यात आला आहे. त्यानुसार दिनांक २०/०५/२०२१ रोजी ६ सक्शन कम जेटींग मशीन पुरवठा केला आहे. त्यानुसार सदरील मशीन गटार सफाईच्या कामास वापरण्यास सुरु केल्यानंतर सदरील मशीन गटार सफाईचे काम उत्तम रित्या करत असल्याने मा. आयुक्त सो. यांनी ३ अतिरिक्त सक्शन कम जेटींग मशीन खरेदी करण्याचे निर्देश दिले आहेत. जेणेकरुन प्रत्येक प्रभागामध्ये १ सक्शन कम जेटींग मशीन दिल्यास चांगल्या प्रकारे गटार सफाईचे काम होऊ शकते.

तरी मंजुर निविदेकार यांच्याकडून अतिरिक्त ३ सक्शन कम जेटींग मशीन खरेदी करणेसाठी प्रती मशीन रक्कम रु.३८,८२,०००/- प्रमाणे ३ मशीनसाठी रक्कम रुपये १,१६,४३,००० (अक्षरी एक कोटी सोळा लक्ष त्रेचाळीस हजार रुपये मात्र) एवढा खर्च होणार आहे. परंतु सदरील खर्च करण्यासाठी सन २०२१-२२ या वर्षाकरीता अर्थसंकल्पीय तरतुद वाहन खरेदी रोड रोलर खरेदी मध्ये १४ कोटी बजेट तरतुद करण्यात आली आहे. परंतु वाहन खरेदी/ रोड रोलर खरेदी या लेखाशिर्षकामधील तरतुद संपुष्टात आली असल्याने सन २०२१-२२ या वित्तीय वर्षातील "**जंतू नाशक खरेदी**" या लेखाशिर्षकातील तरतुद रक्कम रु.१० कोटी मधून रु.५ कोटी "**वाहन खरेदी/रोड रोलर खरेदी**" या लेखाशिर्षमध्ये पुन:वियोजन करणे आवश्यक आहे.

तसेच घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत दैनंदिन रस्ते सफाई, कचरा संकलन, गटार सफाई तसेच एकात्मिक डास निर्मुलन व नियंत्रण व भटक्या कुत्र्यांना पकडून त्यांच्यावर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करुन रॅबीज लस देणे इत्यादी कामे करण्यात येतात. तसेच घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ च्या प्रभावी अंमलबजावणी करण्याची केंद्र शासनाने आदेश पारीत केले आहे. त्यामुळे शहरात सुका व ओला कचरा विलगीकरण करण्यासाठी नागरीकांन मध्ये जनजागृती करणे तसेच केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान प्रभावीपणे राबविणेसाठी वृत्तपत्रात जाहिर आवाहन प्रसिध्द करणे आवश्यक असते.

तरी सदरील जाहिरातीसाठी "**साफसफाई जाहिरात खर्च**" या लेखाशिर्षामध्ये सन २०२१-२२ या वित्तीय वर्षात ३ लक्ष बजेट तरतुद करण्यात आली आहे. परंतु सदरील तरतुद संपुष्टात आल्याने सन २०२१-२२ या वित्तीय वर्षातील अर्थसंकल्पीय तरतुद "**जंतू नाशक खरेदी**" या लेखर्शिर्षातील तरतुद रक्कम **रुपये १० कोटी** मधुन रक्कम

रुपये १५ लक्ष एवढी रक्कम **"साफसफाई जाहिरात खर्च"** या लेखाशिर्षकामध्ये पुन:वियोजन करणे आवश्यक आहे. तरी **"वाहन खरेदी/रोड रोलर खरेदी" व "साफसफाई जाहिरात खर्च"** या दोन्ही लेखाशिर्षकातील तरतुदीमध्ये **रु.५ कोटी १५ लक्ष** एवढी पुन:वियोजन करणेकामी सदरचा प्रस्ताव सादर.

ठराव निर्णय :-

वसई-विरार शहर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत गटार सफाई करीता अतिरिक्त ३ सक्शन कम जेटींग मशीन खरेदी करणेकामी अर्थसंकल्पीय तरतुद **वाहन खरेदी/ रोडरोलर खरेदी या लेखाशिर्षकामध्ये रक्कम रु.५ कोटी** तसेच घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ च्या प्रभावी अंमलबजावणी करण्याची केंद्र शासनाने आदेश पारीत केले आहे.

त्यामुळे शहरात सुका व ओला कचरा विलगीकरण करण्यासाठी नागरीकांन मध्ये जनजागृती करणे तसेच केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान प्रभावीपणे राबविणेसाठी वृत्तपत्रात जाहिर आवाहन प्रसिध्द करणे आवश्यक असते. या कामी जाहिरात प्रसिध्द करणेकामी सन २०२१-२२ या वित्तीय वर्षातील अर्थसंकल्पीय तरतुद **साफसफाई जाहिरात खर्चाच्या** लेखाशिर्षाकामध्ये रक्कम रु.१५ लक्ष असे दोन्ही मिळून रक्कम रु.५ कोटी १५ लक्ष पुन:वियोजन करण्यास मंजूरी देत आहे.

(गंगाथरन डी.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

D:\Aarogy\punviniyojan/Tipani Tharav

वसई - विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि.पालघर पिन नं.४०१ ३०५
दूरध्वनी - ०२५० -२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स् - ०२५० -२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ३०२

विभाग : उद्यान
दिनांक : ५/०७/२०२१

प्रस्तावाचा विषय : सामाजिक वनीकरण विभागातून वनमहोत्सव मधील रोपे उपलब्ध करुन होणाऱ्या खर्चास प्रशासकिय व वित्तिय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर : उपरोक्त विषय संदर्भान्वये सादर करणेत येते की, वसई-विरार शहर महानगरपालिकेने सन २०२१-२२ या वित्तीय वर्षामध्ये शासनाकडून प्राप्त उद्दिष्ट महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन व संवर्धन १९७५ अन्वये वृक्ष लागवड व स्थानिक लोकांना रोपांचे वाटप करण्याचे प्रस्तावित आहे. सदर वरील नमुद बाबी लक्षात घेता एकूण वृक्षलागवड व रोपे वाटप करीता ६५००० वृक्षांची / रोपांची मोहिम राबविण्यास आवश्यकता आहे.

रोपांच्या उपलब्धतेबाबत वन विभागाच्या सामाजिक वनीकरणाच्या रोपवाटीकेमधून संदर्भिय पत्रानुसार होणार तसेच सदर उपलब्ध होणारी रोपे संदर्भिय शासन निर्णयानुसार नमुद मापक दरात उपलब्ध करुन देणार आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

अ.क्र.	रोपांचे वर्गीकरण	वनमहोत्सव कालावधीतील रोपे पिकांचे दर प्रति रोप	सर्वसाधारण कालावधीतील रोप विक्रीचे दर
१	९ महिन्यांचे रोपे (लहान पिशवीतील रोपे) १२.५ से.मी. x २५ से.मी.	१०/-	२१/-
२	१८ महिन्यांचे रोपे (मोठ्या पिशवीतील रोपे) २० से.मी x ३० से.मी.	४०/-	७३/-
३	१८ महिन्यांचे रोपे (मोठ्या पिशवीतील रोपे) २५ से.मी. x ४० से.मी.	५०/-	१०/-

वरील नमुद दरांच्या तपशिलानुसार वृक्ष लागवड मोहिम अंतर्गत स्थानिक नागरीकांना दत्तक योजनेच्या अनुषंगाने १०००० वृक्षांची रोपे वाटप करावयाचे आहे. त्याकरीता वरील नमुद तक्यामधील अ.क्र.२ अन्वये रु.४०/- प्रमाणे ८००० रोपे तसेच अनु.क्र. ३ अन्वये रु.५०/- प्रमाणे २००० रोपे योजनेअंतर्गत वाटप करण्यास योग्य राहील. सदर खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे -

अ.क्र.	रोपांचे वर्गीकरण	वनमहोत्सव कालावधीतील रोपांचे दर रु. (प्रती नग)	आवश्यक रोपांची संख्या	खर्च रक्कम रु.
१	१८ महिन्यांचे रोपे (मोठ्या पिशवीतील रोपे) २० से.मी x ३० से.मी.	रु.४०/-	८०००	रु. ३,२०,०००/-
२	१८ महिन्याचे रोपे (मोठ्या पिशवीतील रोपे) २५ से.मी. x ४० से.मी.	रु.५०/-	२०००	रु.१,००,०००/-
	एकूण		१००००	रु.४,२०,०००/-

सदर १०००० रोपे वाटणेकामी वरील तक्त्यात नमुद दराने सामाजिक वनीकरण विभागामार्फत खरेदी करणेकामी रु.४,२०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च २०२१-२२ या वित्तीय वर्षातील अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील लेखाशिर्ष वृक्षप्राधिकरण बियाणे व रोपे खरेदी रोप वाटीका खर्च तरतुद रक्कम रु. ३,५०,००,०००/- (अक्षरी - तीन कोटी पन्नास लक्ष मात्र) मधून भागविता येईल. सदर रोपे खरेदी करणेकरीता सदरचा प्रस्ताव पुढील मंजुरीस्तव सादर.

ठराव : सदर प्रस्तावा मध्ये नमुद वृक्षलागवड योजनेअंतर्गत स्थानिक नागरीकांना रोपे वाटप करणे करीता १०००० रोपे सामाजिक वनीकरण विभाग उपलब्ध करुन घेणेस तसेच सदर रोपे प्रत्येकी प्रभागास १००० रोपे वाटप करण्यात यावी. सदर वाटप करण्यात येणाऱ्या रोपांची योग्यरित्या लागवड करुन घेण्यात यावी त्याअनुषंगाने सदर रोपे वाटप करणेकरीता सामाजिक वनीकरण विभागामार्फत खरेदी करणेकामी रक्कम रु.४,२०,०००/- (अक्षरी - चार लक्ष वीस हजार रुपये मात्र) इतक्या होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल - vasaivirarcorporation @yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ३०३

विभाग : आस्थापना (मु.)
दिनांक :०५/०७/२०२१

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका येथे कार्यरत असलेल्या सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांना भरपगारी रजा (Paid Leaves) मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :-

वसई विरार शहर महानगरपालिकेची स्थापना ३ जुलै २००९ रोजी झाली असून त्यात चार नगरपरिषदा व ५५ महसूली गावांचा समावेश करण्यात आलेला आहे. महानगरपालिकेचे एकूण क्षेत्रफळ ३११ चौ.कि.मी. असून सदर क्षेत्रफळातील नागरीकांना सोयी सुविधा देणेकामी महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सध्याचा कार्यरत कर्मचारी वर्ग अपूरा पडत असल्याने विविध विभागात अत्यावश्यक सेवेत कर्मचाऱ्यांची आवश्यकता असल्याने महानगरपालिकेच्या बांधकाम विभाग, पाणी पुरवठा, सामान्य प्रशासन, सार्व.आरोग्य, सार्व. वाचनालय, अग्निशमन विभाग, वाहन विभाग, महिला व बालकल्याण विभाग, दिवाबत्ती विभाग अंतर्गत विविध कामे करण्यासाठी सन २०२०-२१,२०२१-२२ व २०२२-२३ साठी मनुष्यबळ पुरवठा करणेकामी मे. स्वयंभू ट्रान्सपोर्ट यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

सदर ठेक्यात कार्यरत असलेले कर्मचारी हे यापुर्वी देखील असलेल्या ठेक्यात कार्यरत होते. सदर कर्मचाऱ्यांनी वर्षभर काम करत असल्याने कामय कर्मचाऱ्यांप्रमाणे त्यांना भरपगारी रजा मिळाव्यात. अशी मागणी संदर्भिय निवेदना नुसार केलेली आहे.

तसेच महानगरपालिकेमार्फत वैद्यकिय आरोग्य विभाग व इतर विभाग कंत्राटी (contractual) वैद्यकिय अधिकारी, नर्स इतर पॅरामेडीकल स्टाफ व इतर कर्मचारी नेमलेले आहेत. त्यांना देखील भर पगारी (Paid Leave) देण्यासंदर्भात कार्यवाही करावी असे निर्देश देण्यात आलेले आहे.

मा. आयुक्त (कु.क.) व संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई, महाराष्ट्र यांचे कडील पत्र क्र. राआसो/NUHM/करारनामा/४६२९-४८९३/१५ दिनांक २०/०४/२०१५ अन्वये राष्ट्रीय नागरी अभियान योजनेंतर्गत कार्यरत कंत्राटी अधिकारी व कर्मचारी यांचे करीता करारनामा (Bond Paper) मध्ये दिलेल्या अटी मधील अट क्र. ८ अन्वये त्यांना वर्षभरात ८ दिवस किरकोळ रजा (Casual leave) व ७ दिवस वैद्यकिय रजा (Medical Leave) देण्यात येतील. या व्यतिरिक्त कोणत्याही रजा अनुज्ञेय नाही.

त्यानुसार महानगरपालिकेत असलेला कंत्राटी/ठेका कर्मचा-यांना वार्षिक ८ दिवस किरकोळ रजा व ७ दिवस वैद्यकिय रजा मंजूर करता येतील.

तसेच ज्या कंत्राटी/ठेका कर्मचा-यांना ई.एस.आय.सी. लागू आहे त्यांना मातृत्व रजेचा पगार ई.एस.आय.सी. कार्यालयाकडून अदा केला जातो. तथापि, ज्या कंत्राटी कर्मचा-यांना ई.एस.आय.सी. योजना लागू नाही अश्या ठेका कर्मचा-यांना ३ महिने

मातृत्वाची भरपगारी रजा देणेकामी प्रस्ताव उचित निर्णयासाठी सादर.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका येथे कार्यरत असलेल्या सर्व ठेका व कंत्राटी कर्मचा-यांना भरपगारी रजा (Paid leave) देणेबाबतचा प्रस्ताव पाहणेत आला. त्यानुसार मी श्री. गंगाथरण डी., आयुक्त तथा प्रशासक खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

1) महानगरपालिकेच्या सर्व विभागात ठेका व कंत्राटी कर्मचारी नेमले आहेत. त्यानां खालीलप्रमाणे किरकोळ रजा (Casual) व वैद्यकिय रजा खालील प्रमाणे मंजूर करण्यात येत आहेत.

अ.क्र.	रजेचा प्रकार	वार्षिक रजा
1.	किरकोळ रजा (Casual leave)	08 दिवस
2.	वैद्यकिय रजा (Medical leave)	07 दिवस

2) मातृत्व रजा (Maternity leave) ज्या कंत्राटी किंवा ठेका कर्मचा-यांना ई.एस.आय.सी. (E.S.I.C.) योजना लागू आहे. त्या कंत्राटी व ठेका कर्मचा-यांना मातृत्व रजा (Maternity leave) चे वेतन ई.एस.आय.सी. कार्यालयाकडून मिळेल. तथापि ज्या ठेका किंवा कंत्राटी कर्मचा-यांना ई.एस.आय.सी. (E.S.I.C.) योजना लागू नाही त्यांना महानगरपालिकेमार्फत तीन महिन्याची भर पगारी मातृत्व रजा (Maternity leave) मंजूर करण्यात येत आहे.

3) सदरच्या रजा हया 1 जुलै 2021 पासून लागू होतील.

आयुक्त तथा प्रशासक

वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.- पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ३०४

विभाग:- माहिती तंत्रज्ञान

दिनांक:- ०६/०७/२०२१

प्रस्तावाचा विषय:- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या विविध विभागातील नादुरुस्त झालेल्या झेरॉक्स मशीन दुरुस्त करणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेत विविध विभागात तीन ते चार वर्षापुर्वी खरेदी करण्यात आलेल्या झेरॉक्स मशिन सद्यस्थितीत नादुरुस्त झालेल्या आहेत. सदर झेरॉक्स मशिन तीन ते चार वर्षापुर्वीच्या असल्याने मशिनची वॉरंटी संपुष्टात आलेली आहे. मशीन नादुरुस्त झाल्याने महत्तवाचे दस्ताऐवज /संचिका झेरॉक्स करणेसाठी बाहेर घेऊन जावे लागतात. त्यामुळे महत्तवाचे दस्ताऐवज /संचिका गहाळ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी सदर नादुरुस्त झेरॉक्स मशिन दुरुस्त करणे गरजेचे आहे. नादुरुस्त झेरॉक्स मशिनचा तपशिल प्रढील प्रमाणे आहे.

अनु. क्र.	विभाग	कंपनी	मशीन मॉडेल नंबर	अदांजित खर्च (सर्व करांसहीत)
१	विधी विभाग	Ricoh	Aficio MP 200L2	३९,२००/-
२	अतिक्रमण विभाग प्रभाग समिती (सी)	Samsung	K2200	२५,१००/-
३	माहिती अधिकार विभाग	Xerox	Work Center 5020	२५,१००/-
४	बांधकाम विभाग प्रभाग समिती (सी)	Ricoh	Aficio MP 200L2	३९,२००/-
५	नगररचना विभाग	Xerox	Work Center 7125	२८,२००/-
६	माहिती तंत्रज्ञान विभाग	Ricoh	Aficio MP 200L2	३९,२००/-
			एकुण	**१,९६,०००/-**

उपरोक्त प्रमाणे विभागातील एकुण ६ झेरॉक्स मशिन स्पेअर पार्टससहीत दुरुस्त करणे कामी अंदाजित रु. १,९६,०००/- इतका खर्चअपेक्षितआहे. सदरचा खर्च लेखासांकेतांक क्र. ०३१-२४७२-१ माहिती तंत्रज्ञान विभाग संगणक मशिन (खरेदी) दुरुस्ती या लेखाशिर्ष अंतर्गत भागवता येईल. तरी दरपत्रके मागवून ६ झेरॉक्स मशिन दुरुस्त करणेकामी व होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस्तव सादर.

ठराव/निर्णय :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या विविध विभागातील नादुरुस्त झालेल्या झेरॉक्स मशीन दुरुस्त करणे कामी दरपत्रके मागवून एजन्सी निश्चित करणेस व होणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(प्रदिप जांभळे पाटील)
उपायुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि- पालघर, पिन नं.-४०१ ३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फक्स -०२५०-२५२५१०७
ई-मेल - vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. :- 305 **विभाग :- वाहन**

दिनांक :- ०६/०७/२०२१

प्रस्तावाचा विषय :- सन २०२० -२१,२०२१-२२ व २०२२-२३ ह्या तीन वित्तिय वर्षासाठी महानगरपालिकेस भाडेतत्वावर वाहने पुरवठा करणे.

प्रस्तावाचा मजकूर :- सन २०२०-२१, २०२१-२२ व २०२२-२३ ह्या तीन वित्तिय वर्षासाठी महानगरपालिकेस भाडेतत्वावर वाहने पुरवठा करणेकामी मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र. २३ दि.२०/०२/२०२० अन्वये मंजूरी प्राप्त झाली.प्राप्त मंजूरीन्वये दि.०९/११/२०२० रोजीच्या दै. सकाळ, दै. नवराष्ट्र, दै. जागरुक टाईम्स, दै. नवभारत, दै. मिड-डे, दै.इंडीयन एक्सप्रेस व दै.पूर्ण विराम या वृत्तपत्रांमध्ये जाहीर ई-निविदा सुचना प्रसिद्ध करुन ई-निविदा मागविण्यात आलेल्या होत्या.दिलेल्या मुदतीत एकूण ०५ई-निविदा प्राप्त झाल्या.प्राप्त ई-निविदांचा तांत्रिक बाबींचा लिफाफा क्र. १ दि.०७/१२/२०२० रोजी उघडणेत आला.त्यामध्ये मे.आदिनाथ टूर्स अँड ट्रॅव्हल्स, मे.बाबा कंन्स्ट्रक्शन्स, मे.सिताराम ट्रव्हल्स, मे.शिरिष कार्गो सर्विस प्रा.लि.व मे.पार्थ टूर्स या कंपन्यांनी भाग घेतलेला आहे.भाग घेतलेल्या कंपन्यांनी लिफाफा क्र. ०१ कागदपत्रांची पूर्तता केलेली असून दि.२२/०१/२०२१ च्या ई-निविदा समितीच्या मान्यतेने लिफाफा क्र. २ उघडणेची मान्यता दिलेली आहे.

दि.२२/०१/२०२१ रोजीच्या मा. ई-निविदा समितीच्या मान्यतेनूसार लिफाफा क्र. २ उघडणेत आला असून मे.आदिनाथ टूर्स अँड ट्रॅव्हल्स, मे.शिरिष कार्गो सर्विस प्रा.लि.व मे.पार्थ टूर्स यांची बाबनिहाय कमी दराची ई-निविदा प्राप्त झालेली होती. सदर प्राप्त झालेल्या दरामध्ये दि. ११/०२/२०२१ रोजी मा.उप.आयुक्त महोदय यांचे दालनात वाटाघाटी करणेकामी बोलविण्यात आले असता वाटाघाटीअंती कमी दराचे ई-निविदाकार यांचे खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले.

अ. क्र	वाहनाचा तपशील	दराचा तपशील	निविदाकाराचे नांव व दर (सर्व करांसहीत)			वाटाघाटी अंती कमी केलेले दर
			मे. शिरीष कॉर्गो सर्व्हिस प्रा.लि.	मे. पार्थ टूर्स	मे. आदिनाथ टूर्स अँड ट्रॅव्हल्स	
१	बोलेरो जीप (वातानुकूलित)	प्रती माह, २००० कि.मी	७०८००/-	४४९९९/-	५७०००/-	४४९९९/-
२	बोलेरो जीप (अवातानुकूलित)		६८४४०/-	४९५५८/-	५९८५०/-	४४९५०/-
३	टाटा सुमो (वातानुकूलित)		६४९००/-	४४८३९/-	५९८५०/-	४४८००/-
४	टाटा सुमो (अवातानुकूलित)		६२५४०/-	४२२२७/-	५८९०५/-	४२२००/-
५	स्विफ्ट डिझायर (वातानुकूलित)		५९०००/-	५१६६७/-	४८८२५/-	४८८००/-
६	स्विफ्ट डिझायर (अवातानुकूलित)		५६६४०/-	४७७८९/-	४५१५०/-	४५१००/-

७	इन्होवा (वातानुकूलित)	१०० कि.मी, २४ तास	५९००/-	३०६७/-	**२२०५/-**	**२२००/-**
८	इन्होवा (अवातानुकूलित)		५३१०/-	२७१३/-	**२१००/-**	**२१००/-**
९	अर्टीगा (वातानुकूलित)		४७२०/-	२३५९/-	**१८९०/-**	**१८५०/-**
१०	अर्टीगा (अवातानुकूलित)		४१३०/-	२१२३/-	**१७८५/-**	**१७५०/-**
११	युटिलिटी पिकअप	प्रती माह, २००० कि.मी	**५३१००/-**	७०२१०/-	६५८४४/-	**५३०००/-**
१२	टाटा एसई टेम्पो		**४७२००/-**	६०७७०/-	५३९२६/-	**४७०००/-**
१३	टोईंग व्हॅन २०७ (दुचाकी / चारचाकी)	प्रती दिन, १२ तास	४१३०/-	**२८९२/-**	३०६८/-	**२८९०/-**
१४	टोईंग व्हॅन ४०७ (दुचाकी / चारचाकी)		४७२०/-	३७१८/-	**३३०४/-**	**३३००/-**
१५	टोईंग व्हॅन ७०९ (दुचाकी / चारचाकी)		४७२०/-	३८९३/-	**३१८६/-**	**३१८०/-**
१६	टोईंग व्हॅन ९०९ (दुचाकी / चारचाकी)		४७२०/-	४५४४/-	**४१३०/-**	**४१००/-**
१७	टोईंग व्हॅन ११०९ (दुचाकी / चारचाकी)		**४७२०/-**	५१३४/-	५६०५/-	**४७००/-**
१८	टाटा टेम्पो ४०७		**२९५०/-**	३५३९/-	३३०४/-	**२९००/-**
१९	टाटा टेम्पो ७०९		**२९५०/-**	४४६७/-	३१८६/-	**२९५०/-**
२०	टाटा / आयशर टेम्पो १०५०		**३५४०/-**	४८३७/-	५६६४/-	**३५००/-**
२१	टाटा / आयशर टेम्पो १०९०		**३५४०/-**	५१९१/-	६४९०/-	**३५००/-**
२२	टाटा / आयशर टेम्पो ११११०		**४१३०/-**	५७७८/-	६७२६/-	**४१००/-**

उपरोक्त तक्त्यात मे.आदिनाथ टूर्स अँड ट्रॅव्हल्स, मे.शिरिष कार्गो सर्विस प्रा.लि.व मे.पार्थ टूर्स अँड ट्रॅव्हल्स यांनी वाटाघाटीअंती कमी केलेल्या दरास संदर्भ क्र. २ अन्वये संविदा करणेस मंजूरी प्राप्त झालेली आहे. प्राप्त मंजूरीच्या अनुषंगाने तीनही ई-निविदाकारांना संदर्भ क्र. ३ ने ई-निविदा स्विकारणे व संविदा करणेबाबतचे पत्र देऊन दि. ०४/०६/२०२१ पर्यंत सुरक्षा अनामत व स्टॅम्पपेपर रकमेचा भरणा करणेबाबत कळविण्यात आले. त्यानुसार मे. आदिनाथ टूर्स अँड ट्रॅव्हल्स यांनी सुरक्षा अनामत रक्कमेचा भरणा केलेला आहे. व मे.शिरिष कार्गो सर्विस प्रा.लि. यांनी काम करणेस नकार दर्शविला असुन त्याबाबत संदर्भ क्र. ४ अन्वये पत्र देऊन कळविलेले आहे. तसेच मे.पार्थ टूर्स अँड ट्रॅव्हल्स यांनी पत्र देऊनही सुरक्षा अनामत रक्कमेचा भरणा केलेला नाही. करीता संदर्भ क्र. ५ ने दि. २२/०६/२०२१ रोजी सायं. ४.०० वाजेपर्यंत सुरक्षा अनामत रक्कम भरणा करणेत यावी तसे न केल्यास आपण महापालिकेसमवेत संविदा करणेस इच्छुक नाहीत असे ग्राह्य धरुन व सदर कामाचा अपव्यय टाळणेकामी आपली ई-निविदा अमान्य करण्यात येईल. असे पत्र देण्यात आलेले होते. असे असतानाही सदर पत्रावर मे.पार्थ टूर्स अँड ट्रॅव्हल्स यांनी कोणताही प्रतिसाद दिलेला नाही.

करिता मे.आदिनाथ टूर्स अँड ट्रॅव्हल्स यांना मे.शिरिष कार्गो सर्विस प्रा.लि.व मे.पार्थ टूर्स अँड ट्रॅव्हल्स यांनी वाटाघाटीअंती कमी केलेल्या दरात काम करण्यास तयार असलेबाबत तोंडी विचारणा केली असता मे.आदिनाथ टूर्स अँड ट्रॅव्हल्स यांनी वाटाघाटीअंती कमी केलेल्या सर्व घटकांसाठी काम करण्यास सहमत असलेबाबत तोंडी कळविलेले आहे.

तरी मे.आदिनाथ टूर्स अँड ट्रॅव्हल्स यांना मे.शिरिष कार्गो सर्विस प्रा.लि. व मे.पार्थ टूर्स अँड ट्रॅव्हल्स यांनी वाटाघाटीअंती सादर केलेल्या दरानुसार काम करणेस अनुमती देणेकामी प्रस्ताव मंजूरीस्तव सविनय सादर.

ठराव :- सन २०२०-२१, २०२१-२२ व २०२२-२३ ह्या तीन वित्तिय वर्षासाठी महानगरपालिकेस भाडेतत्वावर वाहने पुरवठा करणेकामी मंजूर ई-निविदाकारांनी वाटाघाटीअंती कमी केलेल्या दरास मा. प्रशासकीय ठराव क्र. १४१, दि. ३१/०५/२०२१ अन्वये मंजूरी प्राप्त झालेली होती. परंतु, मे.शिरिष कार्गो सर्विस प्रा.लि.व मे.पार्थ टूर्स अँड ट्रॅव्हल्स यांनी सुरक्षा अनामत रक्कम भरणा न केल्यामुळे त्यांनी वाटाघाटीअंती सादर केलेल्या दरात मे. आदिनाथ टूर्स अँड ट्रॅव्हल्स यांनी काम करणेस सहमती दर्शविलेली आहे.

करिता मे.शिरिष कार्गो सर्विस प्रा.लि.व मे.पार्थ टूर्स अँड ट्रॅव्हल्स यांचे प्रशासकीय ठराव क्र. १४१, दि. ३१/०५/२०२१ मंजूर दरानुसार मे. आदिनाथ टूर्स अँड ट्रॅव्हल्स यांना काम करणेस व त्यांचे समवेत संविदा करणेस याव्दारे प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई — विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि- पालघर, पिन नं.-४०१ ३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स -०२५०-२५२५१०७
ई-मेल - vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. :- ३०६ **विभाग :- वाहन**

दिनांक :-०६/०७/२०२१

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागासाठी २० ते २५ टन क्षमतेचे १ नग एक्सकेवेटर्स (ब्रेकर सहीत) खरेदी करणेस सुधारित प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाब.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागासाठी २० ते २५ टन क्षमतेचे १ नग एक्सकेवेटर्स (ब्रेकर सहीत) खरेदी करणेकामी मा. प्रशासकीय ठराव क्र. ९७ दिनांक ०९/०९/२०२० अन्वये मंजूरी प्राप्त झालेली होती. प्राप्त मंजूरीन्वये दि.१२/११/२०२० रोजीच्या दै.सकाळ, दै.नवराष्ट्र, दै. जागरुक टाईम्स, दै. नवभारत, दै. मिड-डे, दै. इंडीयन एक्सप्रेस व दै. पूर्णविराम या वृत्तपत्रांमध्ये जाहिर ई-निविदा सुचना प्रसिध्द करुन इच्छूक निविदाकारांकडून ई-निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. दिलेल्या मुदतीत एकूण ०३ ई- निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तांत्रिक बाबींचा लिफाफा क्र. १ दि.२७/११२०२० रोजी उघडण्यात आला. लिफाफा क्र. १ मधील कागदपत्रांची पडताळणी करणेकामी मा.निविदा समिती समोर ठेवणेत आली. प्राप्त ई-निविदांमधील ०३ ई-निविदाकारांची कागदपत्र योग्य असल्याने ०३ ई-निविदा पात्र ठरवून त्यांचा आर्थिक बाबींचा लिफाफा क्र. २ उघडणेस मा.निविदा समितीने दि.०७/१२/२०२० रोजी मंजूरी दिली. प्राप्त मंजूरीन्वये दि.०८/१२/२०२० रोजी ई-निविदेचा आर्थिक बाबींचा लिफाफा क्र. २ उघडण्यात आला. त्यातील दराचा तपशील खालीलप्रमाणे :-

अ. क्र	वाहनाचा तपशील	ई-निविदाकाराचे नांव दर					
		मे. बॉम्बे जेसीबी अर्थमुव्हर्स (कराशिवाय)	मे. बॉम्बे जेसीबी अर्थमुव्हर्स (करासहित)	मे. टोटल अर्थमुव्हर्स प्रा.लि. (कराशिवाय)	मे. टोटल अर्थमुव्हर्स प्रा.लि. (करासहित)	मे. ह्युंडाई कंन्स्ट्रक्शन्स इक्युपमेंटस प्रा.लि. (कराशिवाय)	मे. ह्युंडाई कंन्स्ट्रक्शन्स इक्युपमेंटस प्रा.लि. (करासहित)
१	२० टन एक्सकेवेटर्स	N.Q	N.Q	N.Q	N.Q	N.Q	N.Q
२	२०.५ टन एक्सकेवेटर्स	५२४८३२५/-	६१९३०२३.५०/-	५३५३०५०/-	६३१६५९९/-	N.Q	N.Q
३	२१ टन एक्सकेवेटर्स	N.Q	N.Q	N.Q	N.Q	४९५७३३६/-	५८४९६५६.४८/-
४	२१.५ टन एक्सकेवेटर्स	N.Q	N.Q	N.Q	N.Q	५०१७८७१/-	५९२१०८७.७८/-
५	२२ टन एक्सकेवेटर्स	N.Q	N.Q	N.Q	N.Q	५०९७३१६/-	६०१४८३२.८८/-
६	२२.५ टन एक्सकेवेटर्स	N.Q	N.Q	N.Q	N.Q	N.Q	N.Q
७	२३ टन एक्सकेवेटर्स	N.Q	N.Q	N.Q	N.Q	N.Q	N.Q
८	२३.५ टन एक्सकेवेटर्स	N.Q	N.Q	N.Q	N.Q	N.Q	N.Q

९	२४ टन एक्सकेवेटर्स	N.Q	N.Q	N.Q	N.Q	N.Q	N.Q
१०	२४.५ टन एक्सकेवेटर्स	N.Q	N.Q	N.Q	N.Q	N.Q	N.Q
११	२५ टन एक्सकेवेटर्स	N.Q	N.Q	N.Q	N.Q	N.Q	N.Q

उपरोक्त तक्त्याचे परिक्षण केले असता अ.क्र.२) मध्ये नमुद २०.५ टन एक्सकेवेटर्स या यंत्रसामुग्रीसाठी **मे. बॉम्बे जेसीबी अर्थमुव्हर्स व मे. टोटल अर्थमुव्हर्स प्रा.लि.** अ.क्र. ३) २१ टन एक्सकेवेटर्स अ.क्र. ४) २१.५ टन एक्सकेवेटर्स व अ.क्र. ५) २२ टन एक्सकेवेटर्स या यंत्रसामुग्रीसाठी **मे. ह्युंडाई कंन्स्ट्रक्शन्स इक्युपमेंटस प्रा.लि.** यांनी दर भरलेले दिसून येत आहेत. भाग घेतलेल्या ई-निविदा धारकांने सादर केलेले दराचे परिक्षण केले असता महानगरपालिकेने मागविण्यात आलेल्या २० ते २५ टन क्षमतेच्या एक्सकेवेटर्स मध्ये महापालिकेस लागणाऱ्या एक्सकेवेटर्सची क्षमता ही २० ते २१ टनापर्यंत असल्यास ती महानगरपालिकेच्या कामकाजासाठी पूरक आहे. असे मा.आयुक्त तथा अध्यक्ष यांचेमत आहे. तसेच २० ते २१ टन क्षमतेच्या एक्सकेवेटर्स मधील वैशिष्टये व तांत्रिक बाबींचा विचार करता ती समान आहेत. व त्यात फारसा फरक दिसून येत नाही. असे यांत्रिकी अभियंता यांचे मत आहे. करिता मा.अति.आयुक्त महोदय यांचे सुचनेनुसार दि./१२/२०२० रोजी प्राप्त कमी दराचे ई-निविदाकार मे.ह्युंडाई कंन्स्ट्रक्शन्स इक्युपमेंटस प्रा.लि. यांना वाटाघाटी करणेकामी मा.अति.आयुक्त महोदय यांचे दालनात बोलविण्यात आलेले होते. वाटाघाटीअंती मे. ह्युंडाई कंन्स्ट्रक्शन्स इक्युपमेंटस प्रा.लि. यांनी सादर केलेल्या दरातच काम करण्यास सहमती दर्शविली. तरी वाटाघाटीअंती प्राप्त झालेले दर खालीलप्रमाणे :-

अ.क्र	वाहनाचा तपशील	ई-निविदाकाराचे नांव व दर (सर्व करांसहीत)	
		मे. ह्युंडाई कंन्स्ट्रक्शन्स इक्युपमेंटस प्रा.लि.	मे. ह्युंडाई कंन्स्ट्रक्शन्स इक्युपमेंटस प्रा.लि. यांचे वाटाघाटीअंती कमी केलेले दर
१	२१ टन एक्सकेवेटर्स	४९५७३३६/- (कराशिवाय)	४९५७३३६/- (कराशिवाय)
		५८४९६५६.४८/- (सर्वकरासहीत)	५८४९६५६.४८/- (सर्वकरासहीत)

वरीलप्रमाणे मे. ह्युंडाई कंन्स्ट्रक्शन्स इक्युपमेंटस प्रा.लि. यांनी वाटाघाटी अंती दर सादर केलेले आहेत. मे. ह्युंडाई कंन्स्ट्रक्शन्स इक्युपमेंटस प्रा.लि. यांचे कमी दरास व त्यांचे समवेत संविदा करणेस प्रशासकिय ठराव क्र. ३२४, दि. ०१/०१/२०२१ रोजी मान्यता प्राप्त झालेली आहे. परंतु ई-निविदा कामाची मान्यता घेतेवेळीस र.रु. ५५,००,०००/- रकमेस प्रशासकिय व वित्तीय मान्यता घेणेत आलेली होती.

तरी मे. ह्युंडाई कंन्स्ट्रक्शन्स इक्युपमेंटस प्रा.लि. यांचेसमवेत संविदा करणेस प्राप्त झालेल्या प्रशासकिय ठराव क्र. ३२४, दि. ०१/०१/२०२१ च्या मान्यतेस सुधारित प्रशासकिय व वित्तीय मंजूरी मिळणेस सदरचा प्रस्ताव मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे मंजूरीस्तव सविनय सादर.

ठराव :- वसई-विरार शहर घनकचरा व्यवस्थापन विभागासाठी २० ते २५ टन क्षमतेचे १ नग एक्सकेवेटर्स (ब्रेकरसहीत) खरेदी करणेकामी मे. ह्युंडाई कंन्स्ट्रक्शन्स इक्युपमेंटस प्रा.लि. यांचेसमवेत संविदा करणेस प्राप्त झालेल्या प्रशासकिय ठराव क्र. ३२४, दि. ०१/०१/२०२१ च्या मान्यतेस सुधारित प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ३०७ विभाग :- सार्व. बांधकाम विभाग
दिनांक :-०६/०७/२०२१

प्रस्तावाचा विषय :- प्रभाग समिती "जी" मधील वॉर्ड क्र. ८९ मध्ये कामण येथे समाज मंदिर बांधणे कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करून संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :-

१) अंदाजपत्रकीय रक्कम :- रु. ४६,०४,७११/-
२) प्रशासकीय मान्यता (महानगरपालिका) :- मा. स्थायी समिती सभा विषय क्र. १५ दि. ११/०९/२०१९
३) तांत्रिक मान्यता :- I/०७/६५/२०१९-२० दि. ११/०९/२०१९
४) तांत्रिक मान्यतेअंती अंदाजपत्रकीय रक्कम:- रु. ४३,७१,५६१/-
५) ई - टेंडरींग द्वारे निविदा प्रसिद्धी :- वविशम/शअ/बांध/५६७/१९-२० दि. १७/०९/२०१९
६) वृत्तपत्रातील प्रथम वेळ जाहिर निविदा सुचना प्रसिध्दी :- १) दै. पुर्णविराम २) दै. प्रहार ३) दै. मिड डे दि. १८/०९/२०१९
७) ई - टेंडरींग द्वारे निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा) :- दि. ३१/१०/२०१९
८) विहीत मुदतीत ऑनलाईन प्रक्रियेद्वारे प्राप्त निविदा :- ०४
९) प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी :- मा. शहर अभियंता
१०) ई - टेंडरींग द्वारे निविदा उघडण्याची दिनांक (व्दितीय लखोटा) :- दि. २१/१२/२०१९
११) विहीत मुदतीत ऑनलाईन प्रक्रियेद्वारे पात्र निविदाकार :- ०३

प्राप्त निविदा निविदासमिती पुढे उघडल्या असता त्याचे दर खालीलप्रमाणे आहेत.

अ.क्र	निविदा धारकाचे नाव	निविदा दर
१	**मे. अंजनी कंन्स्ट्रक्शन**	**१.१०% कमी दराने**
२	मे. आयुष कंन्स्ट्रक्शन	०.५०% जादा दराने
३	मे. सुरेश एंन्टरप्रायजेस	२.०० % जादा दराने

उपरोक्त तक्त्याचे अवलोकन केले असता **मे. अंजनी कंन्स्ट्रक्शन** यांच्या निविदेतील अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.१० % कमी दराचा देकार हा इतर निविदा दरापेक्षा कमी असून परफॉरमन्स सिक्युरीटी डिपॉझीटचा डि.डि पावती क्र. ३५६२०७ दि. ०१/०१/२०२० ने मनपा फंडात जमा करण्यात आला आहे

सदर निविदेकरीता निविदा समितीने दि. १४/०१/२०२० रोजीच्या बैठकीत **मे. अंजनी कंन्स्ट्रक्शन** यांच्या १.१० % कमी दरास मंजुरीकरीता शिफारस केलेली आहे.

मे. अंजनी कंन्स्ट्रक्शन यांनी दिलेला देकार योग्य व वाजवी असल्यामुळे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार **मे. अंजनी कंन्स्ट्रक्शन** यांच्याशी कामाची संविदा करणेस मान्यता देणेसाठी व वित्तीय मान्यतेस्तव मा.आयुक्त तथा प्रशासक सो, यांच्या मंजूरीस्तव सादर.

ठराव :- उपरोक्त कामी **मे. अंजनी कंन्स्ट्रक्शन** यांच्या १.१० % कमी दराच्या निविदेस निविदा समितीने मान्यता दिली असून महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम ७३ (क) अन्वये मा. आयुक्त सो. यांनी मंजूरी दिली आहे. सदर कामी मनपा तर्फे कायदेशिर बाबींची पुर्तता करुन संविदा करण्यास मा.आयुक्त तथा प्रशासक सो, यांची मंजूरी असे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि-पालघर, पिन नं.४०१३०५
दूरध्वनी-०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स-०२५०-२५२५१०७
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. 308 विभाग: पाणी पुरवठा
दिनांक: ६/७/२०२१

प्रस्तावाचा विषय:- प्रभाग समिती 'एच' अंतर्गत नवघर माणिकपूर अंतर्गत उमेळा फाटा घाटाळनगर जवळ उघाडी जवळील नाल्यावरील (कल्वर्ट नं-१) ३०० मी.मी. २०० व्यासाची एम.एस व १०० मी.मी व्यासाच्या जी.आय.जलवाहीनी, ऐवजी एम.एस.जलवाहीनी नाला रुदींच्या काममुळे बाजुने अंथरणे कामी येणा-या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणे आणि पॅनलवरील नियुक्त केलेल्या ठेकेदारास कार्यादेश देणेस मंजूरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर:वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'एच' अंतर्गत नवघर माणिकपूर अंतर्गत उमेळा फाटा घाटालनगर जवळ नाला आहे. सदर नाल्यावर उमेळा टाकीला जाणारी ३०० मी.मी.व्यासाची जलवाहीनी अंथरणेत आलेली असून तसेच २०० मी.मी.व्यासाची उमेळा नायगाव वडवली पाली या ६९ गावाच्या योजनेतून उभारण्यात आलेल्या टाक्यांची मुख्य जलवाहीनी (फिडर मेन) जलवाहीनी आहे. तसेच घाटालनगर परीसरास पाणी वितरण करणारी १०० मी.मी.व्यासाची वितरण वाहीनी अंथरणेत आलेली आहे.सदर नाला असलेल्या भाग हा सखल असल्याने आणि नाला अरुंद असल्याने विशेषत: अतिवृटीत पाणी साचून पुर परिस्थिती निमार्ण होते. त्यामुळे नाल्याचे रुंदी करणीचे काम शासनाच्या सार्व. बांधकाम विभागा वसई मार्फत करणेत येणार असल्याने नाल्यावरील जलवाहीनी हलविणे गरजेचे आहे.त्यामुळे सदर जलवाहीनी या नाल्याच्या बाजुलाच थोड्याशा अंतरावर सिमेटचे खांब (चेअर्स) उभारुन त्यावरुन अंथरणेत येणार आहे.त्यानुसार सदर काम प्रस्तावित करण्यात आलेले आहे. सदर काम मा.स्थायी समिती सभा दि.०५/०९/२०१९ चा विषय क्र.२७ अन्वये पाणी पुरवठा विभाग मुख्यालया कडील मंजूर वार्षिक ठेका सन-२०१९/२०,२०२०/२१ व २०२१/२२ या वित्तीय वर्षात महापालिका कार्यक्षेत्रात आवश्यकते नुसार विविध व्यासाच्या पाईप लाईन अंथरणे या ठेक्यातील पॅनल वरील ठेकेदाराकडून काम करून घेणे शक्य आहे.

त्यानुसार सदर ठिकाणी जलवाहीनी अंथरणे कामी मंजूर असलेल्या निविदे अंतर्गत पॅनल वरील मंजूर ठेकेदार मे.---मे. आर. जी. कॉन्ट्रक्टर्स--- यांना या कामी कार्यादेश देउन काम करून घेणेस व मंजूर निविदा दरा नुसार येणा-या र.रु.११५४८२८/- या अंदाजपत्रकीय खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणे मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणे मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.....

ठराव :

वरील प्रमाणे अंदाज पत्रकास सक्षम तांत्रिक मान्यता घेउन प्रभाग समिती 'एच नवघर माणिकपूर अंतर्गत उमेळा फाटा घाटाळनगर जवळ उघाडी जवळील नाल्यावरील (कल्वर्ट नं-१) ३०० मी.मी. २०० व्यासाची एम.एस व १०० मी.मी व्यासाच्या जी.आय.जलवाहीनी ऐवजी एम.एस.जलवाहीनी नाला रुदीच्या काममुळे बाजुने अंथरणे कामी, सन-२०१९/२०,२०२०/२१ व २०२१/२२ या वित्तीय वर्षात महापालिका कार्यक्षेत्रात आवश्यकते नुसार विविध व्यासाच्या पाईप लाईन अंथरणे या ठेक्यातील पॅनल वरील मंजूर ठेकेदार मे.---मे. आर. जी. कॉन्ट्रक्टर्स--- यांना निविदा मंजूर दराने काम करणेसाठी कार्यादेश देणेस व त्यानुसार येणा-या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

(गंगाथरन डी.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगर पालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि-पालघर, पिन नं.४०१३०५
दूरध्वनी-०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स-०२५०-२५२५१०७
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ३०९ **विभाग: पाणी पुरवठा**
दिनांक: ६/७/२०२१

प्रस्तावाचा विषय:- प्रभाग समिती 'एच' अंतर्गत नवघर माणिकपूर अंतर्गत चुळणे कौलसिटी येथिल सिद्धीविनायक नगर मधील निवाण स्काय बिल्डींग जवळ असलेल्या नाल्यावरील ३०० व २५० मी.मी. व्यासाची एम.एस जलवाहीनी शिफ्ट करणे कामी येणा-या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणे आणि पॅनलवरील नियुक्त केलेल्या ठेकेदारास कार्यादेश देणेस मंजूरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर:वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'एच' अंतर्गत नवघर माणिकपूर अंतर्गत चुळणे कौल सिटी मध्ये सिध्दीविनायक नगर असून सदर नगरातील निवाण स्काय इमारती जवळ एक नाला आहे या नाल्यावरुन ३०० मी.मी. व २५० मी.मी.व्यासाची कौल सिटी टाकीवरुन निघणारी वितरण जलवाहीनी अंथरणेत आलेली आहे.या जलवाहीनी द्वारे संपुर्ण सिध्दीविनायक नगर आणि चुळणा गाव परीसरास पाणी पुरवठा करणेत येत आहे.सदर नाल्याचे स्वरुप हे एका पाईपच्या स्वरुपात असून महापालिकेमार्फत नाल्याचे रुपातंर स्लॅबच्या नाल्यात करणेत येणार असल्याने नाल्यावरील जलवाहीनी हलविणे गरजेचे आहे.त्यानुसार सदर काम प्रस्तावित करण्यात आलेले आहे. सदर काम मा.स्थायी समिती सभा दि.०५/०९/२०१९ चा विषय क्र.२७ अन्वये पाणी पुरवठा विभाग मुख्यालया कडील मंजूर वार्षिक ठेका सन-२०१९/२०,२०२०/२१ व २०२१/२२ या वित्तीय वर्षात महापालिका कार्यक्षेत्रात आवश्यकते नुसार विविध व्यासाच्या पाईप लाईन अंथरणे या ठेक्यातील पॅनल वरील ठेकेदाराकडून काम करुन घेणे शक्य आहे.

त्यानुसार सदर ठिकाणी जलवाहीनी अंथरणे कामी मंजूर असलेल्या निविदे अंतर्गत पॅनल वरील मंजूर ठेकेदार मे.---------- यांना या कामी कार्यादेश देउन काम करुन घेणेस व मंजूर निविदा दरा नुसार येणा-या र.रु.२४९७९००/- या अंदाजपत्रकीय खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणे मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणे मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.....

ठराव :

वरील प्रमाणे अंदाज पत्रकास सक्षम तांत्रिक मान्यता घेउन सदर जलवाहीनी अंथरणे कामी प्रभाग समिती 'एच' अंतर्गत चुळणे कौलसिटी येथिल सिद्धीविनायक नगर मधील निवाण स्काय बिल्डींग जवळ असलेल्या नाल्यावरील ३०० व २५० मी.मी. व्यासाची एम.एस जलवाहीनी शिफ्ट करणे कामी सन-२०१९/२०,२०२०/२१ व २०२१/२२ या वित्तीय वर्षात महापालिका कार्यक्षेत्रात आवश्यकते नुसार विविध व्यासाच्या पाईप लाईन अंथरणे या ठेक्यातील पॅनल वरील मंजूर ठेकेदार मे.---------- यांना निविदा मंजूर दराने काम करणेसाठी कार्यादेश देणेस व त्यानुसार येणा-या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

(गंगाथरन डी.) 29/6/2021
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगर पालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि-पालघर, पिन नं.४०१३०५
दूरध्वनी-०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स-०२५०-२५२५१०७
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ३१० : विभाग: पाणी पुरवठा
: दिनांक: ६ / ७ / २०२१

प्रस्तावाचा विषय:- प्रभाग समिती 'एच' अंतर्गत नवघर माणिकपूर अंतर्गत उमेळा स्मशानभूमी जवळ उघाडी जवळील नाल्यावरील (कल्वर्ट नं-२) ३०० मी.मी. २५० व २०० मी.मी व्यासाच्या एम.एस.जलवाहीन्या नाला रुदीच्या काममुळे बाजुने अंथरणे कामी येणा-या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणे आणि 'पॅनलवरील नियुक्त केलेल्या ठेकेदारास कार्यादेश देणेस मंजूरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर:वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती प्रभाग समिती 'एच' अंतर्गत नवघर माणिकपूर अंतर्गत उमेळा स्मशानभूमी जवळ नाला आहे. सदर नाल्यावर उमेळा टाकीला जाणारी ३०० मी.मी.व्यासाची जलवाहीनी अंथरणेत आलेली असून २५० मी.मी.व्यासाची उमेळा गाव नायगाव स्टेशन परीसर या भागात पाणी पुरवठा करणारी जलवाहीनी तसेच २०० मी.मी.व्यासाची उमेळा नायगाव वडवळी पाली या ६९ गावाच्या योजनेतून उभारण्यात आलेल्या टाक्यांची मुख्य जलवाहीनी (फिडर मेन) जलवाहीनी आहे..सदर नाला असलेल्या भाग हा सखल असल्याने आणि नाला अरुंद असल्याने विशेषत: अतिवृटीत पाणी साचून पुर परिस्थिती निमार्ण होते. त्यामुळे नाल्याचे रुंदी करणेचे काम शासनाच्या सार्व. बांधकाम विभागा वसई मार्फत करणेत येणार असल्याने नाल्यावरील जलवाहीनी हलविणे गरजेचे आहे.त्यामुळे सदर जलवाहीनी या नाल्याच्या बाजुलाच थोड्याशा अंतरावर सिमेटचे खांब (चेअर्स) उभारुन त्यावरुन अंथरणेत येणार आहे.त्यानुसार सदर काम प्रस्तावित करण्यात आलेले सदर काम मा.स्थायी समिती सभा दि.०५/०९/२०१९ चा विषय क्र.२७ अन्वये पाणी पुरवठा विभाग मुख्यालया कडील मंजूर वार्षिक ठेका सन-२०१९/२०,२०२०/२१ व २०२१/२२ या वित्तीय वर्षात महापालिका कार्यक्षेत्रात आवश्यकते नुसार विविध व्यासाच्या पाईप लाईन अंथरणे या ठेक्यातील पॅनल वरील ठेकेदाराकडून काम करुन घेणे शक्य आहे.

त्यानुसार सदर ठिकाणी जलवाहीनी अंथरणे कामी मंजूर असलेल्या निविदे अंतर्गत पॅनल वरील मंजूर ठेकेदार मे.---आर. बी. कन्स्ट्रक्शन---- यांना या कामी कार्यादेश देउन काम करून घेणेस व मंजूर निविदा दरा नुसार येणा-या र.रु.१४२७२०८/- या अंदाजपत्रकीय खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणे मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या 'आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणे मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.....

ठराव :

वरील प्रमाणे अंदाज पत्रकास सक्षम तांत्रिक मान्यता घेउन प्रभाग समिती 'एच नवघर माणिकपूर अंतर्गत उमेळा स्मशानभूमी जवळ उघाडी जवळील नाल्यावरील (कल्वर्ट नं-२) ३०० मी.मी. २५० व २०० मी.मी व्यासाच्या एम.एस.जलवाहीन्या नाला रुदीच्या काममुळे बाजुने अंथरणे कामी सन-२०१९/२०,२०२०/२१ व २०२१/२२ या वित्तीय वर्षात महापालिका कार्यक्षेत्रात आवश्यकते नुसार विविध व्यासाच्या पाईप लाईन अंथरणे या ठेक्यातील पॅनल वरील मंजूर ठेकेदार मे.-आर. बी. कन्स्ट्रक्शन---------- यांना निविदा मंजूर दराने काम करणेसाठी कार्यादेश देणेस व त्यानुसार येणा-या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

(गणेशन एस.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगर पालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि-पालघर, पिन नं.४०१३०५
दूरध्वनी-०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स-०२५०-२५२५१०७
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. 399

विभाग: पाणी पुरवठा
दिनांक: ६ / १० / २०२१

प्रस्तावाचा विषय:- प्रभाग समिती 'एंच' अंतर्गत नवघर माणिकपूर अंतर्गत नायगाव ओवर ब्रीज जवळ उघाडी जवळील नाल्यावरील २५० मी.मी व २०० मी.मी व्यासाच्या एम.एस.जलवाहीन्या नाला रुदीच्या काममुळे बाजुने अंथरणे कामी येणा-या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणे आणि पॅनलवरील नियुक्त केलेल्या ठेकेदारास कार्यादेश देणेस मंजूरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर:वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'एच' अंतर्गत नवघर माणिकपूर अंतर्गत नायगाव ओवर ब्रीज जवळ नाला आहे. सदर नाल्यावर २५० मी.मी.व्यासाची उमेळा नायगाव स्टेशन परीसर या भागात पाणी पुरवठा करणारी जलवाहीनी तसेच २०० मी.मी.व्यासाची उमेळा नायगाव वडवळी पाली या ६९ गावाच्या योजनेतून उभारण्यात आलेल्या टाक्यांची मुख्य जलवाहीनी (फिडर मेन) जलवाहीनी आहे..सदर नाला असलेल्या भाग हा सखल असल्याने आणि नाला अरुंद असल्याने विशेषत: अतिवृटीत पाणी साचून पुर परिस्थिती निमार्ण होते. त्यामुळे नाल्याचे रुंदी करणेचे काम शासनाच्या सार्व. बांधकाम विभागा वसई मार्फत करणेत येणार असल्याने नाल्यावरील जलवाहीनी हलविणे गरजेचे आहे.त्यामुळे सदर जलवाहीनी या नाल्याच्या बाजुलाच थोड्याशा अंतरावर सिमेटचे खांब (चेअर्स) उभारुन त्यावरुन अंथरणेत येणार आहे.त्यानुसार सदर काम प्रस्तावित करण्यात आलेले आहे. सदर काम मा.स्थायी समिती सभा दि.०५/०९/२०१९ चा विषय क्र.२७ अन्वये पाणी पुरवठा विभाग मुख्यालया कडील मंजूर वार्षिक ठेका सन-२०१९/२०,२०२०/२१ व २०२१/२२ या वित्तीय वर्षात महापालिका कार्यक्षेत्रात आवश्यकते नुसार विविध व्यासाच्या पाईप लाईन अंथरणे या ठेक्यातील पॅनल वरील ठेकेदाराकडून काम करून घेणे शक्य आहे.

सन २०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४ या त्रैवार्षिक वर्षाकरिता महानगरपालिकेच्या मालकीचे वाहने दुरूस्ती करणेबाबत दि.०४/०२/२०२१ रोजी निविदा मंजूर झाली असून मे.के.एल. इंटरप्रायजेस, वसई पूर्व यांच्यासोबत करारनामा करण्यात आलेला आहे. या करारनाम्याद्वारे कचरा वाहतुक साठी आवश्यक असणाऱ्या सर्व वाहनांची देखभाल व दुरूस्ती विहित कार्यपध्दतीने करता येणे शक्य आहे. त्याकरिता अर्थसंकल्पात रु.५ कोटी इतकी तरतुद करण्यात आलेली आहे.

१२) विभागातील कॉम्पॅक्टर, टिपर, डंपर याची संख्या व त्यानुषंगाने प्रभाग निहाय होणारा मासिक व वार्षिक अंदाजीत खर्च पुढील तक्त्याप्रमाणे होईल.

तक्ता – ७

(डिझेल दर रु.९२/- प्रती लिटर प्रमाणे)

अ.क्र.	प्रभाग समिती	कॉम्पॅक्टरची संख्या	टिपरची संख्या	डंपरची संख्या	ट्रॅक्टरची संख्या	मासिक अंदाजीत डिझेल खर्च (रु.लाखात)	वार्षिक अंदाजीत डिझेल खर्च (रु.लाखात)
१	A	८	१४	२	२	८.४०	१००.८०
२	B	१०	१५	२	१	६.९०	८२.८०
३	C	५	१२	४	१	६.९०	८२.८०
४	D	११	१५	३	१	१०.५०	१२६
५	E	५	१२	६	१	७.८०	९३.६०
६	F	७	१४	१	७	९.००	१०८
७	G	७	१३	६	२	९.४५	११३.४०
८	H	८	१३	२	१	७.९५	९५.४०
९	I	४	१२	४	३	६.९०	८२.८०
Total						**७३.८०**	**८८५.६०**

उपरोक्त तक्त्याप्रमाणे डिझेलचा मासिक खर्च साधारणत: ८० ते ९० लक्ष होणार असून वार्षिक अंदाजीत खर्च तात्कालिक दर वाढी लक्षात घेता अंदाजीत रु. १० कोटी इतका होण्याची शक्यता आहे. या संदर्भात वापर झालेल्या डिझलेचे प्रमाणिकरण संबंधीत वरिष्ठ आरोग्य निरीक्षक, प्रभाग समिती यांनी करुन तद्नंतर त्याचा देयकात समावेश करावा.

१३) सदरची वाहने हि महानगरपालिकेकडून पुरविण्यात येणार आहेत. त्यामध्ये जुन्या आणि नव्या अशा स्वरुपात वाहने उपलब्ध आहेत. त्यामुळे त्यांचे भाडे मुल्यनिर्धारण उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून निश्चित करुन दर प्राप्त झाल्यास त्याची शहानिशा करुन महानगरपालिका दर निश्चित करेल. त्या दराने पात्र ठेकेदारा सोबत वाहनभाडे करारनामा करण्यात येईल व तो सदर करारनामा ठेकेदारास बंधनकारक असेल.

तसेच यामध्ये काही वाहने दुरूस्ती व देखभाल अभावी काही काळासाठी कार्यान्वीत नसल्यास दरम्यानच्या काळावधीत परिवहन विभागाने मोठया वाहनांकरिता प्रती दिन निश्चत केलेल्या भाडे दरानुसार (**उदा. १ डंपर प्रति दिन भाडे रु.६,०००/- प्रमाणे**) ठेकेदाराने वाहन उपलब्ध करुन द्यावे. त्याने वापर केलेल्या दिवसाप्रमाणे वरिष्ठ आरोग्य निरीक्षकांमार्फत प्रमाणित करुन भाडे अदायगी करण्यात येईल.

१४) कर्मचाऱ्यांना देण्यात येणारी साधने जसे की, रेनकोट, टिकाव, फावडे, घमेले, मास्क, हातमोजे, गमबुट, गणवेश आदी बाबी महानगरपालिकेकडून कर्मचाऱ्यांना पुरविण्यात येणार असल्याने त्याची स्वतंत्र निविदा प्रक्रिया चालू आहे.

१५) सदर निविदा हि पुढील ५ वर्षाकरिता करण्यात यावी. त्यामध्ये कोणताही ठेकेदार विभागाच्या पूर्व परवानगी शिवाय कर्मचाऱ्यांचो संख्या कमी - अधिक करु शकणार नाही.

१६) सबब प्रभाग निहाय स्वतंत्र निविदेचा खर्च पुढीलप्रमाणे राहील.

अ.क्र	प्रभाग समिती	कामगारांवरील होणारा वार्षिक खर्च	डिझेलवर होणारा वार्षिक खर्च	एकुण वार्षिक खर्च	एकुण पंचवार्षिक खर्च
१	A	रु.१२,५४,५७,२०४/-	रु.१,००,८०,०००/-	रु.१३,५५,३७,२०४/-	रु.६७,७६,८६,०२०/-
२	B	रु.१,७५,२३,२५,६८/-	रु.८२,८०,०००/-	रु.१८,३५,१२,५६८/-	रु.९१,७५,६२,८४०/-
३	C	रु.१०,५०,८१,३२४/-	रु.८२,८०,०००/-	रु.११,३३,६१,३२४/-	रु.५६,६८,०६,६२०/-
४	D	रु.१२,८३,६८,०४४/-	रु.१,२६,००,०००/-	रु.१४,०९,६८,०४४/-	रु.७०,४८,४०,२२०/-
५	E	रु.१२,७२,०३,७०८/-	रु.९३,६०,०००/-	रु.१३,६५,६३,७०८/-	रु.६८,२८,१८,५४०/-
६	F	रु.१७,६९,७९,०७२/-	रु.१,०८,००,०००/-	रु.१८,७७,७९,०७२/-	रु.९३,८८,९५,३६०/-
७	G	रु.१५,२५,२८,०१६/-	रु.१,१३,४०,०००/-	रु.१६,३८,६८,०१६/-	रु.८१,९३,४०,०८०/-
८	H	रु.१२,१६,७३,११२/-	रु.९५,४०,०००/-	रु.१३,१२,१३,११२/-	रु.६५,६०,६५,५६०/-
९	I	रु.११,४१,०४,९२८/-	रु.८२,८०,०००/-	रु.१२,२३,८४,९२८/-	रु.६१,१९,२४,६४०/-
TOTAL		**रु.१२२,६६,२७,९७६/-**	**रु.८,८५,६०,०००/-**	**रु.१३१,५१,८७,९७६/-**	**रु.६५७,५९,३९,८८०/-**

१७)निविदेअंती पात्र ठेकेदारांना शासकीय वजावटींमध्ये वाढ / घट व कामगारांच्या वेतनातील शासनमान्य वाढ अनुज्ञेय राहील.

उपरोक्त प्रस्तावास मान्यता मिळावी व पुढील निविदा प्रक्रिया करणेकामी आदेश होणेकरिता सदरचा प्रस्ताव सादर.

ठराव **निर्णय :-**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापना अंतर्गत दैनंदिन रस्ते सफाई, गटार सफाई, कचरा संकलन करुन क्षेपणभूमीवर वाहतुक करणे या कामासाठी नविन निविदा काढुन एजन्सी नियुक्त करणे तसेच त्याकामी होणाऱ्या प्रस्तावातील पंचवार्षिक खर्च तसेच निविदेअंती मंजूर होणारा ठेकेदाराचा नफा इत्यादी खर्चास **कार्यादेश दिल्यापासुन पुढील ५ वर्षाकरिता (सन २०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५, २०२५-२६ या वित्तीय वर्षाकरिता)** प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. तसेच सदर कामासाठी वापरण्यात येणाऱ्या महानगरपालिकेच्या वाहनांची देखभाल दुरूस्ती करणेकामी परिवहन विभागामार्फत नियुक्त ठेकेदारा करवी करण्यात यावी. सदर कामाची देखरेख व नियंत्रणा करिता ९ प्रभाग निहाय मॅकेनिकल इंजिनिअर्सची नियुक्ती आस्थापना विभागामार्फत करण्यात यावी.

कचरा संकलना करिता मनपा मार्फत देण्यात येणाऱ्या वाहनांचे इंधन खर्च मनपाकडून देण्यात येईल. तसेच वाहन बिघाड झाल्यास दरम्यानच्या कालावधीत ठेकेदाराने वाहन उपलब्ध करुन दिल्यास त्यास निर्धारीत दराने महापालिकेकडून भाडे अदायगी करण्यात येईल. तसेच सफाईसाठी लागणाऱ्या वाहनांची व साफसफाई साहित्य, रेनकोट, गमबुट, गणवेशांची स्वतंत्र निविदा प्रक्रिया करुन खरेदी करणेस आहे.

(गंगाथरन डी)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.पालघर, पिन नं.४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५० २५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई- मेल vasaivirarcorporation@yahoo.com

विभाग :- सार्व.बांधकाम विभाग

प्रशासकीय ठराव क्र. ३४८ दिनांक : १४/०७/२०२१

---

१) प्रस्तावाचा विषय :- **वसई - विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "ए" अंतर्गत वॉर्ड क्र.३ मध्ये चिखलडोंगरी पाण्याची टाकी येथे १०० मी.मी. व्यासाची ७३ मी. लांब M.S. जलवाहिनी अंथरणे कामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.**

२) प्रस्तावाचा मजकूर :- वसई - विरार कार्यक्षेत्रातील वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'ए' अंतर्गत वॉर्ड क्र.३ मध्ये चिखलडोंगरी परिसरात दैनंदिन पाणी पुरवठ्यासाठी M.S. प्रकारची जलवाहिनी अस्तित्वात असून सद्य: स्थिती ती जमिनीत खोल गेली आहे. तसेच काही भागात सतत पाण्यखाली राहिल्याने जलवाहिनीस गंज लागून ती वारंवार नादुरुस्त होते. अस्तित्वातील जलवाहिनी खोलवर असल्याने गळती लागल्यास ती दुरुस्त करणे कठीण व अशक्य होते. त्यामुळे नागरीकांना अखंडीत व सुरळीत पाणी पुरवठा करणे शक्य होत नाही. त्यामुळे सदर जलवाहिनी ही वरच्या बाजूस नव्याने अंथरणे आवश्यक आहे.

उपरोक्त नमुद ठिकाणी प्रभाग समिती अे मध्ये वॉर्ड क्र.३ मध्ये चिखलडोंगरी पाण्याची टाकी येथे १०० मी.मी. व्यासाची ७३ मी. लांब M.S. जलवाहिनी अंथरणेचे काम करावयाचे आहे. याकरिता पाणीपुरवठा संबंधीत कामाचे सन २०१९-२० या वित्तीय वर्षाचे पाणीपुरवठा विभाग राज्य दर सुचीनुसार अंदाजपत्रक बनविण्यात आले आहे.

सदर कामी राज्य दरसुची सन २०१९-२० नुसार पुढीलप्रमाणे काम करणे आवश्यक आहे.

अंतर्भूत बाब	अंदाजित खर्च
पाण्याची टाकी येथे १०० मी.मी. व्यासाची ७३ मी. लांब M.S. जलवाहिनी अंथरणे.	रु.२,८०,२९५/-

३) ठराव :- सबब उपरोक्त नमुद प्रभाग समिती ए अंतर्गत वॉर्ड क्र.३ मध्ये चिखलडोंगरी पाण्याची टाकी येथे १०० मी.मी. व्यासाची ७३ मी. लांब M.S. जलवाहिनी अंथरणे कामी महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४९ व (६८ (१), ६९ (१) व (२) मा.आयुक्तांचे आदेशान्वये मला प्रदान केलेल्या अधिकारानुसार सदर कामास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

उप- आयुक्त
परिमंडळ क्र.१
वसई - विरार शहर महानगरपालिका

वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ३४९

विभाग : वैद्यकीय आरोग्य

दिनांक :१४/०७/२०२१

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या अंतर्गत कौलसिटी वसई (प.) येथिल समर्पित कोवीड रुग्णालयातील इमारतीमध्ये ऑक्सिजन पाईप लाईन फिटिंग साहित्यासह खरेदी करणेस आदेश देणेकामी प्रशासकिय व वित्तिय मंजूरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात २ रुग्णालये, २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, ३ माताबाल संगोपन केंद्रे व ४ दवाखाने कार्यरत आहेत. या सर्व विभागाचे कामकाज वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत पाहिले जाते. सद्यस्थितीत देशभरात कोरोना (COVID-19) या विषाणूच्या संसर्गाचा प्रादुर्भाव झपाटयाने वाढत आहे. या पार्श्वभूमीवर वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोरोना विषाणू संबंधी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेकरीता अलग कक्ष व विलगीकरण कक्ष स्थापन करण्यात आले असून कोरोना (COVID-19) या विषाणूच्या संसर्गात दिवसेंदिवस वाढ होत आहे. या कामी श्री जिवदानी देवी रुग्णालय, चंदनसार, जुचंद्र रुग्णालय, नायगाव (पू) व कौलसिटी वसई (प.) येथे समर्पित कोविड-१९ रुग्णालय, वरुण इंडस्ट्रियल ईस्टेट, वसई (पू) व म्हाडा बिल्डींग नं.१०, बोळींज येथे कोवीड केअर सेंटर स्थापन करण्यात आले आहे.

सद्यस्थितीत वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात कौलसिटी वसई (प.) येथिल समर्पित कोवीड रुग्णालयातील नविन इमारतीमध्ये ऑक्सिजन पाईपलाईन यंत्रणा साहित्यासह फिटिंग खरेदी करणे आवश्यक आहे. याकामी मा.आयुक्त सो. यांनी सर्वेक्षण केलेनुसार मे.समर्थ इंटरप्रायझेस यांना तोंडी आदेश दिले यानुसार मे.समर्थ इंटरप्रायझेस, विरार यांनी सदरचे काम केले असून याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे.

अ.क्र.	नाव	दर	मागणी	एकूण
1	15 mm copper Pipeline	1400	1	1400
2	Oxygen Regulator	12700	1	12700
3	Boll Valve	1500	1	1500
4	NRV	750	6	4500
5	Tail Pipe	1800	6	10800
6	Service Charges	10000	1	10000
				Rs.40,900/-
			GST 18 %	Rs. 7,362/-
			Total	Rs.48,262/-

कौलसिटी वसई (प.) येथिल समर्पित कोवीड रुग्णालयातील इमारतीत ऑक्सिजन पाईप लाईन यंत्रणेचे काम करणेकामी मे.समर्थ इंटरप्रायझेस, विरार यांना आदेश देणेस योग्य होईल. याकामी होणारा खर्च सन २०२०-२१ या वित्तिय वर्षात "ऑक्सिजन सिलिंडर रिफिलीगसह अन्य रुग्णालयीन उपकरणे खरेदी व देखभाल दुरुस्ती" या लेखाशिर्षाखाली नमुद तरतुदीमधून भागवीता येणे शक्य होणार आहे.

ठराव :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुचि ड प्रकरण ५.२.२ अन्वये मला असलेल्या अधिकारानुसार कौलसिटी वसई (प.) येथिल समर्पित कोवीड रुग्णालयातील इमारतीमध्ये ऑक्सिजन पाईप लाईन यंत्रणा साहित्यासह फिटिंग करणेकामी मे.समर्थ इंटरप्रायझेस, विरार यांना कार्यादेश देणेस व याकामी येणाऱ्या रक्कम रु.४८,२६२/- (अक्षरी-अठ्ठेचाळीस हजार दोनशे बासष्ट रुपये मात्र) इतक्या खर्चास प्रशासकिय व वित्तिय मान्यता देण्यात येत आहे.

(गंगाथरन.डी)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई- विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं.४०१३०५
दूरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स- ०२५०-२५२५१०७,
ई-मेल **vasaivirarcoporation@yahoo.com**

प्रशासकीय ठराव क्र.:- ३५०

विभाग : जाहिरात विभाग
दिनांक :७५/०७/२०२१

प्रस्तावाचा विषय :- **कोव्हीड-१९ च्या अनुषंगाने जाहिरातधारकांना जाहिरात कर सवलत देणेबाबत.**

प्रस्तावाचा मजकूर :- कोव्हीड-१९ च्या (पहिली लाट व दुसरी लाट) च्या प्रादुर्भावामुळे जाहिरातधारकांची आर्थिक घडी विस्कटलेली आहे त्यामुळे सर्व घटकांवर परिणाम झालेला आहे तसेच जाहिरात प्रदर्शित करणेकामी जाहिरात प्रसिध्दी होत नसल्याकारणाने व्यवसाय करणे कठीण झाल्यामुळे आर्थिक नुकसान होत आहे असे पत्र वसई तालुका ॲडव्हरटायझिंग वेल्फेअर असोसिएशन यांनी कोव्हीड-१९ या प्रादुर्भावामुळे व्यवसायावर झालेला परिणाम विचारात घेता जाहिरात धारकांनी प्रदर्शित करण्यात आलेल्या जाहिरातीच्या करामध्ये सवलत मिळावी म्हणून विनंती वजा पत्र सादर केलेले आहे.

त्यानुषंगाने जाहिरात विभागामार्फत जाहिरात प्रदर्शित/ प्रदर्शित न केलेल्या जाहिरातीचे सर्वेक्षण दि.५/७/२०२१ ते ७/७/२०२१ या कालावधीमध्ये प्रत्यक्ष जागेवर जाऊन त्याबाबतची प्रभागसमिती निहाय विगतवारी पुढीलप्रमाणे तयार केली आहे.

प्रभाग समिती	एकुण होर्डिंग्ज संख्या	प्रदर्शित केलेली होर्डिंग्ज संख्या	प्रदर्शित न केलेले एकूण होर्डिंग्ज संख्या
एकूण	८०२	२३५	५६७
टक्केवारी	१००%	२९.३०%	७०.६९%

या अनुषंगाने पुढीलप्रमाणे ठराव घेण्यात येत आहे.

प्रस्तावाचा ठराव :- **कोव्हीड-१९ च्या प्रादुर्भावामुळे पाहिली लाट व दुसरी लाट यामुळे जाहिरातधारकांची आर्थिक घडी विस्कटलेली आहे त्यामुळे जाहिरात प्रदर्शित करणेकामी जाहिरात प्रसिध्दी होत नसल्याकारणाने व्यवसाय करणे कठीण झाल्यामुळे आर्थिक नुकसान होत आहे. त्यानुषंगाने माहे एप्रिल-मे (०२ महिने) करीता जाहिरात शुल्क कर सवलत देण्यास मान्यता देत आहे.**

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. २५१

विभाग: भांडार विभाग
दिनांक :१५/०७/२०२१

प्रस्तावाचा विषय:- वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीत कोविड-१९ रुग्णांकरिता जेवणाचे डीश, नाश्ता, कंटनेर व पॅकींग पिशव्या खरेदी केलेल्या खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मान्यतेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीमध्ये सध्या कोवीड-१९ पॉझिटीव्ह रुग्ण वाढत आहेत. या रूग्णांवर उपचार करण्यांस महानगरपालिकेचे चंदनसार येथील श्री. जीवदानी देवी रूग्णालय येथे दाखल करण्यांत येतात. तसेच म्हाडा इमारत क्र. १० बोळींज व वालीव येथील वरुण इंडस्ट्रीज येथे तयार केलेल्या विलगीकरण केंद्रामध्ये उपचार केले जातात.

विलगीकरण केंद्र म्हाडा इमारत क्र. १० बोळींज व वरुण इंडस्ट्रीज वालीव व चंदनसार येथील श्री जीवदानी देवी रुग्णालयात दाखल रुग्णांना सकाळचा नाश्ता, दुपारचे व रात्रीचे जेवण मोफत स्वरूपात श्री. जीवदानी मंदीर ट्रस्ट व महानगरपालिका यांचे मार्फत दररोज देण्यात येते. ही सुविधा दि. १५/०६/२०२० पासून सुरु आहे. यामध्ये नाश्ता कंटेनर, प्लास्टीक पिशव्या, चमचे व जेवणाचे कंटेनर तसेच वाटप वाहन, वाटप कर्मचारी इत्यादीची व्यवस्था महानगरपालिकेकडून करण्यांत येते व जेवण, नाश्ता हे शहरामधील श्री. जीवदानी देवी संस्थान यांचे मार्फत मोफत पूरविले जात आहे.

सध्या शहरामध्ये कोवीड रुग्णांचे प्रमाण वाढत आहे. नाश्ता कंटेनर व जेवणाचे पॅकींगसह असलेले कंटनेटर संपले आले असून मे. श्रीजी सेल्स हयांच्याकडून दि. १९/०५/२०२१ ते दि. २८/०६/२०२१ पर्यंत साहित्याचा पुरवठा केलेला आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

अ. क्र.	पुरवठादाराचे नाव	साहित्याचा तपशील	साहित्य वापर केलेले ठिकाण	साहित्य पुरवलेले दिनांक	खरेदी केलेले नग	मुळ किंमत	जी. एस. टी	एकुण रक्कम
१)	मे. श्रीजी सेल्स्	नाश्ता प्लास्टिक चमचा	कोविड-१९ उपचार केंद्र, विलगीकरण केंद्र	१९/०५/२०२१	७० पॅकेट	३०	१८ %	२४७८
२)		ब्ल्यू एच एम बॅग २० X २६ इंच		१९/०५/२०२१	१००० नग	५	१८ %	५९००
३)		पाच खणी जेवणाचा कंटेनर		२०/०५/२०२१	१६०० नग	१५	१८ %	२८३२०
४)		पाच खणी जेवणाचा कंटेनर		२३/०५/२०२१	४८०० नग	१५	१८ %	८४९६०
५)		पाच खणी जेवणाचा कंटेनर		२८/०५/२०२१	४८०० नग	१५	१८ %	८४९६०

६)		नाश्ता कंटेनर (फॉईल कंटेनर २५० ग्रॅम)		२८/०५/२०२१	४००० नग	१.७०	१८ %	८०२४
७)		पाच खणी जेवणाचा कंटेनर		०३/०६/२०२१	४००० नग	१५	१८ %	७०८००
८)		नाश्ता कंटेनर (फॉईल कंटेनर २५० ग्रॅम)		०५/०६/२०२१	२००० नग	१.७०	१८ %	४०१२
९)		ब्ल्यू एच एम बॅग ५१ मायक्रो २७ X ३० इंच		०५/०६/२०२१	५०० नग	९.५०	१८ %	५६०५
१०)		पाच खणी जेवणाचा कंटेनर		०७/०६/२०२१	५६०० नग	१५	१८ %	९९१२०
११)		नाश्ता प्लास्टिक चमचा		०७/०६/२०२१	१०० पॅकेट	३०	१८ %	३५४०
१२)		पाच खणी जेवणाचा कंटेनर		१५/०६/२०२१	५२०० नग	१५	१८ %	९२०४०
१३)		नाश्ता कंटेनर (फॉईल कंटेनर २५० ग्रॅम)		१५/०६/२०२१	४००० नग	१.७०	१८ %	८०२४
१४)		ब्ल्यू एच एम बॅग ५१ मायक्रो २७ X ३० इंच		१५/०६/२०२१	२५० पॅकेट	९.५०	१८ %	२८०२.५
१५)		पाच खणी जेवणाचा कंटेनर		२५/०६/२०२१	४८०० नग	१५	१८ %	८४९६०
१६)	मे. श्रीजी सेल्स्	नाश्ता कंटेनर (फॉईल कंटेनर २५० ग्रॅम)	कोविड-१९ उपचार केंद्र, विलगीकरण केंद्र	२८/०६/२०२१	२००० नग	१.७०	१८ %	४०१२

१७)		ब्ल्यू एच एम बॅग ५१ मायक्रो २७ X ३० इंच		२८/०६/२०२१	२५० पॅकेट	९.५०	१८ %	२८०२.५
							एकुण	५,९२,३६०/-

तरी कोविड उपचार केंद्रावर विलगीकरण, अलगीकरण केंद्र ठिकाणी दैनंदिन अल्पोपहार व भोजन पुरवठा करण्यास लागणारे कंटेनर व उपरोक्त इतर साहित्य खरेदी करणे आवश्यक आहे. त्याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३) क अन्वये मा. आयुक्त सो. यांना असलेले अधिकारानुसार विना निविदा मे. श्रीजी सेल्स्, वसई यांचेकडून तात्काळ थेट खरेदी करुन झालेल्या रक्कम रु. ५,९२,३६०/- खर्चास मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मंजुरीस्तव सविनय सादर.

तसेच सदरचा खर्च सन २०२१-२२ मधील नैसर्गिक आपत्ती विभाग अंतर्गत नैसर्गिक आपत्ती इतर या लेखाशिर्ष अंतर्गत करण्यात येईल.

ठराव :- उपरोक्त प्रस्तावामधील उपचार केंद्र, विलगीकरण, अलगीकरण केंद्र ठिकाणी दैनंदिन अल्पोहार व भोजन पुरवठा करण्यास लागणारे कंटेनर तात्काळ पूरवठादार मे. श्रीजी सेल्स् यांच्याकडून विना ई-निविदा खरेदी करणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अनुसुची 'ड' प्रकरण ५(२)(२) व कलम ६७ (३)(क) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार उपरोक्त जेवणाचे डीश, पॅकींग पिशव्या, नाश्ता कंटेनर, प्लास्टीक चमचे इ. खरेदी करणेकामी दि. १९/०५/२०२१ ते दि. २८/०६/२०२१ पर्यंत झालेल्या रक्कम रु. ५,९२,३६०/- (अक्षरी रुपये पाच लक्ष ब्याण्णव हजार तीनशे साठ मात्र) खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय दुरुस्ती ठराव क्र. ३५२

विभाग :- भांडार विभाग
दिनांक :१५/०७/२०२१

प्रस्तावाचा विषय:- कंन्टेन्मेंट झोन करिता लाकडी मुंडे व काथा खरेदी केलेल्या खर्चास कार्योत्तर प्रशासकिय व वित्तीय मान्यतेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- महानगरपालिका क्षेत्रामध्ये कोविड-१९ या साथीच्या रोगाचे रुग्ण आढळून येत होते. माहे मार्च २०२० पासून कोविड-१९ चे पॉझीटीव्ह रुग्ण आढळत असून रुग्ण आढळलेल्या ठिकाणी बॅरेकेटींग बसवून परिसर सिलबंद करावा लागतो व त्यासाठी मोठया प्रमाणात लोखंडी बॅरेकेटींगचे ऐवजी इमारत बांधकाम मध्ये वापरण्यात येणारे लाकडी मूंडे व काथा रस्सी वापर करुन बॅरेकेटींग करण्याबाबत दि. १३/०५/२०२० रोजी मा.आयुक्त साो. यांनी सुचना दिलेल्या आहेत व त्यासाठी लागणारे मुंडे व काथा बंडल रस्सी बंडल खरेदी करण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत.

बाजारामध्ये मूंडे पूरवठादार यांचेकडे चौकशी केली असता त्यांचा दर खालीलप्रमाणे आहे.

८ फूट उंचीचे लाकडी मूंडे	दर १४० प्रती नग + १८ % जी.एस.टी.
१२ फूट उंचीचे लाकडी मूंडे	दर १७० प्रती नग + १८ % जी.एस.टी.
काथा बंडल २०० गुंडया असलेले	दर २००० प्रती बंडल + १८ % जी.एस.टी.

सदर दराबाबत पुरवठादार मे. हार्ट बीट साऊंड ॲण्ड लाईटस् यांचे सोबत वाटाघाटी करुन खालील मंजूर दराने मूंडे ९ प्रभाग समिती कडे पुरवठा करण्याबाबत मान्य केले आहे. तरी कोरोना विषाणूचा प्रादूर्भाव वाढू नये याकरिता पॉझिटीव रुग्ण सापडलेल्या कंन्टेन्मेंट झोन लॉकडाऊन करण्यांस खालीलप्रमाणे ९ प्रभागा करिता दैनंदिन आवश्यकते प्रमाणे काथा व मुंडे खरेदी करण्यात आले असून खालीलप्रमाणे वाटप करण्यात आलेले आहेत.

अ.क्र.	दिनांक	प्रभाग समिती	तपशिल		
			१२ फूट मुंडे	८ फुट मुंडे	काथा
१.	२५/०४/२०२१	अे	१००	१००	१
२.	२७/०४/२०२१	एफ	७५	७५	१
३.	०१/०५/२०२१	आय	७५	७५	२
४.	०६/०५/२०२१	जी	५०	५०	१
५.	०६/०५/२०२१	ई	५०	५०	१
६.	०६/०५/२०२१	बी	५०	५०	१
७.	०७/०५/२०२१	एच	५०	५०	१
८.	०७/०५/२०२१	आय	१००	१००	१
९.	२३/०५/२०२१	अे	१००	१००	२

१०.	३०/०५/२०२१	अे	७५	७५	१
		एकुण	७२५	७२५	१२

अ.क.	तपशिल	आवश्यक नग	दर	१८ % जी.एस.टी.	एकूण
१.	१२ फूट उंचीचे लाकडी मूंडे	७२५ नग	१६० प्रति नग	२०८८०	१,३६,८८०/-
२.	८ फूट उंचीचे लाकडी मूंडे	७२५ नग	१२५ प्रति नग	१६३१२.५	१,०६,९३७.५/-
३.	काथा बंडल २०० गुंडया असलेले	१२ बंडल	१८०० प्रति बंडल	३८८८	२५,४८८/-
				एकूण	२,६९,३०५.५/-

तरी उपरोक्त कोरोना प्रतिबंधक उपाययोजना करण्याकरिता लाकडी मूंडे, काथा खरेदी करण्यांस महापालिकेकडे वार्षिक दर मंजूर नव्हते. बॅरेकेटींगचे काम महत्वाचे व तात्काळ करावयाचे असल्याने ई-निविदा व दरपत्रक मागविणे यामध्ये बराच वेळ लागणार असल्याने व पॉझिटीव रुग्ण आढळलेल्या कन्टेन्मेंट भागामध्ये बॅरेकेटींग फिटींग करणे अत्यावश्यक असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७(३) क अन्वये मा.आयुक्तांचे अधिकार व कर्तव्य नुसार विना निविदा तात्काळ पूरवठादार मे. हार्ट बीट साऊंड ॲण्ड लाईटस् यांचेकडून थेट खरेदी करण्यात आले असून त्यासाठी आलेल्या रक्कम रु. २,६९,३०६/- खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मंजुरीस्तव सादर.

तसेच सदरचा खर्च सन २०२१-२२ मधील नैसर्गिक विभाग अंतर्गत नैसर्गिक आपत्ती इतर या लेखाशिर्ष अंतर्गत करण्यात येईल.

ठराव :- उपरोक्त प्रस्तावा मधील वरील नमुद लाकडी मुंडे व काथा तात्काळ विना ई निविदा तात्काळ थेट खरेदी करणेकामी महानगरपालिका अधिनियम अनुसुची 'ड' प्रकरण ५(२)(२) व कलम ६७(३)(क) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार कंन्टेन्मेंट झोन करिता लाकडी मुंडे व काथा खरेदी करणेकामी झालेल्या रक्कम रु. २,६९,३०६/- (अक्षरी रुपये दोन लक्ष एकोणसत्तर हजार तीनशे सहा मात्र) खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय दुरुस्ती ठराव क्र. ३५३

विभाग :- भांडार विभाग
दिनांक :२५/०७/२०२१

प्रस्तावाचा विषय:- कोविड-१९ उपचार केंद्रावर विलगीकरणाकरिता कपडा खरेदी केलेल्या खर्चास कार्योत्तर प्रशासकिय व वित्तीय मान्यतेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- महानगरापालिका क्षेत्रामध्ये कोविड-१९ या साथीचे रोगाचा प्रादूर्भाव वाढत असल्याने कोविड-१९ पॉझीटीव्ह रुग्णांवर उपचार करण्यांस १) जी.जी. कॉलेज, वसई व २) वरुण इंडस्ट्रीज, वालीव या ठिकाणी कोविड आयसोलेशन केंद्र तयार करण्यात आली होती. या केंद्रावर पॉझीटीव्ह रुग्ण इतरत्र फिरु नये व डॉक्टर व नर्स यांचे विभागामध्ये जाऊ नये याकरिता उपचार केंद्रावर बांबूचे बॅराकेटींग लाऊन पडदे बांधून घेण्यांत आले होते. लॉकडाऊन असल्यामुळे दुकाने बंद असल्याने मंडप डेकोरेशन वाल्यांकडून खालील नवीन साहित्य खरेदी करण्यांत आले होते. व ते उपचार केंद्रावर वापरण्यांत आले होते.

त्याकरिता खालील प्रमाणे उपचार केंद्र व लसीकरण केंद्राकरिता कपडा खरेदी करण्यात आलेला आहे.

अ. क्र.	ठिकाण	दिनांक	कपडा मीटर मध्ये	रक्कम	एकुण
१)	जी.जी. कॉलेज, वसई	०५/०५/२०२०	१९४१	४२ प्र.मी.	८१५२२
२)	वरुण इंडस्ट्रीज, वालीव	१०/०१/२०२१	२५५८	४२ प्र.मी.	१०७४३६
३)	सर डी.एम.पेटीट रुग्णालय, वसई	०६/०४/२०२१	२१३	४२ प्र.मी.	८९४६
				एकुण	१,९७,९०४/-
				५% GST	९,८९५.२/-
				एकुण	२,०७,७९९.२/-

तरी उपरोक्त कोरोना प्रतिबंधक उपाययोजना करण्याकरिता कपडा खरेदीकामी महापालिकेचे वार्षिक दर मंजूर नसल्याने व कपडा पार्टीशियनचे काम महत्वाचे व तात्काळ असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७(३) क अन्वये मा. आयुक्तांचे अधिकार व कर्तव्य नुसार विना निविदा तात्काळ पूरवठादार मे. हार्ट बीट साऊंड ॲण्ड लाईटस् यांचेकडून थेट खरेदी करण्यात आले असून त्यासाठी आलेल्या रक्कम रु. २,०७,७९९/- खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मंजुरीस्तव सादर.

तसेच सदरचा खर्च सन २०२०-२१ मधील वैद्यकीय विभागातील रुग्णालय व शहराअंतर्गत विविध ठिकाणी दवाखाने व्यवस्थापन अंतर्गत रुग्णालय इतर साहित्य खरेदी या लेखाशिर्ष अंतर्गत करण्यात येईल.

ठराव :- कोविड-१९ प्रतिबंधक उपाययोजने करिता उपचार केंद्रावर विलगीकरणाकरिता कपडा खरेदी करणे आवश्यक होते. तरी उपरोक्त प्रस्तावा मधील वरील नमुद कपडा विना ई निविदा तात्काळ थेट खरेदी करणेकामी महानगरपालिका अधिनियम अनुसुची 'ड' प्रकरण ५(२)(२) व कलम ६७(३)(क) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार उपचार केंद्रावर विलगीकरणाकरिता कपडा खरेदी करणेकामी झालेल्या रक्कम रु. २,०७,७९९/- (अक्षरी रुपये दोन लक्ष सात हजार सातशे नव्याण्णव मात्र) खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पूर्व ता .वसई, जि. पालघर पिन नं. ४०१ ३०५.

दुरध्वनी ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६ फॅक्स-०२५०-२५२५१०७.

ई मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्रं. ३५४

विभाग :- अग्निशमन

दिनांक :-१६/०७/२०२१

विषय:- अग्निशमन विभागातील ४० मीटर उंच शिडीचे टर्न टेबल लॅडर वाहनाची दुरुस्ती करणे करीता येणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तिय मंजुरी व सदर कामी कार्यादेश देणे बाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- सादर करण्यात येते की, वसई-विरार शहर महानगरपालिका मुख्य अग्निशमन केंद्र - आचोळे येथे टर्न टेबल लॅडर ४० मीटर उंचीचे अग्निशमन व जीवसंरक्षक वाहन क्रं. एम.एच.४८ सी - ००३२ कार्यरत आहे. महानगरपालिका हद्दीमध्ये व हद्दीबाहेर कोणत्याही घटनास्थळी आग व रेस्क्यू वर्दी मिळताच आपल्या महानगरपालिका अग्निशमन विभागाचे कर्मचारी अग्निशमन वाहनासह त्वरीत घटनास्थळी पोहचतात. परंतु टर्न टेबल लॅडर वाहनाचे लॅडर मध्ये काही तांत्रिक बिघाड झाल्यामुळे अग्निशमन वाहनचालक यांनी वाहनाचे केज ओपनींग आणि लेवलींग सिलेंडर (जॅक) दुरुस्ती करणे बाबत कळविले आहे.

सदर वाहनाची दुरुस्ती कामे करण्याकरीता लागणारे स्पेअरपार्ट व वाहनाची दुरुस्ती करणारे तांत्रिक तज्ञ व सुविधा महानगरपालिका व लगतच्या पुणे, मुंबई या परिसरात नाही. सदर वाहन विदेशामधील ऑस्ट्रिया येथून विकत घेतले असल्याने त्यासाठी लागणारे स्पेअरपार्ट रोझनबार कंपनीचे एकमेव अधिकृत विक्रेते मे. ॲनलॉन टेक्नोलॉजी सोल्यूशन प्रा.लि. यांचेकडे उपलब्ध होतात. परंतू यापूर्वी गेली सात वर्ष सदर वाहनाचे दैनंदिन देखभाल दुरुस्तीचा ठेका मे. ॲनलॉन टेक्नोलॉजी सोल्यश्न प्रा.लि. कंपनीस देण्यात आला होता. सदर ए.एम.सी. ठेका माहे सप्टेंबर २०२० पासून बंद करण्यात आला आहे. त्यामुळे सद्यस्थितीत वाहनाचे दुरुस्ती करीता ए.एम.सी. ठेका नाही.

त्यामुळे वाहनचालकाचे प्राप्त अहवालानुसार अग्निशमन विभागाकडील टर्न टेबल लॅडर वाहनाची तपासणी रोझनबार कंपनीचे एकमेव अधिकृत विक्रेते मे. ॲनलॉन टेक्नोलॉजी सोल्यूशन प्रा.लि. यांचेकडून केली असता सदर कंपनीने खालील प्रमाणे दुरुस्ती सुचवली असून त्याचे कोटेशन सादर केले आहे.

Sr. No	Item Description	Qty.	Unit Price	GST 18%	Total Price
1	Hydraulic Cylinder Leveling Cylinder Cage	2	52791	19004.76	124586.76
2	Hydraulic cylinder cage folding	2	49297	17746.92	116340.92
3	Silicon oil 0,51	1	10360	1864.80	12224.80
		Sub total value of spare parts			**214536**
		GST on Spare Parts			38616.48
		Grand Total			**253152/-**

उपरोक्त प्रकारची दुरुस्तीची कामे करणे करीता मे. ॲनलॉन् टेक्नोलॉजी सोल्यूशन प्रा.लि. यांनी स्पेअरपार्ट खरेदी करणे बाबत रक्कम **रु. २,५३,१५२/-** चे कोटेशन सादर केले आहे. तसेच सदर वाहनाचे दुरुस्ती करीता कंपनीचे ०२ कुशल तांत्रिक अभियंता यांचे १ दिवसासाठी सर्व करासह खर्च रक्कम रु. ४८,३८०/- येणार आहे. असे एकुण रक्कम रुपये ३,०१,५३२/- खर्च अपेक्षित आहे.

सदर खर्च करणे करीता सन २०२०-२१ सह सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकामधील पान क्रं. ३१ वरील ५ नंबरचे लेखाशिर्ष **अग्निशमन व्यवस्था वाहन दुरुस्ती निगा / कटर मशीन दुरुस्ती निगा** यामध्ये १ कोटी ५ लक्ष तरतुद असून यामधून सदर खर्च करता येईल.

तरी टर्न टेबल लॅडर वाहनाचे उपरोक्त दुरुस्ती कामे महानगरपालिका अधिनियम अनुसुची ड प्रकरण ५ (२) (२) व कलम ६७ (३) (क) अन्वये मा. आयुक्त सो. यांना असलेले अधिकारानुसार रोझनबार कंपनीचे भारतातील एकमेव अधिकृत सर्व्हिस सेंटर मे. ॲनलॉन टेक्नोलॉजी सोल्यूशन प्रा.लि. यांचेकडून विना ई-निविदा थेट खरेदी करणेस व त्यासाठी येणा-या रक्कम रु. ३,०१,५३२/- खर्चास मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे प्रशासकीय व वित्तीय मंजूरीस्तव सविनय सादर.

ठराव :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागातील टर्न टेबल लॅडर वाहनाची दुरुस्ती करीता लागणारे साहित्य रोझनबार कंपनीचे भारतातील एकमेव अधिकृत सर्व्हिस सेंटर मे. ॲनलॉन टेक्नोलॉजी सोल्यूशन प्रा.लि. यांचेकडून महानगरपालिका अधिनियम ड प्रकरण ५ (२) (२) व कलम ६७ (३) (क) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार विना ई-निविदा थेट खरेदी करण्यास व त्यासाठी येणा-या रक्कम रु. ३,०१,५३२/- खर्चास प्रशासकीय व वित्तिय मान्यता व मे. ॲनलॉन टेक्नोलॉजी सोल्यूशन प्रा.लि. यांना कार्यादेश देणेस मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक

वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व जि. पालघर, पिन नं. ४०१ ३०५.
दुरध्वनी ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६ फॅक्स-०२५०-२५२५१०७.
ई मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्रं. ३५५

विभाग :- अग्निशमन व आणीबाणी सेवा
दिनांक :-२६/०७/२०२१

प्रस्तावाचा विषय :- मुख्य अग्निशमन केंद्र, आचोळे येथील पिण्याच्या पाण्याचे आर.ओ. प्लँट ची सर्व्हिसींग केलेल्या खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तिय मंजुरी मिळणे बाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- सविनय सादर करण्यात येते की, वसई-विरार शहर महानगरपालिकेचे मुख्य अग्निशमन केंद्र, आचोळे येथे ८० फायरमन व २१ वाहनचालक तीन पाळी मध्ये २४X७ कार्यरत आहेत. सदर अग्निशमन कर्मचा-यांकरीता पिण्याचे पाण्यासाठी आर. ओ. मशीन तीन वर्षापूर्वी बसविण्यात आलेले आहे. परंतू आर. ओ. मशिनचे फिल्टर मेमरन मध्ये तांत्रिक बिघाड झाल्यामुळे मशीन नादुरुस्त होती. त्यामुळे अग्निशमन कर्मचा-यांना पिण्याचे पाण्याची गैरसोय होत होती. त्यामुळे सदर आर. ओ. मशीनची सर्व्हिसींग कंपनी मार्फत करणे आवश्यक होते.

सदर आर. ओ. मशीन ३ वर्षापूर्वी बसविण्यात आली असून सदर मशीनचा वॉरंटी कालावधी संपलेला आहे. तसेच आर. ओ. मशीन ची सर्व्हिसींग करण्यास दर मागविलेले नाहीत. सद्या देशामध्ये कोविड-१९ साथ सुरु असल्याने राज्यभरात लॉकडाऊनची परिस्थिती सुरु होती. अग्निशमन सेवा ही अत्यावश्यक सेवा असल्याने कर्मचा-यांच्या आरोग्याचा विचार करता दरपत्रक मागवून दुरुस्ती प्रक्रिया केली असता विलंब झाला असता त्यामुळे सदर मशीनची दुरुस्ती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम प्रकरण ५ (२) २ प्रमाणे करण्यात आली आहे. मशीनचे दुरुस्ती करीता रक्कम रु. ११,८००/- खर्च झालेला आहे. सदर खर्च श्री. दिलीप पालव यांनी स्वत:हा रोखीने केलेला आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या सुधारीत अर्थसंकल्प सन २०२०-२१ सह सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात पान नं. ३० वर ४ नंबरचे लेखाशिर्ष अग्निशमन व्यवस्था व साहित्य खरेदी यामध्ये एकुण वार्षीक रक्कम रु. ६० लक्ष तरतूद असून सदर खर्च या तरतुदी मधून करता येईल.

तरी सदर पाणी मशिनची दुरुस्ती अत्यावश्यक बाब असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७(३) क अन्वये मा. आयुक्तांचे अधिकार व कर्तव्य नुसार विना ई-निविदा तात्काळ दुरुस्ती करुन झालेल्या रक्कम रु. ११,८००/- खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मंजुरीस्तव सादर.

ठराव :- वसई - विरार शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागामधील पिण्याच्या पाण्याचे आर.ओ. मशीनची दुरुस्ती करण्यात आली आहे. अग्निशमन सेवा ही अत्यावश्यक सेवा असल्याने कर्मचा-यांच्या आरोग्याचा विचार करता सदर मशिनची दुरुस्ती करणे आवश्यक असल्याने महानगरपालिका अधिनियम अनुसुची 'ड' प्रकरण ५(२)(२) व कलम ६७(३)(क) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार झालेल्या रक्कम रु. ११,८००/- खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व जि. पालघर, पिन नं. ४०१ ३०५.
दुरध्वनी ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६ फॅक्स-०२५०-२५२५१०७.
ई मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्रं. ३५६ विभाग :- अग्निशमन व आणीबाणी सेवा
दिनांक :-१६/०७/२०२१

प्रस्तावाचा विषय :- अग्निशमन विभागाचे मुख्य अग्निशमन केंद्र, आचोळे येथील चैन सॉ कटर मशीनचे दुरुस्ती खर्चास प्रशासकीय व वित्तिय मंजुरी मिळणे बाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- सविनय सादर करण्यात येते की, वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये नैसर्गिक आपत्ती, पुर परिस्थिती, झाडाचे कॉल मोठया प्रमाणावर प्राप्त होत असतात. दिनांक १६/०५/२०२१ ते १९/०५/२०२१ रोजी झालेल्या तौक्ते चक्रिवादळामुळे मनपा क्षेत्रामधील रहदारीच्या ठिकाणी, वस्तीच्या ठिकाणी, घरावर, इमारतींवर, विद्युत तारांवर, ट्रांन्सफॉर्मरवर, वाहनांवर, रस्त्यावर खुप मोठया प्रमाणात झाडे उन्मळून पडली होती. सदर विविध प्रकारची प्रचंड मोठी झाडे सॉ कटर मशीनचे सहाय्याने कापून बाजूला करण्यात आली होती.

त्यामुळे वापरात असलेले सॉ कटर मशीनचे पिस्टन, गॅसकेट व स्पार्कप्लग इत्यादी साहित्य खराब झाल्यामुळे लाकूड कापणे जिकिरीचे झाले होते सदर मशीनचे साहित्य यांची तातडीने खरेदी शिवम सेल्स अॅण्ड सर्व्हिसेस यांचे कडून करण्यात आली आहे. तसेच सद्या पावसाळा सुरु झाला असल्याने जोरात वादळी वारे वाहू लागले आहेत त्यामुळे मोठया प्रमाणात महापालिका क्षेत्रात झाडे उन्मळून पडतात. पडलेली झाडे कापून बाजुला करण्यासाठी सॉ कटर मशिन सुस्थितीत असणे आवश्यक आहे. जेणेकरुन झाडे कापणे सुलभ होईल.

सदर मशीनचे दैनंदिन देखभाल दुरुस्ती करीता महापालिकेकडे मंजूर ठेकेदार नाही. तसेच सदर मशीनचा उपयोग अत्यावश्यक सेवेत करण्यात येतो म्हणून सदर मशीनची दुरुस्ती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम प्रकरण ५ (२) २ प्रमाणे करण्यात आली आहे. मशीनचे दुरुस्ती करीता रक्कम रु. १२८७६/- खर्च झालेला आहे. सदर खर्च श्री. दिलीप पालव यांनी स्वतःहा रोखीने केलेला आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या सुधारीत अर्थसंकल्प २०२०-२१ सह सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात पान नं. ३० वर ०५ नंबरचे लेखाशिर्ष **अग्निशमन व्यवस्था वाहन दुरूस्ती / कटर मशीन दुरूस्ती निगा** यामध्ये एकुण वार्षिक रुपये १ कोटी ५ लक्ष तरतुद असून सदर खर्च यामधून करता येईल.

तरी सदर दुरुस्ती साहित्य अत्यावश्यक बाब असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७(३) क अन्वये मा. आयुक्तांचे अधिकार व कर्तव्य नुसार विना निविदा तात्काळ खरेदी करुन झालेल्या रक्कम रु. १२८७६/- खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मंजुरीस्तव सादर.

ठराव :- वसई - विरार शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागामधील चैन सॉ कटर मशीनची दुरुस्ती करण्यात आली आहे. सद्या पावसाळया सुरु असल्याने सदर मशिनची दुरुस्ती करणे आवश्यक असल्याने महानगरपालिका अधिनियम अनुसुची 'ड' प्रकरण ५(२)(२) व कलम ६७(३)(क) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार झालेल्या रक्कम रु. १२८७६/- खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक 16/7
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ३५७ विभाग :- पाणी पुरवठा
दिनांक :- १६ /०७ /२०२१

विषय :- वसई - विरार शहर महानगरपालिका पाणी पुरवठा योजनेच्या जलशुध्दीकरण केंद्रामध्ये **Alum Agigater** व Flash Mixer पुरविणे बसविणे व कार्यान्वीत करणेकामी सविदा करणेबाबत.

(Tender Id no २०२१_ vvcmc_६८९७७०_१)

अंदाजपत्रकीय रक्कम	:-	**रु. २३,७१,३५०/-**
प्रशासकीय मान्यता	:-	मा. प्रशासक ठराव क्र. २५ दि. १२/०४/२०२१
तांत्रिक मान्यता	:-	I/०१/०१/ २०२१ दि. २०/०४/२०२१, रू.२३,७१,३५०/-
ई - टेंडरींग द्वारे निविदा सुचना प्रसिद्ध	:-	जा.क्र. वविशम/शअ/१५८/२०२१ दि. २४/०५/२०२१
वृत्तपत्रातील प्रथम वेळ जाहिर निविदा ई - टेंडरींग द्वारे निविदा प्रसिद्धी	:-	दै. प्रहार दै. परशुराम समाचार, दै.हमारा महानगर दि. २५/०५/२०२१
ई - टेंडरींग द्वारे निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा)	:-	दि. ०७/०६/२०२१
विहीत मुदतीत ऑनलाईन प्रक्रियेद्वार प्राप्त निविदा	:-	०५
प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी	:-	मा. शहर अभियंता
ई - टेंडरींग द्वारे निविदा उघडण्याची दिनांक (व्दितीय लखोटा)	:-	दि. १५/०६/२०२१
विहीत मुदतीत ऑनलाईन प्रक्रियेद्वारे पात्र निविदाकार	:-	०३

प्राप्त निविदा निविदासमिती पुढे उघडल्या असता त्याचे दर खालीलप्रमाणे आहेत.

अ.क्र	निविदा धारकाचे नाव	निविदा दर
१	**मे. बालाजी एंटरप्राईजेस**	**०.१८% कमी दराने**
२	मे. राघ्वेन्द्र इंजिनिअरिंग	०.०९% कमी दराने
३	मे. एस.के.इंजिनिअरिंग वर्क्स	२.७०% जादा दराने

उपरोक्त निविदांची तुलना केली असता, **मे. बालाजी एंटरप्राईजेस** यांच्या निविदेतील दर हा अंदाजपत्रकीय रक्कमेच्या **०.१८% कमी दराने** असुन सदरचा देकार हा कमी व वाजवी आहे. सदरच्या दरास निविदा समितीने दि. ०२/०७/२०२१ रोजीच्या बैठकीत मंजुरीकरीता शिफारस केलेली आहे.

तरी **मे. बालाजी एंटरप्राईजेस** यांच्या अंदाजपत्रकीय रक्कमेच्या **०.१८% कमी दराची** निविदा योग्य व वाजवी असल्यामुळे, **मे. बालाजी एंटरप्राईजेस** यांच्याशी कामाची संविदा करणेस मान्यता देणेसाठी व वित्तीय मान्यतेस्तव मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

ठराव :- उपरोक्त कामी **मे. बालाजी एंटरप्राईजेस** यांनी अंदाजपत्रकीय रक्कमेच्या **०.१८% कमी दराच्या** निविदेस निविदा समितीने मान्यता दिली असून मा. आयुक्त यांनी मंजूरी दिली आहे. सदर कामी मनपा तर्फे कायदेशिर बाबींची पुर्तता करुन संविदा करण्यास मा.आयुक्त तथा प्रशासक यांची मंजूरी असे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई – विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. 358

विभाग :- विदयुत विभाग
दिनांक :- 16/07/2021

प्रस्तावाचा विषय :- "कोरोना विषाणु (कोविड-19) आपत्तकालीन व्यवस्था"
वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वरुण इंडस्ट्री येथे नव्याने स्वतंत्र 630 के.व्ही.एं क्षमतेचा रोहित्र (ट्रान्सफॉर्मर) बसविणे कामास संविंदा करणेंस मान्यता मिळणेबाबत...

प्रस्तावाचा मजकुर :-

संदर्भ :- 1) दि.26/04/2021 रोजीच्या कार्यालयीन टिपणीस मा.आयुक्त सो., यांची मान्यता.
2) मा.आयुक्त सो. यांचे दि. 25/06/2021 रोजीचे ठराव क्र. अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता.
3) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांचे Ref.No. SE/VC/ Teach/ 002490 दि.06/07/2021 रोजीचे कोटेशन.

सध्या राज्यात कोरोना (कोविड-19) विषाणूची संभाव्य तिसरी लाट आणि कोरोनाचा उत्परिवर्तित विषाणूचा धोका (डेल्टा प्लस) यांचा प्रादुर्भाव असल्याचे दिसुन आले आहे आणि त्यामुळे संसर्ग मोठया प्रमाणावर वाढण्याची शक्यता निर्माण झाली असुन, जनतेच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. याकरिता वरुण इंडस्ट्री येथील कोरोना केअर रुग्णालयात विलगिकरण कक्ष, अति दक्षता विभाग (ICU), फार्मसी विभाग, लॅब टेस्ट्रींग विभाग, मृत शरीर ठेवणेंकरिता शवपेटी व अतिदक्ष रुग्णांकरिता स्वतंत्र ऑक्सिजन जनरेटर प्लांट इत्यादींची उभारणी करणेंत आली आहे.

भविष्यात कोविड-19 ची तिसरी लाट लक्षात घेता, सदर रुग्णालयाच्या इमारतीत ऑक्सिजन जनरेटर प्लांट व अति दक्षता विभाग (ICU) कक्षाचे विस्तार करावयाचे आहेत. परिणामी वीज भार वाढणार आहे. भविष्यात ऑक्सिजन जनरेटर प्लांट, अति दक्षता विभाग (ICU) व त्याअनुषंगिक वैद्यकिय उपकरणे इ. मुळे 400 कि.वॅट लोड वाढणार असल्याने 630 के.व्ही.ए क्षमतेचा आऊटडोअर पध्दतीचा रोहित्र (ट्रान्सफॉर्मर) वरुण इंडस्ट्री, गोलानी नाका येथील कोरोना केअर सेंटर येथे उभारणी करणेंकरिता 1) सन 2020-21 या वित्तीय वर्षाचे सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत) जिल्हा दर सुचीनुसार तयार करण्यात आलेले अंदाजपत्रकीय रक्कम 25,04,493/- रुपये, 2) 1.3% पर्यवेक्षण शुल्क (सुपरविजन चार्ज) करिता रक्कम 32,559/- रुपये व 3) सि.टी वीज मिटर करिता वीज कनेक्शन चार्जेस व अनामत रक्कम करीता रक्कम 6,00,000/- रुपये असा एकुण रक्कम 31,37,052/- रुपये अपेक्षित खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 67 (3) (क) नुसार दि. 25/06/2021 रोजीचे ठराव क्र. अन्वये मा.आयुक्त तथा प्रशासक सो., यांनी प्रशासकिय व वित्तीय मान्यता दिली.

वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वरुण इंडस्ट्री येथे नव्याने स्वतंत्र 630 के.व्ही.ए क्षमतेचा रोहित्र (ट्रान्सफॉर्मर) बसविणे कामाकरिता 1.3% DDF योजनेन्तर्गत संदर्भिय क्र.3 अन्वये महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीमार्फत अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यतेसह मंजुर देणेंत आली आहे. तांत्रिक मान्यता प्राप्त महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे 1.3% DDF योजनेतील रक्कम 16,68,930/- रुपयेचे अंदाजपत्रक सोबत जोडले आहे (त्याचा पृष्ठ क्र. P-11 आहे).

सदर योजनेनुसार महानगरपालिकेने सर्व काम स्वबळावर करावयाचे असुन 1.3% पर्यवेक्षण शुल्क (सुपरविजन चार्ज) रक्कम 25,606/- रुपये म.रा.वि.वि.कंपनीकडे भरणा करवायची आहे. याकामी महानगरपालिकेने सन 2020-21 सार्वजनिक बांधकाम विभाग जिल्हा दरसूची नुसार सदर कामाचे रक्कम 25,04,493/- रुपये अंदाजपत्रक तयार करणेंत आले आहे.

तरी, 1.3% DDF योजनेन्तर्गत रक्कम 16,68,930/- रुपये व सन 2020-21 या वित्तीय वर्षातील सार्वजनिक बांधकाम विभाग जिल्हा दरसूची नुसार रक्कम 25,04,493/- रुपयांचे अंदाजपत्रक तयार करणेंत आले असुन रक्कम 8,35,563/- रूपयांची तफावत दिसुन येत आहे. याबाबत असे स्पष्टीकरण देणेंत येते आहे की, म.रा.वि.वि.कंपनीकडुन 1.3% DDF योजनेमध्ये मटेरीयल कॉस्टवर अतिरिक्त 15% व 18% जी.एस.टी या बाबींचा समावेश असतो. परंतु, 100% DDF योजनेन्तर्गत म.रा.वि.वि.कंपनीस साहित्यसह काम करणेंस दिल्यास मटेरीयल कॉस्टवर 4% वाहतुक खर्च, 1% T and P चार्जेस, 2.50% मटेरिअल कॉन्टेजिन्सेस चार्जेस, 15%मटेरिअल इरेक्शन चार्जेस, 5%कॉन्ट्रॅक्टर सुपरविजन चार्जेस, 3% लेबर इन्शुरन्स अॅन्ड फायन्स कॉस्ट, 5% ठेकेदार नफा असे एकुण 35.50% व 18% गुडस अॅन्ड सर्विस कर इत्यादींचा समावेश करुन रोहित्र (ट्रान्सफार्मर) उभारणीचे अंदाजपत्रक तयार करणेंत येते. (उदा. सोबत बोळींज व नालासोपारा मासळी मार्केट रुपांतरीत कोरोना केअर सेंटर रुग्णालयाचे 100% DDF योजनेतील अंदाजपत्रक जोडले आहे.)

तरी, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे 1.3% DDF योजनेन्तर्गत वरुन इंडस्ट्री, गोलानी नाका येथिल कोरोना केअर सेंटर येथे रोहित्र (ट्रान्सफार्मर) उभारणीचे काम करावयाचे असल्याने, महानगरपालिकेने तयार केलेले सन 2020-21 या वित्तीय वर्षातील सार्वजनिक बांधकाम विभाग जिल्हा दरसूची नुसार रक्कम 25,04,493/- रुपयांचे अंदाजपत्रकावर (सोबत जोडलेले तुलनात्मक तक्तानुसार (पृष्ठ क्र.P-33 पहावे.)) 21% कमी दराने ठेकेदाराकडुन काम करुन घेणे उचित राहिल.

तरी, "वैद्यकिय आरोग्य सेवा" हे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 नुसार अत्यावश्यक सेवा वर्गात येत असल्याने वर नमुद केलेले विद्युतीय काम तातडीने करणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत कोरोना (कोविड-19) विषाणुचा प्रादुर्भाव असल्यामुळे निविदा प्रक्रिया राबवुन काम करुन घेण्यास विलंब होईल. याकरिता, शासन नोंदणीकृत विद्युत ठेकेदार **मे.स्नेहा इंटरप्रायजेस, ठाणे** यांचेकडुन, सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत) जिल्हा दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या रक्कम 25,04,493/- रुपयेचे **अंदाजपत्रकावर 21% कमी दराने** काम करुन घेणे उचित वाटते.

याप्रमाणे 1) 630 के.व्ही.ए क्षमतेचे रोहित्र (ट्रान्सफॉर्मर) करिता रक्कम 19,78,550/- रुपये, तसेच 2) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीस 1.3% पर्यवेक्षण शुल्क (सुपरविजन चार्जेस) रक्कम 25,606/- रुपये व 3) ऑक्सिजन प्लांट 200 कि.वॅट व अति दक्षता विभाग (ICU) 200 कि.वॅट असे एकुण 400 कि.वॅट वीज भाराकरिता आवश्यक सि.टी मिटर करिता वीज कनेक्शन चार्जेस व अनामत रक्कम भरणा करणेंकरिता रक्कम 6,00,000/- रुपये असे एकुण रक्कम 26,04,155/- रुपये खर्च अपेक्षित आहे.

तरी वरुण इंडस्ट्री, गोलानी नाका येथील कोरोना केअर सेंटर करिता 630 के.व्ही.ए क्षमतेचे रोहित्र (ट्रान्सफॉर्मर) बसविणेचे काम महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मार्फत न करता **सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत) जिल्हा दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकावर 21% कमी दराने** वर नमुद केलेल्या शासनाच्या नोंदणीकृत ठेकेदाराकडुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 अनुसुची (ड) प्रकरण 5 संविदा 2.2 नुसार निविदा न काढता संविदा करुन कार्यादेश देण्यास तसेच, ऑक्सिजन प्लांट 200 कि.वॅट व अति दक्षता विभाग (ICU) 200 कि.वॅट एकुण 400 कि.वॅट सि.टी मिटर वीज भार व अनामत रक्कम तसेच, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीस 1.3% पर्यवेक्षण शुल्क (सुपरविजन चार्जेस) भरणा करणेंस मा.आयुक्त तथा प्रशासक यांचे मंजुरीस्तव सादर.

प्रस्तावाचा ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वरुण इंडस्ट्री येथे नव्याने 630 के.व्ही.ए क्षमतेचा रोहित्र (ट्रान्सफॉर्मर) बसविणे कामी शासनाच्या नोंदणीकृत ठेकेदार **मे.स्नेहा इंटरप्रायजेस, ठाणे** यांचे कडुन सन 2020-21 या वित्तीय वर्षातील सार्वजनिक बांधकाम विभाग

जिल्हा दरसूची नुसार तयार करणेंत आलेल्या **अंदाजपत्रकीय रक्कमेवर 21% कमी दराने** .काम करुन घेण्यासाठी संविदा करुन कार्यादेश देण्यास तसेच महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीस 1.3% पर्यवेक्षण शुल्क (सुपर्विजन चार्जेस) व सि.टी. मीटर करीता वीज कनेक्शन चार्जेस व अनामत रक्कम भरणा करणेंस मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि- पालघर पिन नं 401 305

दूरध्वनी – 0250 -2525101/02/03/04/05/06, फॅक्स्- 0250- 2525107.

ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. 359

विभाग: वृक्षप्राधिकरण व उद्यान विभाग

दिनांक: १९/०७/2021

प्रस्तावाचा विषय:-

सन २०२१-२२ , सन २०२२-२३ व सन २०२३-२४ या ३ वर्षाकरीता वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये वृक्ष लागवडीकरिता खड्डा खोदुन वृक्ष लागवड करणे आणि तीन वर्षे संगोपन व देखभाल करणेकामाचे बी-२ निविदा प्रक्रियेद्वारे दर मागविणेकामी मान्यता मिळणेबाबत तसेच सदरकामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तिय मांन्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर:-

सादर करण्यात येते की, शहरी भागांतील प्रदुषणाची पातळी दिवसेंदिवस वाढत चालली असुन होणारे प्रदुषण आटोक्यात आणण्यासाठी मोठया प्रमाणात वृक्षलागवड करणे आवश्यक आहे. त्याकरिता स्थानिक हवामानास सुसंगत अशा वृक्षांची निवड करुन त्यांचा वृक्षलागवडीमध्ये अंतर्भाव करणे आवश्यक आहे.

शहरातील रस्ता दुतर्फा, सार्वजनिक ठिकाणे, तसेच मोकळया उपलब्ध जागेनुसार वृक्ष लागवडीकरिताआवश्यक बाबींचे दर मागविणे आवश्यक आहे. महाराष्ट्र (नागरीक्षेत्रे) वृक्ष संरक्षण व संवर्धन नियम २००९ मधील अनुसुचि -२ कलम १६ अन्वये महापालिकेच्या वृक्षप्राधिकरणास प्रत्येक वर्षी कमीतकमी १०००० लागवड करावयाची असुन त्याची वार्षिक वृक्षारोपणाच्या नियोजनामध्ये समावेश करावयाचा आहे. त्यानुसार शहरात २०२०-२१ व सन २०२१-२२ या दोन्ही वर्षांचे २०००० वृक्षलागवड करणे आवश्यक आहे. तसेच शहरातील विकासकामांत बाधीत होणाऱ्या वृक्षांबाबत विकासकांस १ वृक्ष तोडणेस परवानगी देत असताना १:१० या प्रमाणात वृक्षलागड करणे या अटीशर्तीस अधिन राहून परवानगी दिली जाते व विकासकांस त्याप्रमाणात झाडे लावणेस जागा उपलब्ध नसल्यास मा. महासभा ठराव क्र.२० दि. २०/०४/२०१८ अन्वये प्राप्त मंजुरीनूसार जिल्हा दरसुचिप्रमाणे (DSR) १ वृक्ष लागवड करणे व त्याचे ३ वर्ष संगोपन करणे बाबत प्रती वृक्ष रक्कमरू. २२३४.१०/- इतकी रक्कम वृक्षनिधी स्वरुपात जमा करून विकासकास परवानगी दिली जाते. सदर प्राप्त निधीनुसार महानगरपालिकेस उपलब्ध जागेवर शहरात ३१००० वृक्षलागवड करणे आवश्यक आहे. असे एकुण अंदाजित ५१००० इतकी वृक्ष लागवड करणे अपेक्षित आहे.

शासनाने सन २०२० च्या पावसाळ्यात वसंतराव नाईक अभियानांतर्गत वसई विरार शहर महानगरपालिकेस एकुण ६५००० इतक्या वृक्षलागवडीचे उद्दीष्ट दिलेले होते. परंतू कोव्हीड -१९ च्या पादुर्भावामुळे सदर वृक्ष लागवड करणे शक्य झाले नाही. वरील नमुद ५१००० वृक्ष लागवड व अतिरिक्त १४००० अशी एकुण ६५००० वृक्ष लागवड करून सदरचे उद्दीष्ट पुर्ण करता येईल. सदरकामी खड्डा खोदुन वृक्ष लागवड करणे आणि ३ वर्षे संगोपन व देखभाल करणे कामाचे दर मागविणे आवश्यक आहे.

सदरकामी निविदा प्रक्रिया करुन कामाच्या व्याप्तीनूसार खालील नमुद बाबींचे बी-२ निविदा प्रक्रियेद्वारे दर मागविणे आवश्यक आहेत. प्राप्त होणाऱ्या दरांनुसार व कामाच्या व्याप्तीनुसार अंदाजपत्रकास सक्षम मंजुरी घेऊन कार्यादेश देणेत येईल.

अ.क्र	तपशिल	युनिट	दर पृथ्थकरणा प्रमाणे दर रू.
१	Road site tree plantation :Digging pit with size 0.9 m x 0.9 m x 0.9 m, removing and conveying unwanted stuff to a required distance as directed. Filling the pit with approved excavated material upto a height of 0.30 m and remaining height of 0.60 m with fresh garden soil and manure in 3:1 proportion. Mixing soil and manure thoroughly well, levelling, as directed, watering previous night, planting minimum 1 Mtr/1.5 Mtr/2 Mtr height, healthy trees sapling as per	NOS नग	रू.२७५०.५१/-

	specifications. Maintaining till 3 years by watering, weeding, stirring of soil, replacing of causalities etc. complete. रस्ता दुतर्फा वृक्ष लागवड करणे:-०.९ मीटर x०.९ मी x ०.९ मी आकाराचा खडडा खोदणे, अवांछित सामग्री काढणे आणि निर्देशित केल्यानुसार आवश्यक अंतरावर पोहोचविणे. खड्डयाच्या ०.३० मीटर उंचीपर्यंत उत्खनन केलेल्या साहित्याने खडडा भरणे. उर्वरित ०.६० मीटर उंचीपर्यंत ३:१ प्रमाणात ताजे बाग माती व शेणखत भरणे आणि माती व शेणखत चांगले मिसळविणे, निर्देशानुसार रात्रीच्या वेळी पाणी दयावे, १.५ मीटर किंवा २ मीटर उंच निरोगी झाड लावणे. वेळोवेळी झाडांभोवतीचे तण काढणे, माती हलविणे, वेळोवेळी झाडांना पाणी देणे, वेळोवेळी झाडाची मरतुक भरून काढणे इत्यादी कामांच्या व्याप्तीनूसार सदर झाडाची ३ वर्षे वाढ होइपर्यंत संगापन व देखभाल करणे. टिप:-सदर कामामध्ये रोपांचा खर्च वगळता कामाच्या तपशिलानुसार अंतर्भुत केलेल्या सर्व बाबींसह दर मागवायचा आहे.		
२	Mix plantation :-Digging pit with size 0.9 m x 0.9 m x 0.9 m, removing and conveying unwanted stuff to a required distance as directed. Filling the pit with approved excavated material up to a height of 0.30 m and remaining height of 0.60 m with fresh garden soil and manure in 3:1 proportion. Mixing soil and manure thoroughly well, levelling, as directed, watering previous night, planting 1 /1.5/2 Mtr height, healthy trees sapling as per specifications. Maintaining till 3 years by watering, Application of FYM twice in a year, weeding, stirring of soil, replacing of causalities etc. Complete. गट लागवड :०.९ मीटर x०.९ मी x ०.९ मी आकाराचा खड्डा खोदणे, अवांछित सामग्री काढणे आणि निर्देशित केल्यानुसार आवश्यक अंतरावर पोहोचविणे. खड्डयाच्या ०.३० मीटर उंचीपर्यंत उत्खनन केलेल्या साहित्यानेखडडा भरणे. उर्वरित ०.६० मीटर उंचीपर्यंत ३:१ प्रमाणात बाग माती व ताजे शेणखत भरणे आणि माती व शेणखत चांगले मिसळविणे, निर्देशानुसार रात्रीच्या वेळी पाणी देणे, १.५ मीटर किंवा २ मीटर उंच, निरोगी झाड लावणे. वेळोवेळी तण काढणे, माती हलविणे, झाडांना वेळोवेळी पाणी देणे, झाडांना वर्षातुन २ वेळेस खत घालणे, मरतुक झाल्यास झ ाडाची मरतुक भरून काढणे. इत्यादी कामांच्या व्याप्तीनूसार सदर झाडाची ३ वर्षे वाढ होइपर्यंत देखभाल करणे. टिप:-सदर कामामध्ये रोपांचा खर्च वगळता कामाच्या तपशिलानुसारअंतर्भुत केलेल्या सर्व बाबींसह दर मागवायचा आहे.	NOS नग	रू.२७५०.५१/-
३	Small ornamental / flowering trees plantation :Digging pit with size 0.6 m x 0.6 m x 0.6 m, removing and conveying unwanted stuff to a required distance as directed. Filling the pit with approved excavated material up to a height of 0.30 m and remaining height of 0.30 m with fresh garden soil and manure in 3:1 proportion. Mixing soil and manure thoroughly well, levelling, as directed, watering previous night, planting 1 /1.5 Mtr height, healthy trees sapling as per specifications. Maintaining till 3 years by watering,Application of FYM twice in a year, weeding, stirring of soil, replacing of causalities etc. Complete. शोभिवंत व फ्लॉवरींग रोपेलागवड करणे:०.६ मीटर x०.६ मी x ०.६ मी आकाराचा खडडा खोदणे, अवांछित सामग्री काढणे आणि निर्देशित केल्यानुसार आवश्यक अंतरावर पोहोचविणे. खड्डयाच्या ०.३० मीटर उंचीपर्यंत	NOS नग	रु.२०४९.३५/-

	उत्खनन केलेल्या साहित्याने खडडा भरणे. उर्वरित ०.६० मीटरउंचीपर्यंत ३:१ प्रमाणात बाग माती व ताजे शेणखत भरणे आणि माती व शेणखत चांगले मिसळविणे, निर्देशानुसार रात्रीच्या वेळी पाणी देणे, १ मीटर /१.५ मीटर उंच, निरोगी झाड लावणे. वेळोवेळी तण काढणे, माती हलविणे, झाडांना वेळोवेळी पाणी देणे, झाडांना वर्षातुन २ वेळेस खत घालणे, मरतुक झाल्यास झाडाची मरतुक भरून काढणे. इत्यादी कामांच्या व्याप्तीनूसार सदर झाडाची ३ वर्षे वाढ होइपर्यंत देखभाल करणे. टिप:- सदर कामामध्ये रोपांचा खर्च वगळता कामाच्या तपशिलानुसार अंतर्भुत केलेल्या सर्व बाबींसह दर मागवायचा आहे.		

सदर वरील नमुद केल्याप्रमाणे अंदाजित ६५००० वृक्ष लागवडीकामी खड्डा खोदुन वृक्ष लागवड करणे आणि ३ वर्षे संगोपन व देखभाल करणेया कामी पार्क अँडगार्डन डी. एस. आर २०१५-१६ नुसार तयार करण्यात आलेल्या दर पृथ्थकरणानुसार एकूण अंदाजित रक्कम रु. १६,४७,६०,१५०/- (अक्षरी :- सोळा कोटी सत्तेचाळीस लक्ष साठ हजार एकशे पन्नास रुपये मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे. सदरकामी वृक्षलागवडीचे कामाकरीता वृक्ष लागवड, प्रथम वर्ष संगोपन व देखभाल, द्वितीय वर्ष संगोपन व देखभाल आणि तृत्तीय वर्ष संगोपन देखभालीकामी खालील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

अ.क्र.	तपशिल	अंदाजित संख्या	वृक्ष लागवडीकरीता अपेक्षित खर्च	प्रथम वर्ष अपेक्षित खर्च	द्वितीय वर्ष अपेक्षित खर्च	तृत्तीय वर्ष अपेक्षित खर्च
१.	रस्ता दुतर्फा / गट वृक्ष लागवड (खड्याचा आकार ०.९ मी. x ०.९ मी x ०.९ मी)	४५०००	रु. ३,४८,३२,२५०/-	रु. ३,३७,०४,५५०/-	रु. २,६३,०२,९५०/-	रु. २,८९,३३,२००/-
२.	वृक्ष लागवड (खड्याचा आकार ०.६ मी. x ०.६ मी x ०.६ मी)	२००००	रु. ६०,४७,८००/-	रु. १,३३,५९,४००/-	रु. १,०२,७६,२००/-	रु. १,१३,०३,८००/-
एकूण		६५०००	रु. ४,०८,८०,०५०/-	रु. ४,७०,६३,९५०/-	रु. ३,६५,७९,१५०/-	रु. ४,०२,३७,०००/-
एकुण अंदाजित खर्च			**रु. १६,४७,६०,१५०/-**			

ठराव - सन २०१९-२० व सन २०२०-२१ या वित्तीय वर्षाकरीता वसई-विरार शहर महानगरपालिका डिझेल जनित्र यांची देखभाल दुरूस्ती करणे व आवश्यक स्पेअरपार्ट (साहित्यासह) फिटींग करणे तसेच पर्यायी व्यवस्थेकरीता भाडेतत्वावर जनित्र(जनरेटर) घेणे याकामी मागविण्यात आलेली ई-निविदा प्रक्रीया रद्द करून सन २०२१-२२, सन २०२२-२३ व सन २०२३-२४ या त्रैवार्षिक वर्षाकरीता वसई-विरार शहर महानगरपालिकेमधील डिझेल जनित्रांची देखभाल दुरूस्ती करणे व आवश्यक स्पेअरपार्ट (साहित्यासह) फिटींग करणे तसेच पर्यायी व्यवस्थेकरीता भाडेतत्वावर डिझेल जनित्र पुरवठा करणेकामी ई-निविदा मागविण्यांस व त्यासाठी येणाऱ्या अंदाजित रक्कम १ कोटी रूपये त्रैवार्षिक खर्चास तसेच सन २०१८-१९ या वित्तीय वर्षातील मंजूर निविदाधारकास सन २०२१-२२, २०२२-२३ व २०२३-२४ या वर्षातील देखभाल दुरूस्ती करणे व आवश्यक स्पेअरपार्ट (साहित्यासह) फिटींग करणे कामाची निविदा प्रक्रीया पुर्ण होईपर्यंत मुदतवाढ देणेस प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणेत येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि- पालघर, पिन नं.-४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५० - २५२५१०७
ई-मेल - vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. :- ४२६ विभाग :- परिवहन

दिनांक :-३०/०७/२०२१

विषय :- <u>वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील जेष्ठ नागरिक, दिव्यांग, कॅन्सर पिडीत व रक्तशुध्दीकरण (डायलेसिस) करुन घेणारे नागरिकांना परिवहन सेवेत मोफत बस पास योजना पुन:श्च सुरु करणेबाबत.</u>

<u>प्रस्तावाचा मजकूर</u> :- वसई विरार शहर महानगरपालिकेची स्थापना ३ जूलै २००९ रोजी झालेली असून महापालिका परिवहन सेवा B.O.O.M (BUY, OWN, OPERATE & MAINTAIN) पध्दतीने रॉयल्टी तत्वावर बस ऑपरेटर यांच्यामार्फत दि. ०३/१०/२०१२ पासून सुरु करण्यात आलेली होती. मागील बस ऑपरेटर यांच्या समवेत केलेल्या करारनाम्यातील अट क्र. १४ अन्वये **राज्य परिवहन महामंडळाच्या धर्तीवर फक्त पात्र जेष्ठ नागरिक, अपंग व मनपा हद्दीतील शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थी यांना प्रवासासाठी सवलती व पासेस द्यावे लागतील.** असे नमुद होते. त्यानुसार परिवहन सेवेत शहरातील जेष्ठ नागरिकांना ५०% तिकीट दरात बस ऑपरेटर यांचेकडून शासन नियमानुसार सवलत देण्यात येत होती व उर्वरीत ५०% जेष्ठ नागरिकांना स्वत: खर्च करावे लागत होते.

करिता जेष्ठ नागरीक, दिव्यांग, कर्करोगपिडीत व रक्तशुध्दीकरण (डायलेसिस) करुन घेणारे नागरिकांना वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीत विनामुल्य बसपास योजना सुरु करणेबाबत मा. परिवहन समिती सभापती, परिवहन समिती यांनी तोंडी निर्देश दिले होते.

त्याअनुषंगाने जेष्ठ नागरीक, दिव्यांग, कर्करोगपिडीत व रक्तशुध्दीकरण (डायलेसिस) करुन घेणारे नागरिकांना मोफत बस पास देणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण ६ मध्ये महानगरपालिकेची आवश्यक व स्वेच्छाधीन कर्तव्ये नमुद आहेत त्यातील कलम ६३(१-अ), कलम ६६(२५) तसेच भारताच्या संविधानातील राज्य धोरणाच्या मार्गदर्शक तत्वामधील कलम-३९ (क) व ४१ मधील तरतुदी नुसार व महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाचे शासन निर्णय क्र.सी.व्ही.ए०१८७/७१४/५बदि.०४/०३/१९९१ नुसार सवलत देता येईल.

सदर शासन निर्णय हा परिवहन सेवेतून प्रवास करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांना सवलत देणेबाबत असून त्याच आधारावर शहरातील जेष्ठ नागरिकांना बस प्रवासात सवलत देणेकामी शासन निर्णयातील **१/३ (सवलत घटक) X वर्षाच्या शेवटच्या दिवशी असलेली पोलीस कर्मचाऱ्यांची संख्या X एका प्रौढ व्यक्तीचे प्रवास भाडे x२ (फेऱ्या) x ३६५(वर्षाचे दिवस) = एकूण देयक रक्कम.** या सुत्राचा वापर करुन वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील ६० वर्षावरील जेष्ठ नागरीक, दिव्यांग, कर्करोगपिडीत व रक्तशुध्दीकरण (डायलेसिस) करुन घेणारे नागरिक यांना पालिका क्षेत्रमर्यादीत परिवहन सेवेच्या बसमधुन मोफत प्रवास देणेकामी करणेसाठी प्रभाग समिती

स्तरावर संबंधित समितीचे सहा.आयुक्त यांचेकडून कार्यवाही करुन मोफत बसपास देण्यास व बस पासापोटी शासकिय नियमानुसार ५०% पासाची रक्कम बस ऑपरेटर यांना गृह विभागाचे सुत्रानुसार प्रती फेरा रु.१७/- पासाची रक्कम धरुन बील प्रती माहे अदा करणेच्या अटींवर योजना मागील बस ऑपेटर यांचेमार्फत राबविण्यात येत होती.

परंतु सदर बस ऑपरेटर यांनी परिवहन सेवा चालविणेस असमर्थता दर्शविली. करिता महानगरपालिकेने ई-निविदा प्रक्रिया राबवून BOOM (BUY, OWN, OPERATE & MAINTAIN) पध्दतीने रॉयल्टी तत्वावर मे.एस.एन.एन (भागिदारी संस्था) यांना दि. ०५/०१/२०२१ पासून १० वर्षांचा करारनामा करुन चालविण्यास देण्यात आलेली आहे. सदर ऑपरेटर यांचेसमवेत दि. २७/११/२०२० रोजी केलेल्या करारनाम्यातील अट क्र. २९ नुसार **"महानरपालिकेच्या वतीने वेळोवेळी जाहिर केलेल्या योजना राबविणे बस ऑपरेटर यांना बंधनकारक राहील. त्यापोटी होणारी रक्कम महानगरपालिकेकडून बस ऑपरेटर यांना देण्यात येईल."**असे नमुद आहे. त्यानुसार परिवहन सेवा पूर्ववत सुरु करणेत आलेली असल्याकारणाने पूर्वी सुरु असलेल्या योजना परिवहन सेवेमार्फत पुन:श्च राबविणेकामी अनेक नागरिकांमार्फत विचारणा होत आहे.

करिता जेष्ठ नागरीक, दिव्यांग, कर्करोगपिडीत व रक्तशुध्दीकरण (डायलेसिस) करुन घेणारे नागरिकांना वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीत विनामुल्य बसपास योजना पुन:श्च सुरु करणे आवश्यक आहे.

यापूर्वी माहे जानेवारी २०२० पासुन राबविण्यात आलेल्या जेष्ठ नागरीक, दिव्यांग, कर्करोगपिडीत व रक्तशुध्दीकरण (डायलेसिस) करुन घेणारे नागरिकांना वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीत विनामुल्य बसपास योजनेअंतर्गत महानगरपालिकेमार्फत देण्यात आलेल्या बस पासची संख्या खालीलप्रमाणे :

अ.क्र.	प्रभाग समिती	बस पास वाटप केलेल्याची संख्या
१	ए	२७८२
२	बी	११८८
३	सी	१८२
४	डी	१७६६
५	ई	२६९६
६	एफ	३२७
७	जी	५९२
८	एच	२६१४
९	आय	२८१५
एकुण		**१४९६२**

यासाठी वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील बसचा सर्वात लांब पल्ला हा वसई तहसिल कचेरी ते विरार स्टेशन हा १८ ते २० कि.मि. दरम्यानचा मार्ग असुन हा बस प्रवासाचा १० वा टप्पा आहे. सदर मार्गाचे प्रवास भाडे हे प्रौढासाठी प्रति फेरी रु.३०/-आहे. परंतु सर्व जेष्ठ नागरिक या लांब पल्ल्यांचा प्रवास करतील असे नाही करिता ५ व्या टप्प्यांच्या प्रौढ भाडे रु.१३/-प्रमाणे अंदाजित खर्च खालीलप्रमाणे :-

१/३ x १४९६२ (जेष्ठ नागरिक) x १३ x २ (फेऱ्या) x ३६५ = रु. ४,७३,२९,७९३/-

म्हणजेच जेष्ठ नागरीक, दिव्यांग, कर्करोगपिडीत व रक्तशुध्दीकरण (डायलेसिस) करुन घेणारे नागरिकांना मोफत प्रवास सवलत द्यावयाची असल्यास ४,७३,२९,७९३/-

म्हणजेच जेष्ठ नागरीक, दिव्यांग, कर्करोगपिडीत व रक्तशुध्दीकरण (डायलेसिस) करुन घेणारे नागरिकांना मोफत प्रवास सवलत द्यावयाची असल्यास ४,७३,२९,७९३/- रक्कम ठेकेदारास अदा करावी लागेल. परंतु ठेकेदारासमवेत असलेल्या करारानुसार ठेकेदाराला ५०% बस प्रवासात सवलत जेष्ठ नागरिकांना देणे बंधनकारक आहे. त्यामुळे रक्कम रुपये ४,७३,२९,७९३/-च्या रकमेतून ५०% रक्कम वजा करुन उर्वरित अंदाजित रक्कम रुपये २,३६,६४,८९७/- ठेकेदारास जेष्ठ नागरिकांपोटी प्रतीवर्षी अदा करावी लागेल.

सदर रक्कम सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पातील विना तिकीट प्रवास खर्च या लेखाशिर्षाअंतर्गत शिल्लक असलेल्या तीन कोटी नव्वद लक्ष तरतुदीमधुन अदा करणे योग्य होईल.

<u>सदर योजना जेष्ठ नागरिकंचा विचार करता लवकरात लवकर सुरु करावयाची</u> असल्यास पुढीलप्रमाणे कार्यवाही प्रभाग समिती स्तरावर होणे आवश्यक आहे.

जेष्ठ नागरीक, दिव्यांग, कर्करोगपिडीत व रक्तशुध्दीकरण (डायलेसिस) करुन घेणारे नागरिकांना पूर्वी दिलेल्या पासच्या मागील बाजूस पासची मुदत ३१/०३/२०२२ पर्यंत नमुद करावी. परंतु सदर पासची मुदत वाढवून देतेवेळीस महानगरपालिकेच्या वैद्यकिय आरोग्य अधिकारी / राजपत्रित अधिकारी यांचेकडून दिलेला हयातीचा दाखला (Life certificate) घेणे बंधनकारक राहील. तसेच नवीन लाभार्थ्याला बसपास देताना पूर्वीप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

तरी वसई विरार शहर महानगरपालिका परिवहन सेवेचे बस ऑपरेटर मे. एस.एन.एन (भागिदारी संस्था) यांचेमार्फत जेष्ठ नागरीक, दिव्यांग, कर्करोगपिडीत व रक्तशुध्दीकरण (डायलेसिस) करुन घेणारे नागरिकांना मोफत बस पास योजना पुन:श्च सुरु करणेबाबत व त्याकामी होणारा अंदाजित खर्च रु. ३,५०,००,०००/- **विना तिकीट प्रवास सवलतीसह महानगरपालिकेकडून दिव्यांग, जेष्ठ नागरिक हयांना बस प्रवासापोटी देण्यात येणाऱ्या सवलतीची तसेच महानगरपालिकेच्या अन्य योजना व कार्यक्रमासाठी बससेवा उपलब्ध करुन देण्यासाठी अंशदान** या लेखाशिर्षाअंतर्गत करणेच्या प्रस्तावास मा. परिवहन समिती सभेची मंजूरी प्राप्त होऊन अंतिम मंजूरीस्तव सदरचा प्रस्ताव मा. आयुक्त तथा प्रशासक यांचेकडे सविनय सादर.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील ६० वर्षावरील जेष्ठ नागरीक, दिव्यांग, कर्करोग पिडीत व रक्तशुध्दीकरण (डायलेसिस) करुन घेणारे नागरिक यांना महानगरपालिका क्षेत्र मर्यादित परिवहन सेवेच्या बसमधुन मोफत बस प्रवास करणेसाठी मोफत बस पास योजना दि. ०१ ऑगस्ट २०२१ पासून पुन:श्च सुरु करणेत यावी. तसेच बस पास देणेची कार्यवाही लाभार्थ्यांच्या सोयीकरिता प्रभाग समितीमार्फत करण्यास व लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सवलतीपोटीची रक्कम योजनेनुसार प्रतीमाहे अदा करण्यास अंतिम प्रशासकिय व वित्तीय मंजूरी देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक

वसई विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.पालघर, पिन नं.४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५० २५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई- मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ४१७

विभाग :- सार्व.बांधकाम विभाग
दिनांक : ३०/०७/२०२१

---

१) प्रस्तावाचा विषय :- वसई - विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती - ए, बोळींज येथे प्रभाग क्र.१७ मध्ये तिरुपती भाजी मार्केट येथे पत्र्याच्या शेडची दुरुस्ती करणे कामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

२) प्रस्तावाचा मजकूर :- वसई - विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'ए', बोळींज मध्ये वॉर्ड क्र.१७ मध्ये तिरुपती भाजी मार्केट अस्तित्वात आहे. सदर मार्केटमध्ये अंदाजे ६० भाजीविक्रेते भाजी विकत आहे. परंतु मे २०२१ मध्ये झालेल्या 'तौत्के' वादळामुळे सदर मार्केटवरील पत्र्याचे नुकसान झाले आहे. सदर मार्केटवरील पत्र्याचे नुकसान झाल्यामुळे पावसाळ्यात पावसाळी पाणी मार्केटमध्ये पडून पाणी साचण्याची ताट शक्यता आहे. सदर काम त्वरित करुन घेणे गरजेचे आहे.

उपरोक्त नमुद ठिकाणी प्रभाग समिती अे मध्ये प्रभाग क्र.१७ मध्ये तिरुपती भाजी मार्केट येथे पत्र्याच्या शेडची दुरुस्ती करणेचे काम करावयाचे आहे. याकरिता बांधकाम संबंधीत कामाचे सन २०१९-२० या वित्तीय वर्षाचे सार्वजनिक बांधकाम विभाग राज्य दर सुचीनुसार अंदाजपत्रक बनविण्यात आले आहे.

सदर कामी राज्य दरसुची सन २०१९-२० नुसार पुढीलप्रमाणे काम करणे आवश्यक आहे.

अंतर्भूत बाब	अंदाजित खर्च
पत्र्याच्या शेडची दुरुस्ती करणे	रु.८,५०,१८२/-

३) ठराव :- वसई - विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती - ए, बोळींज येथे प्रभाग क्र.१७ मध्ये तिरुपती भाजी मार्केट येथे पत्र्याच्या शेडची दुरुस्ती करणे कामी तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकास व त्यानुसार होणाऱ्या रक्कम रु.८,५०,१८२/- अंदाजित खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६७ (३) (क) अन्वये आयुक्तांचे अधिकार व कर्तव्य नुसार राज्य दरसुची प्रमाणे तयार केलेल्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई - विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.पालघर, पिन नं.४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५० २५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई- मेल vasaivirarcorporation@yahoo.com

ठराव क्र. ६१८ विभाग :- सार्व.बांधकाम विभाग
दिनांक : ३०/०५/२०२१

---

१) प्रस्तावाचा विषय :- **वसई - विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती - ए, बोळींज येथे प्रभाग क्र.१७ मध्ये तिरुपती भाजी मार्केट येथे पत्र्याच्या शेडची दुरुस्ती करणेकामी नोंदणीकृत ठेकेदारामार्फत काम करुन घेणेसाठी मान्यता मिळणेबाबत.**

२) प्रस्तावाचा मजकूर :- सादर करण्यात येते की, वसई - विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'ए', बोळींज मध्ये वॉर्ड क्र.१७ मध्ये तिरुपती भाजी मार्केट अस्तित्वात आहे. सदर मार्केटमध्ये अंदाजे ६० भाजीविक्रेते भाजी विकत आहे. परंतु मे २०२१ मध्ये झालेल्या 'तौक्ते' वादळामुळे सदर मार्केटवरील पत्र्याचे नुकसान झाले आहे. सदर मार्केटवरील पत्र्याचे नुकसान झाल्यामुळे पावसाळ्यात पावसाळी पाणी मार्केटमध्ये पडून पाणी साचण्याची ताट शक्यता आहे. सदर काम त्वरित करुन घेणे गरजेचे आहे.

सदर मार्केटच्या पत्र्याच्या शेडची दुरुस्ती केल्यास पावसाळी पाण्याचा निचरा सुरळीत होण्यास मदत होणार आहे. याकरिता बांधकाम संबंधीत कामाचे सन २०१९-२० या वित्तीय वर्षाचे सार्वजनिक बांधकाम विभाग राज्य दर सुचीनुसार रक्कम रु.८,५०,१८२/- चे अंदाजपत्रक बनविण्यात आले आहे. त्यानुसार वरील काम करण्याकरिता **मे.विजय कंन्स्ट्रक्शन** या मान्यता प्राप्त ठेकेदाराने तातडीन काम करणेबाबत समर्थता दर्शविलेली आहे.

उपरोक्त नमुद काम करणेकरिता महाराष्ट्र महापालिका अधिनियम अनुसची 'ड' प्रकरण ५ संविदा २-२ नुसार निविदा न काढता वर नमुद केलेल्या मान्यता प्राप्त नोंदणीकृत ठेकेदाराकडून राज्य दर सुचीनुसार तयार केलेल्या अंदाजपत्रकानुसार काम करुन घेणेसाठी संविदा करण्यास कार्यादेश देण्यास मा.आयुक्त ह्यांचे मंजूरीस्तव सादर.

३) ठराव :- वसई - विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती - ए, बोळींज येथे प्रभाग क्र.१७ मध्ये तिरुपती भाजी मार्केट येथे पत्र्याच्या शेडची दुरुस्ती करणे कामी महाराष्ट्र महापालिका अधिनियम अनुसची 'ड' प्रकरण ५ संविदा २-२ नुसार निविदा न काढता मनपाचे नोंदणीकृत ठेकेदार मे.विजय कंन्स्ट्रक्शन यांचे मार्फत राज्य दरसूची नुसार तयार केलेल्या अंदाजपत्रकानुसार काम घेणेसाठी संविदा करण्यास व कार्यादेश देण्यास मा.आयुक्त सो. ह्यांचे मंजुरीस्तव सादर.

२०% कमी दराने

आयुक्त तथा प्रशासक
वसई - विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ४७९ विभाग :- पाणी पुरवठा
दिनांक :- ३० /०७/ २०२१

विषय :- केंद्रशासन पुरस्कृत अमृत अभियान अंतर्गत वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील दत्तानी येथे १.५० द.ल.ली क्षमतेचे व वालिव इंडस्ट्रिअल एरिया येथे १.५० द.ल.ली क्षमतेचे जलकुंभ उभारणे कामी प्राप्त निविदापैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.

अंदाजपत्रकीय रक्कम	:-	**रु. ३,२०,७२,१४५/-**
प्रशासकीय मान्यता	:-	१) मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. १६ दि. २०/०१/२०१६ २) शासन निर्णय क्र. अमृत २०१६ / प्र. क्र. १४५ (५) / नवि-३३ दि. १९/०४/२०१७ अन्वये रु. १३९.३७ कोटीस मान्यता ३) मा. प्रशासक ठराव क्र. २९८ दि. २४/१२/२०२०
ई - टेंडरींग द्वारे निविदा सुचना प्रसिद्ध	:-	जा.क्र. वविशम/पापु/५५३/२०२१ दि. १८/०१/२०२१
वृत्तपत्रातील प्रथम वेळ जाहिर निविदा ई - टेंडरींग द्वारे निविदा प्रसिद्धी	:-	दै. लोकमत, दै. प्रहार, दै. नरविर चिमाजी, दै. प्रात:काळ, दै. यशोभुमी, दै. इंडियन एक्सप्रेस, दै. मिड-डे दि. १९/०१/२०२१
वृत्तपत्रातील व्दितीय वेळ प्रसिद्धी	:-	जा.क्र. वविशम/पापु/६७६/२०२१ दि. ०२/०३/२०२१
वृत्तपत्रातील व्दितीय वेळ जाहिर निविदा प्रसिद्धी	:-	दै. मुंबई केसरी, दै. यशोभुमी, दै. आमची मुंबई, दै. सकाळ, दै. द इंडियन एक्सप्रेस, दै. द फ्रि प्रेस जर्नल, दि. ०३/०३/२०२१
प्रि. बीड मिटींग	:-	दि. १२/०३/२०२१
वृत्तपत्रातील व्दितीय जाहिर निविदेस प्रथम वेळ मुदतवाढ प्रसिद्धी	:-	जा.क्र. वविशम/पापु/७१८/२०२१ दि. १७/०३/२०२१
वृत्तपत्रातील व्दितीय जाहिर निविदेस प्रथम वेळ मुदतवाढ निविदा प्रसिद्धी	:-	दै. मुंबई केसरी टाईम्स, दै. यशोभुमी, दै. आमची मुंबई, दै. सकाळ, दै. द इंडियन एक्सप्रेस, दै. द फ्रि प्रेस जर्नल, दै. पुण्यनगरी, दि. १८/०३/२०२१
ई - टेंडरींग द्वारे व्दितीय वेळ मुदतवाढ प्रसिद्धी		जा.क्र. वविशम/पापु/७३७/२०२१ दि. २२/०३/२०२१
वृत्तपत्रातील व्दितीय जाहिर निविदेस व्दितीय वेळ मुदतवाढ निविदा प्रसिद्धी	:-	दै. मुंबई केसरी टाईम्स, दै. यशोभुमी, दै. आमची मुंबई, दै. सकाळ, दै. द इंडियन एक्सप्रेस, दै. द फ्रि प्रेस जर्नल, दै. पुण्यनगरी, दि. २३/०३/२०२१

ई - टेंडरींग द्वारे तृतिय वेळ प्रसिद्धी		जा.क्र. वविशम/पापु/३८/२०२१ दि. १५/०४/२०२१
वृत्तपत्रातील निविदेस तृतिय वेळ निविदा प्रसिद्धी	:-	दै. सकाळ, दै. पूण्यनगरी, दै.यशोभुमी, दै. मुंबई केसरी टाईम्स, फ्रि प्रेस जर्नल, दै. आमची मुंबई, दै. द इंडियन एक्सप्रेस दि. १६/०४/२०२१
ई - टेंडरींग द्वारे चतुर्थ वेळ प्रसिद्धी	:-	जा.क्र. वविशम/पापु/ १४२/२०२१ दि. १०/०५/२०२१
वृत्तपत्रातील निविदेस चतुर्थ वेळ निविदा प्रसिद्धी	:-	दै. महाराष्ट्र टाईम्स, दै. वृत्तमानस, दै. प्रहार, दै. नवभारत, दै. पुर्णविराम, दै. फ्रि प्रेस जर्नल व दै. स्टॅण्डर्ड पोस्ट दि. १२/०५/२०२१
ई - टेंडरींग द्वारे चतुर्थ वेळ प्रसिद्धी प्रथम वेळ मुदतवाढ	:-	जा.क्र. वविशम/पापु/ १६१/२०२१ दि. २४/०५/२०२१
वृत्तपत्रातील निविदेस चतुर्थ वेळ निविदा प्रसिद्धी प्रथम वेळ मुदतवाढ	:-	दै. महाराष्ट्र टाईम्स, दै. वृत्तमानस, दै. प्रहार, दै. नवभारत, दै. पुर्णविराम, दै. फ्रि प्रेस जर्नल व दै. स्टॅण्डर्ड पोस्ट दि. २५/०५/२०२१
ई - टेंडरींग द्वारे पंचम वेळ प्रसिद्धी	:-	जा.क्र. वविशम/पापु/ २३०/२०२१ दि. ११/०६/२०२१
वृत्तपत्रातील निविदेस पंचम वेळ निविदा प्रसिद्धी	:-	दै. सामना, दै. पुढारी, दै. प्रात:काल, दै. मुंबई चौफेर,दै.जागरुक टाईम्स, दै. इंडियन एक्सप्रेस, दै. स्टँडर्ड पोस्ट, दि. १४/०६/२०२१
ई - टेंडरींग द्वारे निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा)	:-	दि. ०६/०७/२०२१
विहीत मुदतीत ऑनलाईन प्रक्रियेद्वार प्राप्त निविदा	:-	०१
प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी	:-	मा. शहर अभियंता
ई - टेंडरींग द्वारे निविदा उघडण्याची दिनांक (व्दितीय लखोटा)	:-	दि. २२/०७/२०२१
विहीत मुदतीत ऑनलाईन प्रक्रियेद्वारे पात्र निविदाकार	:-	०१

प्राप्त निविदा निविदासमिती पुढे उघडल्या असता त्याचे दर खालीलप्रमाणे आहेत.

अ.क्र	निविदा धारकाचे नाव	निविदा दर
१	**मे. राजू एस. बोरसे**	३१.११ % जादा दराने **(वाटाघाटी अंती २०.०० % जादा दराने)**

उपरोक्त कामी पाचव्या कॉल अंती एक निविदा प्राप्त झाली असून **मे. राजू एस. बोरसे** यांनी अंदाजपत्रकीय रक्कमेच्या ३१.११% जादा दररची निविदा सादर केली आहे. सदर दर महापालिकेस जास्त वाटत असल्याने शहर अभियंता यांनी जा. क्र. वविशम / शअ / पापु / ३७१ /२०२१ दि. २२/०७/२०२१ अन्वये **मे. राजू एस. बोरसे** यांना वाटाघाटीने दर कमी करण्याच्या चर्चेसाठी निमंत्रित केले असता **मे. राजू एस. बोरसे** यांनी दि. २७/०७/२०२१ च्या पत्रान्वये वाटाघाटी अंती अंदाजपत्रकीय रक्कमेच्या २०.०० % जादा दराने काम करणे शक्य असल्याचे कळविले आहे. निविदेचे दर हे सन २०१९-२० म.जी.प्रा.च्या दरसुचीवर आधारीत आहेत. सन २०२०-२१ दरसुची नुसार दरांची तुलना केल्यास सदरचा देकार हा चालू दरसुची वर १३.४८% जादा दराचा असल्याचे दिसून येत आहे. उंच जलकुंभ कामाकरीता जास्त प्रमाणात लागणारे सिमेंट, स्टील व इतर बांधकाम साहीत्याची बाजारात मोठया प्रमाणात वाढ झाली आहे ती खालील प्रमाणे :-

Sr. No.	Particulars	DSR Rate 2019-20	Present Market Rate	Difference in %
1	Reinforcement Steel	43,030/- per M.T	53,000/- per M.T	23.17 %
2	Cement	4,969 per M.T i.e Rs. 248.45 per bag	360/- per bag	44.89 %

वरील साहीत्याचे वाढलेले बाजारभावाचे दर पहाता सदरचे देकार योग्य व वाजवी वाटत असल्याने **मे. राजू एस. बोरसे** यांच्या वाटाघाटी अंती २०.००% जादा दराच्या निविदेनुसार संविदा करणे कामी मा. निविदा समितीने दि. ३०/०७/२०२१ रोजीच्या बैठकीत मंजुरीकरीता शिफारस केलेली आहे.

तरी **मे. राजू एस. बोरसे** यांच्या अंदाजपत्रकीय रक्कमेच्या २०.००% जादा दराची निविदा योग्य व वाजवी असल्यामुळे, **मे. राजू एस. बोरसे** यांच्याशी कामाची संविदा करणेस मान्यता देणेसाठी व वित्तीय मान्यतेस्तव मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

ठराव :- १) केंद्रशासन पुरस्कृत अमृत अभियान अंतर्गत वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील दत्तानी येथे १.५० द.ल.ली क्षमतेचे व वालिव इंडस्ट्रिअल एरिया येथे १.५० द.ल.ली क्षमतेचे जलकुंभ उभारणे कामी **मे. राजू एस. बोरसे** यांनी सादर केलेल्या वाटाघाटी अंती २०.००% जादा दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

२) सदर कामी मनपा तर्फे कायदेशिर बाबींची पुर्तता करुन संविदा करण्यास मा.आयुक्त तथा प्रशासक यांची मंजूरी असे.

३) प्रशासकीय ठराव क्र. २९८ दि. २४/१२/२०२० अन्वये विषयांकीत कामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत आली असून वरील मंजूर निविदा दरानुसार येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास सुधारीत वित्तीय मान्यता देण्यांत येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.- पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ४२०

विभाग:- माहिती तंत्रज्ञान
दिनांक:- ३०/०७/२०२१

प्रस्तावाचा विषय:- वसई विरार शहर महानगरपालिकेतील ई-गव्हर्नन्स प्रकल्पाअंतर्गत विविध विभागांचे कामकाज संगणक प्रणालीव्दारे, स्व:तचे स्टेशनरी, संगणक यंत्रणा, सर्वर व आज्ञावली (Software) वापरुन ऑनलाईन स्वरुपात ठेका पध्दतीने चालविणेकरीता ई-निविदा द्वारे सन सन २०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५ व २०२५-२६ करीता एजन्सी नियुक्त करणे बाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या मुख्यालय, ९ प्रभाग समिती कार्यालयांतील व त्या अंतर्गत उपविभागीय कार्यालयातील विविध विभागांचे दैनंदिन काम शासन निर्देशाप्रमाणे ई- गव्हर्नस/ संगणकीय पध्दतीने करण्यात येत आहे. ई- गव्हर्नस प्रकल्पाअंतर्गत अधुनिकिकरण करणेकरीता संगणक प्रणाली, स्व:तचे तंत्रिक मनुष्यबळ, संगणक यंत्रणा व आज्ञावलीसह (Software) वापरुन ऑनलाईन स्वरुपात ठेका पध्दतीने चालविणेकरीता मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.५८९ दि.२०/०२/२०१९ अन्वये मंजुरी घेऊन तीन वर्षाकरीता (सन २०१८-१९,२०१९-२०,२०२०-२१) एजन्सी नियुक्त करण्यात आली होती. सदर ठेक्याच्या कालावधीत वसई विरार शहर महानगरपालिकेने ई-गव्हर्नस अंतर्गत विविध सेवा/सुविधांची अंमलबजावणी सन २०१९-२० व २०२०-२१ दरम्यान केली.

सदर ठेक्याचा कालावधी माहे मार्च २०२१ मध्ये संपुष्ठात येत आहे. तरी ई-गव्हर्नस अंतर्गत उपरोक्त नमूद कामकाज सेवा, सुविधा सुरळतीपणे चालू राहण्यासाठी मा.आयुक्त सो! यांनी पाच वर्षाकरीता एजन्सी नियुक्त करणे कामी निर्देश दिले असून १ एप्रिल २०२१ ते ३१ मार्च २०२२, १ एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२३, १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४, १ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५, १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या पाच वर्षांकरीता एजन्सी नियुक्त करणे गरजेचे आहे.

सदर कामी एजन्सी नियुक्त करून पुढील कामकाज,सेवा,सुविधांची अंमलबजावणी व दैनंदिन कामकाजाचे व्यवस्थापन प्रस्तावीत करण्यात येत आहे.

अ.क्र	सेवेचा तपशिल
१.	वसई विरार शहर महानगापालिकेच्या विविध विभाग/उपविभागनिहाय आवक- जावक विभाग, विवाह नोंदणी, लेखा विभाग, तक्रार व्यवस्थापन इ. दैनदिन कामकाजाचे व्यवस्थापन व ऑनलाईन पध्दतीने कामकाज करणे.
२	घरपट्टी- A) वसई विरार शहर महानगरपालिकेच्या विविध विभाग/उपविभागामधील सर्व घरपट्टी विभागाचे कामकाजासाठी एजन्सी मार्फत तांत्रिक मनुष्यबळ, स्टेशनरी, संगणक यंत्रणा, आज्ञावली (Software) वापरुन वार्षीक देखभाल दुरुस्तीसह चालविणे व ऑनलाईन पध्दतीने कामकाज करणे, आकरणी नोंदवही तयार करणे, मागणी नोंदवही तयार करणे, आवश्यकतेनुसार वाढ घट नोंदवही तयार करणे, बिले छपाई करणे.

	B) ऑनलाईन/ऑफलाईन भरणा केलेल्या ग्राहकाच्या नोंदी दैनदिन अद्यावत करणे व त्यांची रोजकीद चलन तयार करणे, घरपट्टी भरणा करण्यासाठी येणा-या मालमत्ता धारकांना संगणीकृत पावती देणे व त्यांची रोजकीर्द चलन तयार करणे. C) ONLINE व OFFLINE कर भरणा-या ग्राहकांचे दैनदिन MIS Report तयार करणे. कर्मचा-यामार्फत वसुली केलेल्या पावत्या खतवणे व त्यांची रोजकीद चलन तयार करणे,वेळोवेळी लागणारे अहवाल मागणी प्रमाणे उपलब्ध करुन देणे. D) महानगरपालिकेची थकबाकी असलेल्या मालमत्ता धारकांची थकबाकी यादी तयार करणे, जप्तीपूर्व समज मागणीनुसार तयार करून देणे, नामांतरच्या नोंदी करणे, असेसमेंन्ट रजिस्टर व दाखला तयार करुन देणे. E) नवीन मालमत्तांच्या नोंदी संगणीकृत करणे, आवश्यकेनुसार घरपट्टी विभागाच्या कामासाठी संगणक व संगणक चालक उपलब्ध करून देणे. F) सदर विभागातील कर्मचाऱ्यांकरीता घरपट्टी विभागाची अद्यावत माहिती दर्शविणारे मोबाईल ॲप तयार करणे. G) सर्व प्रभाग समिती कार्यालय, तात्कालीन ग्रामपंचायत कार्यालय येथे नागरिकांकरीता कर भरणे करीता काउंटरचे व्यवस्थापन करणे. H) कार्ड पेंमेंट सुविधेसाठी POS Machine Integration करुन देणे. I) नवीन कर आकरणी करणेकरीता मोबाईल ॲपची सुविधा उपलब्ध करुन घेणे. J) नगरिकांना Citizen Portal अंतर्गत विविध सेवा सुविधा उपलब्ध करणे. K) नागरिकांना घरपट्टी सेवांतर्गत ऑनलाईन पेमेंट गेटवे उपलब्ध करुन देणे.
३.	पाणीपट्टी- L) वसई विरार शहर महानगरपालिकेच्या विविध विभाग/उपविभागामधील सर्व पाणापट्टी विभागाचे कामकाजासाठी स्वत:चे तांत्रिक मनुष्यबळ, स्टेशनरी, संगणक यंत्रणा व म.न.पा.ची सध्याची आज्ञावली (Software) वापरुन वार्षिक देखभाल दुरुस्तीसह चालविणे व ऑनलाईन पद्धतीने कामकाज करणे. M) आकारणी नोंदवही तयार करणे, मागणी नोंदवही तयार करणे, आवश्यकतेनुसार वाढ घट नोंदवही तयार करणे, बिले छपाई करणे. N) ऑनलाईन /ऑफलाईन भरणा केलेल्या ग्राहकांच्या नोंदी दैनदिन अद्यावत करणे व त्यांची रोजकीद चलन तयार करणे,वेळोवेळी लागणारे अहवाल मागणी प्रमाणे उपलब्ध करुन देणे. O) महानगरपालिकेची थकबाकी असलेल्या पाणीपट्टी कर धारकांची थकबाकी यादी तयार करणे, जप्तीपूर्व समज मागणीनुसार तयार करून देणे. P) नवीन पाणीपट्टीच्या नोंदी संगणीकृत करणे,आवश्यकेनुसार पाणीपट्टी विभागाच्या कामासाठी संगणक व संगणक चालक उपलब्ध करून देणे. Q) सदर विभागातील कर्मचाऱ्यांकरीता पाणीपट्टी विभागाची अद्यावत माहिती दर्शविणारे मोबाईल ॲप तयार करणे. R) सर्व प्रभाग समिती कार्यालय, तात्कालीन ग्रामपंचायत कार्यालय येथे नागरिकांकरीता कर भरणे करीता काउंटरचे व्यवस्थापन करणे. S) कार्ड पेंमेंट सुविधेसाठी POS Machine Integration करुन देणे. T) नवीन कर आकरणी करणेकरीता मोबाईल ॲपची सुविधा उपलब्ध करुन घेणे. U) नगरिकांना Citizen Portal अंतर्गत् विविध सेवा सुविधा उपलब्ध करणे. V) नागरिकांना घरपट्टी सेवांतर्गत ऑनलाईन पेमेंट गेटवे उपलब्ध करुन देणे.
४	M-gov (मोबाईल गव्हर्नस) नागरिकांच्या सुविधेसाठी मनपा सेवांचा लाभ घेण्यासाठी महानगरपालिकेचे (Android व IOS) मोबाईल ॲप तयार करणे.

५	Web Portal Updating (महानगरपालिकेचे संकेतस्थळ अद्यावत करणे):- शासन निर्देशाप्रमाणे व महानगरपालिकेने सुचविल्याप्रमाणे संकेतस्थळाच्या रचनेमध्ये बदल करणे. नागरिकांकरीता उपलब्ध केलेली तक्रार निवारण प्रणाली (Compliant Redressal System) संकेतस्थळावर अद्यावत ठेवणे.

उपरोक्त नमूद केलेल्या सुविधा (Modules) व इतर अनुषंगिक सुविधा (Modules) सुरळीत चालू ठेवणेकरीता व नागरीकांना अधिक जलद रितीने सुविधा देणेकरीता स्टेशनरी, मनुष्यबळ व संगणक यंत्रणेसहीत ऑनलाईन स्वरुपात वार्षिक पध्दतीने एजन्सी नेमल्यास कामे वेळच्यावेळी जलदगतीने होतील.

तसेच मुख्यालय, ९ प्रभाग समिती अंतर्गत विविध विभांगाची कामे संलग्न ठेवता येवून प्रशासकीय गतीमानता वाढेल. या कामी उपरोक्त सेवाच्या (Modules) अनुषंगाने प्रतिवर्षी अंदाजित रक्कम रु.४,२५,५०,०००/- (अक्षरी चार कोटी पंचवीस लाख पन्नास हजार रुपये) प्रमाणे बाबनिहाय घटकांचे दर मागविणे कामी सन २०२१-२२, २०२२-२३ व २०२३-२४ या तीन वर्षाकरीता अंदाजित रक्कम १२,७६,५०,०००/- (अक्षरी बारा कोटी शहात्तर लाख पन्नास हजार रुपये) इतका खर्च अपेक्षित आहे. परंतू मा.आयुक्त सो! यांच्या निर्देशान्वये पाच वर्षाकरीता एजन्सी नियुक्ती करावयाचे असल्याने सन २०२४-२५ व २०२५-२६ करीता अंदाजित रक्कम रु. ८,५१,००,०००/- असे एकूण पाच वर्षाकरीता (सन २०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५ व २०२५-२६) अंदाजित रक्कम रु.२१,२७,५०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च लेखा सांकेतांक क्र.०३१-२४७३ 'सा.प्र.ई-गव्हर्नन्स अंमलबजावणी' या लेखाशीर्ष अंतर्गत भागवता येईल.

तरी सदर कामी ई-निविदा प्रक्रीयेद्वारे सन २०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५ व २०२५-२६ या पाच वर्षाकरीता एजन्सी नियुक्त करणेस व होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस्तव सादर.

ठराव/निर्णय :- वसई विरार शहर महानगरपालिकेतील ई-गर्व्हनन्स प्रकल्पाअंतर्गत विविध विभागांचे कामकाज संगणक प्रणालीव्दारे, स्वत:चे स्टेशनरी, संगणक यंत्रणा, सर्वर व आज्ञावली (Software) वापरुन ऑनलाईन स्वरुपात ठेका पध्दतीने चालविणेकरीता ई-निविदा द्वारे सन २०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५ व २०२५-२६ करीता वरील प्रस्तावीत कामा पैकी मालमत्ता कर व पाणीपट्टी करांचे संगणकीय व्यवस्थापन एजन्सी द्वारे करणे कामी स्वतंत्र ई-निविदा व विवाह नोंदणी, आवक-जावक, लेखाविभागाच्या प्रणालीं करीता स्वतंत्र ई-निविदा प्रक्रिया करण्यात यावी. तसेच या कामी आवश्यक संणगक संच, प्रिंटर व इतर संगणकीय साहित्य भाडेतत्त्वावर न घेता खरेदी करावे व Cloud Hosting सेवा या करीता स्वतंत्र निविदा प्रक्रिया करण्यात यावी. उपरोक्त प्रमाणे होणा-या एकूण अंदाजीत रक्कम रु.२१,७५,५०,०००/- इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे. तसेच ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन नविन ठेकेदारास कार्यादेश देईपर्यंत मागील मंजूर ठेकेदार में. असेंटेक इन्फॉरमेशन टेक्नॉलॉजी प्रा. लि यांना मुदतवाढ देणेस मान्यता देण्यात येत आहे.

(गंगाथरन डी.)
प्रशासक तथा आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.- पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ४२१

विभाग:- माहिती तंत्रज्ञान
दिनांक:- ३०/०७/२०२१

प्रस्तावाचा विषय:- वसई विरार शहर महानगरपालिका अंतर्गत मुख्यालय, ९ प्रभाग समिती कार्यालये व इतर विभागीय कार्यालयांना इंटरनेट सुविधा पुरविणेकामी पॅनलवर एजन्सी नियुक्त करणे कामीच्या निविदेतील लघुत्तम दर मंजूर करुन निविदाकारांसोबत संविदा करणेस व कार्यादेश देणेस मंजुरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका अंतर्गत मुख्यालय, ९ प्रभाग समिती कार्यालये व इतर विभागीय कार्यालयांना इंटरनेट सुविधा पुरविणेकामी पॅनलवर एजंसी नियुक्त करणेकामी प्रशासकीय ठराव क्र. ४०५ दि.१९/०१/२०२१ रोजी अन्वये मंजूरी घेवुन दि. २४/०५/२०२१ ते दि.०८/०६/२०२१ (प्रथम मुदतवाढीसहीत) या कालावधीत ई-निविदा सादर करण्यात आली होती. सदर कालावधीत निविदेसाठी एकुण ५ निविदाकारांनी सहभाग घेतला आहे. निविदेत सहभाग घेतलेल्या ५ निविदाकारांनी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केली असुन मा. निविदा समितीच्या दि. ०५/०७/२०२१ रोजीच्या मंजुरी अन्वये पात्र निविदाधारकांचे क्रं.२ चे वित्तीय बाबींचे लिफाफे दि. ०५/०७/२०२१ रोजी उघडण्यात आले असून प्राप्त दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

तक्ता क्र. १

अ. क्र	तपशील	मे. भारत संचार निगम लिमीटेड	मे. डिजीटल नेटवर्क असोसीएटस प्रा. लि	मे. बी.टी.एस टेलीकॉम प्रा. लि	मे. इंस्टानेट टेक्नोलॉजीस	मे. विंडसॉर इंटरनेट प्रा. लि	लघुत्तम दर
		प्रति नग दर सर्व करांसहीत	प्रति नग दर सर्व करांसहीत	प्रति नग दर सर्व करांसहीत	प्रति नग दर सर्व करांसहीत	प्रति नग दर सर्व करांसहीत	प्रति नग दर सर्व करांसहीत
	PART A						
1	१:१ lease line १०mbps (unshared) १२months	१७४९९४.००/-	१९४७००.००/-	१८९९९८.८८/-	१८५०२२.८२/-	१९७९९९.२८/-	१७४९९४.००/- मे. भारत संचार निगम लिमीटेड
2	१:१ lease line २०mbps (unshared) १२months	२४१०७४.००/-	३०६८००.००/-	३०५२४९.४८/-	२९९९९९.६६/-	३१०४९९.३०/-	२४१०७४.००/- मे. भारत संचार निगम लिमीटेड
3	१:२ lease line १००mbps १२months	५३८४३४.००/-	८२६०००.००/-	१२८४९९.६४/-	११९९९८.९२/-	१३२५४९.४०/-	११९९९८.९२/- मे. इंस्टानेट टेक्नोलॉजीस

4	१:२ lease line ५०mbps १२months	३५३४१०.००/-	४१३०००.००/-	६४५९९.१०/-	**६१९९९.५६/-**	६७८५०.००/-	**६१९९९.५६/-** मे. इंस्टानेट टेक्नोलॉजीस
5	Broadband line १५mbps ३ months	**२०८५.०६/-**	४०४९.७६/-	३४९९.८८/-	३२२४.९४/-	३८१९.६६/-	**२०८५.०६/-** मे. भारत संचार निगम लिमीटेड
6	Broadband line २०mbps १२months	८३४०.२४/-	२०२७९.४८/-	५७९९.७०/-	**४९९९.६६/-**	५९९९.१२/-	**४९९९.६६/-** मे. इंस्टानेट टेक्नोलॉजीस
7	Broadband line २५mbps १२months	८३४०.२४/-	२५३२०.४४/-	६४९९.४४/-	**६१९९.७२/-**	६७४९.६०/-	**६१९९.७२/-** मे. इंस्टानेट टेक्नोलॉजीस
8	Broadband line ३०mbps १२months	८३४०.२४/-	३०५२७.७८/-	७४९८.९०/-	**७२४९.९२/-**	७८९८.९२/-	**७२४९.९२/-** मे. इंस्टानेट टेक्नोलॉजीस
9	Broadband line ५०mbps १२months	**८३४०.२४/-**	५०८७९.२४/-	१३९९९.५२/-	१३४९९.२०/-	१५४९९.३०/-	**८३४०.२४/-** मे. भारत संचार निगम लिमीटेड
10	Broadband line १००mbps १२months	**९१३३.२०/-**	९२३७७.४८/-	२२९९९.३८/-	२१९९९.९२/-	२४९९९.४८/-	**९१३३.२०/-** मे. भारत संचार निगम लिमीटेड
	PART B						
1	Gigabite WIFI router १२००Mbps	४२४८.००/-	३५४०.००/-	२३६०.००/-	२५९६.००/-	**२११४.००/-**	**२११४.००/-** मे. विंडसॉर इंटरनेट प्रा. लि
2	Wifi router ३००Mbps	१८२९.००/-	१७७०.००/-	११८०.००/-	११८०.००/-	**१०६२.००/-**	**१०६२.००/-** मे. विंडसॉर इंटरनेट प्रा. लि

उपरोक्त तक्त क्र. १ अन्वये प्राप्त दरांची तुलना केली असता पॅनलवर इंटरनेट सुविधा पुरविणे कामी खालील तपशीला प्रमाणे L१,L२,L३ निविदाधारक प्राप्त झाले आहेत.

तक्ता क्र. २

अ.क्र.	इंटरनेट सुविधा (प्लान)	L१	L२	L३	लघुत्तम दर
	PART A				प्रति नग दर सर्व करांसहीत
1	१:१ lease line १०mbps (unshared) १२months	मे. भारत संचार निगम लिमीटेड	मे. इंस्टानेट टेक्नोलॉजीस	मे. बी.टी.एस टेलीकॉम प्रा. लि	**१७४९९४.००/-**
2	१:१ lease line २०mbps (unshared) १२months	मे. भारत संचार निगम लिमीटेड	मे. इंस्टानेट टेक्नोलॉजीस	मे. बी.टी.एस टेलीकॉम प्रा. लि	**२४१०७४.००/-**
3	१:२ lease line १००mbps १२months	मे. इंस्टानेट टेक्नोलॉजीस	मे. बी.टी.एस टेलीकॉम प्रा. लि	मे. विंडसॉर इंटरनेट प्रा. लि	**११९९९८.९२/-**
4	१:२ lease line ५०mbps १२months	मे. इंस्टानेट टेक्नोलॉजीस	मे. बी.टी.एस टेलीकॉम प्रा. लि	मे. विंडसॉर इंटरनेट प्रा. लि	**६१९९९.५६/-**

5	Broadband line १५mbps ३ months	मे. भारत संचार निगम लिमीटेड	मे. इंस्टानेट टेक्नोलॉजीस	मे. बी.टी.एस टेलीकॉम प्रा. लि	२०८५.०६/-
6	Broadband line २०mbps १२months	मे. इंस्टानेट टेक्नोलॉजीस	मे. बी.टी.एस टेलीकॉम प्रा. लि	मे. विंडसॉर इंटरनेट प्रा. लि	४९९९.६६/-
7	Broadband line २५mbps १२months	मे. इंस्टानेट टेक्नोलॉजीस	मे. बी.टी.एस टेलीकॉम प्रा. लि	मे. विंडसॉर इंटरनेट प्रा. लि	६१९९.७२/-
8	Broadband line ३०mbps १२months	मे. इंस्टानेट टेक्नोलॉजीस	मे. बी.टी.एस टेलीकॉम प्रा. लि	मे. विंडसॉर इंटरनेट प्रा. लि	७२४९.९२/-
9	Broadband line ५०mbps १२months	मे. भारत संचार निगम लिमीटेड	मे. इंस्टानेट टेक्नोलॉजीस	मे. बी.टी.एस टेलीकॉम प्रा. लि	८३४०.२४/-
10	Broadband line १००mbps १२months	मे. भारत संचार निगम लिमीटेड	मे. इंस्टानेट टेक्नोलॉजीस	मे. बी.टी.एस टेलीकॉम प्रा. लि	९१३३.२०/-
	PART B				
1	Gigabite WIFI router १२००Mbps	मे. विंडसॉर इंटरनेट प्रा. लि	मे. बी.टी.एस टेलीकॉम प्रा. लि	मे. इंस्टानेट टेक्नोलॉजीस	२१२४.००/-
2	Wifi router ३००Mbps	मे. विंडसॉर इंटरनेट प्रा. लि	मे. बी.टी.एस टेलीकॉम प्रा. लि	मे. इंस्टानेट टेक्नोलॉजीस	१०६२.००/-

उपरोक्त तक्ता क्र. २ अन्वये L२ व L३ निविदाधाराकांस L१ निविदाधाराकाच्या दरान्वये (प्राप्त लघुत्तम दरानुसार) इंटरनेट सुविधा पुरविणे कामी पत्र देण्यात आले होते. त्याअनंषंगाने L२ व L३ निविदाधाराक L१ निविदाधाराकाच्या दराने इंटरनेट सुविधा पुरविणे कामी समर्थता दर्शविली आहे. तरी प्राप्त लघुत्तम दर मंजूर करुन L१, L२ व L३ निविदाधाराकांसोबत संविदा करणेस व कार्यादेश देणेस दि.१९/०७/२०२१ रोजी मा.निविदा समिती सभेत ठेवण्यात आले होते. त्याअनुषंगाने लघुत्तम दर मंजूर करुन L१, L२ व L३ निविदाधाराकांसोबत सोबत संविदा करणेस व कार्यादेश देणेस मा.निविदा समितीची शिफारस असुन मा. प्रशासक तथा आयुक्त सो! यांच्या मंजुरीस्तव सादर.

ठराव/ निर्णय :- वसई विरार शहर महानगरपालिका अंतर्गत मुख्यालय, ९ प्रभाग समिती कार्यालये व इतर विभागीय कार्यालयांना इंटरनेट सुविधा पुरविणेकामी पॅनलवर एजन्सी नियुक्त करणे कामीच्या निविदेतील L२ व L३ निविदाधाराक L१ निविदाधाराकाच्या दराने इंटरनेट सुविधा पुरविणे कामी तयार असून निविदेतील प्राप्त लघुत्तम दर मंजूर करुन L१, L२ व L३ निविदाधाराकांसोबत संविदा करणेस व कार्यादेश दिल्या पासून पुढील तीन वर्षाकरीता पॅनलवर एजन्सी नियुक्त करणे कामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(गंगाथरन डी.)
प्रशासक तथा आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई – विरार शहर रमहानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि- पालघर, पिन नं.-४०१ ३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स -०२५०-२५२५१०७
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. :- ४२२

विभाग :- वाहन

दिनांक :-३०/०७/२०२१

विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागासाठी खरेदी करण्यात आलेल्या यंत्रसामुग्रीच्या व्दितीय देखभाल व दुरुस्तीबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागासाठी २० ते २५ टन क्षमतेमधील १ नग एक्सकेवेटर्स (ब्रेकर सहीत), २ नग एक्सकेवेटर्स (ब्रेकर शिवाय) व २ नग एक्सकेवेटर्स लाँग बुम लाँग रिच (ब्रेकर शिवाय) अशा ०५ नग यंत्रसामुग्री मे. हुंडाई कंन्स्ट्रक्शन्स इक्युपमेंट इंडीया प्रा.लि. यांचेकडून खरेदी करणेत आलेल्या आहेत. खालीलप्रमाणे यंत्रसामुग्री महानगरपालिकेच्या डंम्पिंग ग्राऊंड येथे कार्यरत आहेत. परंतु सदर यंत्रसामुग्रीचे इंजिन गरम होण्याचे प्रमाण वारंवार वाढत होते. करिता सदर समस्येबाबत मे. हुंडाई कंन्स्ट्रक्शन्स इक्युपमेंट इंडीया प्रा.लि. यांचे अभियंताकडे तक्रार केली असता यंत्रसामुग्री वापरण्यात येणाऱ्या जागेच्या वातावरणाच्या परिणामामुळे सदरची समस्या येत असून त्यासाठी इंजिन गरम झाल्यास त्यावर पाण्याचा मारा करावा लागणार आहे. परंतु सदरचा उपाय हा तात्पुरत्या स्वरुपाचा आहे. यावर संदर्भ क्र. १ व २ अन्वये सदर यंत्रसामुग्री प्रत्येक २५० तासानंतर देखभल दुरुस्ती करणे आवश्यक असलेबाबत कळविलेले आहे. तसे मे. हुंडाई कंन्स्ट्रक्शन्स इक्युपमेंट इंडीया प्रा.लि. यांनी कळविलेले आहे. संदर्भ क्र. ३ च्या पत्रान्वये असे कळविण्यात आले की, मे. एम.एस.डी इंजिनिअर्स हे मे. हुंडाई कंन्स्ट्रक्शन्स इक्युपमेंट इंडीया प्रा.लि. यांचे ऑथोराईज डिलर असून प्रती २५० तासानंतर येणारी दुरुस्ती ही एस. एस.डी.इंजिनियर्स यांचेकडून करुन घेण्यात यावी व त्यासाठी लागणारे CONSUMABLE ला उपभोग्य वस्तुंची आवश्यकतेनुसार त्यांचा खरेदी कार्यादेश मे. एम.एस.डी इंजिनिअर्स यांचे नांवे द्यावा.

अ.क्र.	यंत्रसामुग्री तपशील	यंत्रसामुग्री प्रकार	यंत्रसामुग्री क्रमांक
१	२० ते २५ टन क्षमतेमधील २ नग एक्सकेवेटर्स (ब्रेकर शिवाय)	R२१० SMART PLUS	N६३३D०४२५८
		R२१० SMART PLUS	N६३३D०४२५९
२	२० ते २५ टन क्षमतेमधील १ नग एक्सकेवेटर्स (ब्रेकर सहीत)	R२१० SMART PLUS	N६३३D०४२६०
३	२० ते २५ टन क्षमतेमधील २ नग लाँग बुम लाँग रिच (ब्रेकर शिवाय)	R२४५LR SMART PLUS	N६३८D००३५६
		R२४५LR SMART PLUS	N६३८D००३६०

संदर्भ १ व २ अन्वये वरील यंत्रसामुग्रीची प्रत्येक २५० तासानंतर देखभाल दुरुस्तीबाबत एम. एस. डी. इंजिनिअर्स यांनी कळविलेले आहे. व त्यासाठी लागणाऱ्या उपभोग्य (Consumables) वस्तुची यादी त्यांच्या नगानुसार दरपत्रक सादर केलेले आहे. सदर दरपत्रकानुसार प्रति देखभाल दुरुस्तीचा खर्च हा १००० तासाअंती अंदाजित रक्कम रु. २,५०,०००/- (अक्षरी रु. दोन लक्ष पन्नास हजार मात्र) इतका अपेक्षित आहे.

तरी वसई विरार शहर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागासाठी खरेदी करण्यात आलेल्या यंत्रसामुग्रीच्या प्रत्येक १००० तासानंतर येणाऱ्या देखभाल-दुरुस्तीबाबतच्या खर्चास मान्यता मिळणेस्तव सविनय सादर.

ठराव / निर्णय :- सदर विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली असता घनकचरा व्यवस्थापन विभागासाठी खरेदी करण्यात आलेल्या यंत्रसामुग्रीची प्रत्येक २५० तासानंतर येणारी देखभाल-दुरुस्ती करणे आवश्यक आहे. सदरची देखभाल दुरुस्ती ही हमी मुदतीत आहे. परंतु कन्झुमेबल (उपभोग) बाबी महापालिकेस पुरविणेस आवश्यक आहे. तसेच हमी कालावधीत मे. हुंडाई कंन्स्ट्रक्शन्स इक्युपमेंट इंडीया प्रा.लि. व्यतिरिक्त इतर कंपनीचे कन्झ्युमेबल (उपभोग) वस्तु वापरणे योग्य होणार नाही. करिता मे. हुंडाई कंन्स्ट्रक्शन्स इक्युपमेंट इंडीया प्रा.लि. चे अधिकृत मालाचे विक्रेते मे. एम.एस.डी इंजिनिअर्स यांचेकडून सदरचे कन्झ्युमेबल (उपभोग) वस्तु खरेदी करुन त्यांचेमार्फत दुरुस्ती करणेस व याकामी होणाऱ्या र. रु. २,५०,०००/- पर्यंतच्या खर्चास महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४९ व ६८(१), ६९(१) व (२) आयुक्तांच्या आदेशान्वये मला प्रदान केलेल्या अधिकारानुसार सदर कामास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेत येत आहे.

उप-आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि- पालघर, पिन नं.-४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५० - २५२५१०७
ई-मेल - vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. :- ४२३

विभाग :- परिवहन

दिनांक :- ३०/०४/२०२१

प्रस्तावाचा विषय :- केंद्र शासनाच्या (National Clean Air Programme) अंतर्गत वसई विरार शहर महानगरपालिका परिवहन सेवेत नवीन २० नग सीएनजी व २ नग हायब्रीड ईलेक्ट्रीक बस खरेदी करणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेचा १५ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार Million Plus Cities अंतर्गत महाराष्ट्र शासनाने समावेश केलेला आहे. सन २०२०-२१ या आर्थिक वर्षातील एअर क्वॉलिटीसाठी महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. एफएफसी २०२० /प्र.क्र. ८६/नवि-४, दि. ०९ नोव्हेंबर २०२० अन्वये राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम (National Clean Air Programme)अंतर्गत हवा गुणवत्ते (Air Quality) साठी बंधनकारक (Tied) अनुदानाचा पहिला हप्ता रु. १६ कोटी इतका निधी वितरित करण्यात आला असून सदर निधी महापालिकेस दि. १८/११/२०२० रोजी प्राप्त झाला आहे.

महानगरपालिकेच्या राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम (National Clean Air Programme) आराखडयात खालील कामांचा समावेश केलेला आहे.

Sr. no.	Mitigation measures	No of Unit	Rate	Amount	Implement Department
A	**Control of Vehicular Emission & Traffic Improvement**				
1	Procurement of Hybrid Electric Bus	2	20000000	40000000	Vehicle / transport Dept.
2	Procurement of CNG Bus	17	4000000	68000000	
3	Pay & park facility behind VVCMC head Office	1	66000000	66000000	P.W.D
B	**Re-suspension**				
4	Creation of the Green Zone by Miyavaki Method	4	4250000	17000000	Garden & tree Auth. dept.
			Sub total	**17000000**	
C	**Re-suspension of Road Dust & Other Fugitive Emission**				
5	Vacuum mechanical sweeping	2	6000000	12000000	Vehicle / transport Dept.
6	Water fountains for Major Traffic Intersections	6	3000000	18000000	P.W.D & garden
7	Wind augmentation purifying Unit (WAYU) by CSIR	12	400000	4800000	P.W.D
D	**Control of Air Pollution from Bakeries / crematoria**				

8	LPG/PNG process in Crematorium	8	10500000	84000000	P.W.D
E	**CITY SPECIFIC ACTION**				
9	Air Monitoring system	3	3500000	10500000	P.W.D
TOTAL (A+B+C+D+E)				320300000	

उपरोक्तप्रमाणे कृती आराखडयातील र. रु. ३२,०३,००,०००/- इतक्या रकमेस मा. प्रशासकिय ठराव क्र. ६१३, दि. १६/०३/२०२१ अन्वये मंजूरी प्राप्त झाली असून A मधील १. Procurement of Hybrid Electric Bus करिता प्रती नग र.रु. २,००,००,०००/- व २. Procurement of CNG Bus करिता प्रती नग र.रु. ४०,००,०००/- असे एकूण मिळून १०,८०,००,०००/- इतका निधी परिवहन विभागास प्राप्त झालेला आहे.

या कामांची सविस्तर अंदाजत्रक व स्वतंत्र निविदा फॉर्म तयार करणेस महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळ यांनी जा.क्र.वविशम/बांधकाम/६२४/२०२०-२१, दि. ११/१२/२०२० अन्वये सल्लागार म्हणून मे. टंडन अर्बन सोल्युशन प्रा.लि. यांना मान्यता दिलेली आहे. सदर मान्यतेच्या अनुषंगाने मे. टंडन अर्बन सोल्युशन प्रा.लि. यांनी बस खरेदी करावयाचे अंदाजपत्रक व निविदा फॉर्म चा मसुदा परिवहन विभागास सादर केलेला होता.

परंतु, सदर अंदाजपत्रक व निविदा फॉर्ममध्ये काही बदल करणे आवश्यक होते. जसे की, १७ नग सी.एन.जी बससाठी रु. ६,८०,००,०००/- रक्कम मंजूर करणेत आलेली आहे. या रकमेमधुन २० नग CNG (Non-AC) propelled midi Bus खरेदी करणे शक्य होईल. तसेच ०२ नग AC, Electric Propelled Bus साठी ४,००,००,०००/- रक्कम मंजूर करणेत आलेली आहे, त्यातील ३,२०,००,०००/- या रकमेत ०२ नग ईलेक्ट्रीक बस खरेदी केल्यास उर्वरित ८०,००,०००/- रकमेमधुन हायब्रीड ईलेक्ट्रीक बससाठी लागणारे ईलेक्ट्रीक चार्जिंग पॉईंट, रोहीत्र (ट्रान्सफॉर्मर) सेटअप, डिझेल जनरेटर (२५० के.व्ही), बस चार्जिंग करणेस व बस उभ्या राहतील अशा ठिकाणी भिंतीचे कुंपन करुन त्यावर शेड बांधणे व इतर अनुषंगिक कामकाज करणेदेखील शक्य होईल. जेणेकरुन त्याठिकाणी भविष्यात महानगरपालिका परिवहन सेवेतील बस उभे राहू शकतील व बसची देखभाल-दुरुस्ती करणेस तेथे कार्यशाळा उभारणेस मदत होईल.

करिता स्वच्छ हवा कार्यक्रम (National Clean Air Programme) अंतर्गत हवा गुणवत्ते (Air Quality) अंतर्गत परिवहन विभागास प्राप्त एकूण र.रु १०,८०,००,०००/- इतक्या निधीतुन करणे योग्य होईल. कामाप्रमाणे खर्चाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे :

अ.क्र.	कामाचे नांव	संख्या	दर प्रती बस	एकूण
१	AC, Electric Propelled Bus	०२	१,६०,००,०००/-	३,२०,००,०००/-
२	CNG (Non-AC) propelled midi Bus	२०	३४,००,०००/-	६,८०,००,०००/-
३	ईलेक्ट्रीक हायब्रीड बससाठी पायाभुत सुविधा उभारणेकामी खर्च			८०,००,०००/-
एकूण निधी (र.रु. दहा कोटी ऐंशी लक्ष मात्र)				**१०,८०,००,०००/-**

स्वच्छ हवा कार्यक्रम (National Clean Air Programme) अंतर्गत हवा गुणवत्ते (Air Quality) अंतर्गत परिवहन विभागास प्राप्त एकूण र.रु १०,८०,००,०००/- इतक्या निधीतुन उपरोक्त कामासाठी रक्कम अपुरी पडल्यास महानगरपालिकेच्या फंडातुन (" परिवहन उपक्रम " लेखाशिर्षाअंतर्गत) अतिरिक्त खर्च करणे योग्य होईल.

तरी उपरोक्त तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे अंदाजपत्रकात व बस खरेदीसाठी मे. टंडन अर्बन सोल्युशन प्रा.लि. यांनी सादर केलेल्या ई-निविदा फॉर्म मध्ये बदल करुन नमुद केलेल्या अंदाजपत्रकानुसार ई-निविदा प्रसिध्दी दिलेली आहे. सदर ई-निविदेमध्ये केलेल्या बदलास कार्योत्तर मंजूरी व स्वच्छ हवा कार्यक्रम (National Clean Air Programme) अंतर्गत हवा गुणवत्ते (Air Quality) अंतर्गत परिवहन विभागास बस खरेदीकामी प्राप्त झालेल्या एकूण र.रु १०,८०,००,०००/- इतक्या निधीतील ०२ नग AC, Electric Propelled Bus खरेदीस रु.३,२०,००,०००/-, CNG (Non-AC) propelled midi Bus करिता ६,८०,००,०००/- व उर्वरित र.रु. ८०,००,०००/- रक्कमेतुन ईलेक्ट्रीक हायब्रीड बससाठी पायाभुत सुविधा उभारणेकामी तसेच सदर कामांसाठी होणारा अतिरिक्त खर्च महानगरपालिकेच्या फंडातुन ("परिवहन उपक्रम" या लेखाशिर्षा अंतर्गत) करणेस प्रशासकिय व वित्तीय मंजूरी मिळणेस्तव प्रस्ताव मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे मंजूरीस्तव सविनय सादर.

ठराव / निर्णय :- मे. टंडन अर्बन सोल्युशन प्रा.लि. यांनी सादर केलेल्या ई-निविदा फॉर्म मध्ये बदल करुन नमुद केलेल्या अंदाजपत्रकानुसार ई-निविदा प्रसिध्दी दिलेली आहे. सदर ई-निविदेमध्ये केलेल्या बदलास कार्योत्तर मंजूरी व स्वच्छ हवा कार्यक्रम (National Clean Air Programme) अंतर्गत हवा गुणवत्ते (Air Quality) अंतर्गत परिवहन विभागास बस खरेदीकामी प्राप्त झालेल्या एकूण र.रु १०,८०,००,०००/- इतक्या निधीतील ०२ नग AC, Electric Propelled Bus खरेदीस रु.३,२०,००,०००/-, CNG (Non-AC) propelled midi Bus करिता ६,८०,००,०००/- व उर्वरित र.रु. ८०,००,०००/- रक्कमेतुन ईलेक्ट्रीक हायब्रीड बससाठी पायाभुत सुविधा उभारणेकामी तसेच सदर कामांसाठी होणारा अतिरिक्त खर्च महानगरपालिकेच्या फंडातुन ("परिवहन उपक्रम" या लेखाशिर्षा अंतर्गत) करणेस याव्दारे प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणेत येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका